# संवादिनी




5153

१९९९

9 JAN 2008

800
Sam/1999

5153

*जगाच्या पाठीवर*
*कुठेही असला तरी*
*महाराष्ट्राच्या मातीला,*
*मराठी मायबोलीला*
*जो विसरला नाही,*
*त्या मराठी*
*माणसाच्या 'मम'त्वाचे*
*हे सुचिन्ह!*

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
मराठी साहित्य पुरस्कार योजनेसाठी
चित्रकार शांताराम पवार यांनी तयार केलेले बोधचिन्ह

ग्रंथमोजणी
2001-2: ६.३.2002
२००२-3: 20/3/2003
२००३-४: २५.३.४
२००४-५: 29/3/५
२००५-६: १४.२.६
२००६-७
२००८-९
२०१०-११
२०१२-१३
२०१४-१५
२०१६-१७

**संपादक**
दिगंबर पाध्ये

**संपादन साहाय्य**
अरुणा दुभाषी

**मुखपृष्ठ**
संतोष क्षीरसागर

**मुखपृष्ठ संकल्पना**
फुलवू अक्षरांचे मळे
जनहितासाठी

**मांडणी**
अवि दाभाडे

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ
पु. ल. देशपांडे यांची छायाचित्रे
'चित्रमय स्वगत' या ग्रंथातून



800
Sam/1999

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी,
मुंबई - ४०० ०२५

**प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर

केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० ०६२



केशव गोरे स्मारक ट्रस्ट
आयोजित

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
**मराठी साहित्य**
**पुरस्कार वितरण सोहळा**

अध्यक्ष : **नारायण सुर्वे**
प्रमुख पाहुणे : **अलेक् पद्मसी**

सूत्र संचालन : दत्ता बाळसराफ

शनिवार, दिनांक ८ जानेवारी २०००
सायंकाळी ५.३० वाजता
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई





## महाराष्ट्र फाउण्डेशन अनुवाद-अनुदान उपक्रम

महाराष्ट्रातील थोर विचारवंत कै. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व आयुर्वेदाचार्य कै. वेणीमाधवशास्त्री जोशी यांचे मराठी भाषेतील विचारधन इंग्रजी भाषेत अनुवादित करण्याचा उपक्रम जोशी कुटुंबियांनी महाराष्ट्र फाउण्डेशनला दिलेल्या देणगीतून 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'च्या द्वारे सुरु होत आहे.

या उपक्रमाचा प्रारंभ तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाच्या भाषांतराने झाला असून श्री. श्रीभगवान नेने यांनी भाषांतराचे बरेचसे काम पूर्ण केले आहे. यावर्षी डॉ. अरुंधती खंडकर यांनी तर्कतीर्थांच्या 'जडवाद' या ग्रंथाचे भाषांतर करण्याचे काम सुरू केले आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व आयुर्वेदाचार्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांच्या विचारधनाबरोबरच इतर मराठी विचारवंतांचे महत्त्वाचे लेखन इंग्रजीत अनुवादित करण्याची आणि इतर भारतीय विचारवंताचे विचार मराठीत आणण्याची कल्पनाही या उपक्रमात आहे.

800
Sam/1999
5153

१९९४ साली 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू झाली तेव्हाच या योजनेमागील हेतू नि:संदिग्धपणे स्पष्ट करण्यात आले होते.

'तेराव्या शतकापासून अखंड राहिलेली मराठी समाजातील प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून यापुढेही सुरू राहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी' हा या योजनेमागील हेतू होता व आहे. साहजिकच प्रगतिशील विचारांना प्रोत्साहन देणे व अशा प्रकारे कार्य केलेल्या साहित्यिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून या योजनेचे कार्य आजवर झाले आहे.

ज्या मान्यवर साहित्यिकांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार' देऊन गौरविले गेले त्या साहित्यिकांचे कार्य मराठी समाजात मान्य झालेलेच होते. त्यांना प्राप्त झालेल्या गौरव पुरस्कारांमुळे त्यांच्या श्रेयात कोणतीही भर पडणार नव्हती. त्यांना त्याची गरजच नव्हती. परंतु मानवी जीवनात केवळ गरज व उपयुक्तता यापलिकडेही बरेच काही असते. एखाद्या व्यक्तीकडून समाजाला जे काही मिळाले त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे हीदेखील सुसंस्कृत मनाची एक गरज असू शकते. अशा आंतरिक गरजेमधूनच 'गौरव पुरस्कारांचा' या योजनेत समावेश झाला आहे. आणि याच भावनेने या वर्षी श्री. पु. ल. देशपांडे यांची गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

या योजनेतील ग्रंथ पुरस्कारांबाबतही अशीच एक दृष्टी आहे. 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' प्राप्त होणारे ग्रंथ म्हणजे त्या त्या वर्षातील सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहेत अशी समजूत या योजनेशी संबंधित असलेल्या कोणीही बाळगलेली नाही. साहित्याच्या क्षेत्रात असे निर्णायक मत व्यक्त करण्यात असणाऱ्या अवघडपणाची सर्व संबंधितांना जाणीव आहे. म्हणूनच हे पुरस्कार कोणत्या ग्रंथांना द्यावेत, याविषयी जाणकारांची, चोखंदळ रसिकांची मते मागवून आलेल्या ग्रंथांच्या नावांमधून योजनेच्या हेतू-उद्दिष्टांनुसार पुरस्कारांसाठी निवड समितीने ग्रंथाची निवड केली आहे. तेथे ग्रंथाच्या गुणवत्तेबरोबरच नवे विषयक्षेत्र, नवा लेखक, साहित्य क्षेत्रातील लेखकाचे कार्य यांसारख्या बाबींची दखल भारतातील व अमेरिकेतील निवड समित्यांनी नेहमीच घेतली आहे. 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' प्राप्त झालेल्या काही ग्रंथांना पुढे राज्य पुरस्कारही प्राप्त झाले; पहिल्याच वर्षी फाउण्डेशनचा पुरस्कार प्राप्त झालेल्या 'ताम्रपट' या रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीला अलीकडेच साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला हे लक्षात घेतले तर या निवड समित्यांचे आजवरचे कार्य समाधानकारक आहे, असेच म्हणावेसे वाटते.

असो. अशा निर्णयांच्या संदर्भात एकमत कधीच शक्य नसते. कितीही केले तरी आपापल्या अभिरुचीनुसार व विचारानुसार काही मतभेद हे राहतातच. साहित्यक्षेत्राच्या आरोग्याच्या दृष्टीने असे मतभेद असणे हे स्वागतार्हच मानायला हवेत.

या पुरस्कार योजनेचे हे सहावे वर्ष आहे. गेल्या वर्षी जाहीर केल्याप्रमाणे या वर्षापासून ही योजना अधिक उपक्रमाभिमुख केली आहे. दोन गौरव पुरस्कारांऐवजी एकच गौरव पुरस्कार, प्रकाशकांना पुरस्कार देण्याऐवजी अनुदान आणि ग्रंथ पुरस्कारांच्या संदर्भात अनुवादित व संपादित ग्रंथांचा समावेश असे हे बदल आहेत. पुरस्कारांची संख्या कमी करून उपक्रमांसाठी अधिक निधी उपलब्ध करून द्यावा या हेतूने हे बदल केले आहेत. त्यानुसार यावर्षी ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे या प्रकाशन संस्थेच्या 'आपली प्राणीसृष्टी या विषयावरील ग्रंथासाठी एक लक्ष रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, 'कबीर' या अनुवादित व ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' या संपादित ग्रंथाची पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

अनुदाने देण्याची तरतूद योजनेत सुरुवातीपासून होतीच. भाषा, साहित्य व समाजशास्त्रीय दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर संशोधन करण्यासाठी अनुदाने, वाचन संस्कृतीला बळ देण्यासाठी मुख्यत: ग्रामीण भागातील ग्रंथालयांना भेट म्हणून पुस्तकांचे संच गेल्या पाच वर्षात दिले गेले आहेत. या वर्षीही पांच ग्रंथालयाना असे पुस्तकांचे संच देण्याची तरतूद आहेच याशिवाय गेल्या वर्षभरातही खालीलप्रमाणे अनुदाने मंजूर करण्यात आली आहेत.

१. 'साधना साप्ताहिक', पुणे — ग्रंथसमीक्षा प्रकल्प
रुपये १,००,०००/-

२. 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती', सातारा — वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प
रुपये १,५०,०००/-

३. 'लोकवाङ्मय गृह', मुंबई — अभिजात वैचारिक ग्रंथाच्या पुनर्मुद्रणासाठी
रुपये २,००,०००/-

४. प्रा. रंगनाथ पठारे, संगमनेर — शंकर गुहा नियोगी यांचे जीवन व कार्य यांचा शोध आणि अभ्यास या प्रकल्पासाठी
रुपये १,०५,०००/-

५. शेती व ग्रामीण विकास संशोधन मंडळ, बार्शी — महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळींचा विश्लेषक आढावा या प्रकल्पासाठी दोन वर्षांकरिता मंजूर झालेली रक्कम
रुपये ३,५०,०००/-

६. 'एस. एम. जोशी सोशॅलिस्ट फाउण्डेशन', पुणे — विवेक जागर प्रकल्पासाठी
रुपये १,२०,०००/-




'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' ही केवळ पुरस्कार योजना नाही हे यावरून ध्यानात येईल.

या वर्षी या सर्व प्रक्रियेत ज्यांनी ज्यांनी मनापासून सहकार्य केले त्या सर्वांचे 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' ऋणी आहे. गेल्या पांच वर्षांप्रमाणेच या वर्षीच्या पुरस्कारांचेही मराठी साहित्य जगतात स्वागत होईल असा विश्वास आहे.

— दिगंबर पाध्ये

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कार योजना
**१९९९चे मानकरी**



5153

**महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार**
श्री. पु. ल. देशपांडे

**मराठी भाषा, संशोधन**
**व समीक्षा**
**या क्षेत्रातील कामगिरीबद्दल**
**विशेष पुरस्कार**
श्री. वसंत दावतर





**वैचारिक नियतकालिक**
ताज
Thinkers' Academy Journal

**ग्रंथ**

अधांतर । जयंत पवार
कबीर । अनुवाद : मंगेश पाडगावकर
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना । संपादक : विलास खोले
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार । श्रीधर रंगनाथ कुलकर्णी
काश्मीर प्रश्न । ना. य. डोळे















# बहुरूपी प्रतिभावंत




गेले वर्षभर, आणि खरे तर त्याही आधी अनेक वर्षे, पी. एल. देशपांडे या व्यक्तीवर आणि त्यांच्या अनेकरूपी कलानिर्मितीवर इतके लिहिले गेले आहे की, त्यात भर घालणे कुणालाही कठीण वाटावे. त्यांच्यासारखे अनेक पैलू असलेले व्यक्तिमत्त्व काय, किंवा त्यांची विविधांगी प्रतिभा काय, एखादा मोठा ग्रंथ व्यापूनही दोनचार अंगुळे वरच उरेल. एखाद्या छोट्या लेखात त्यांना मावणे तर अशक्यप्रायच आहे. तेव्हा आपल्याला विशेष जाणवलेल्या एकदोन गोष्टी सांगण्यावरच समाधान मानणे योग्य होय.

पी. एल.ना मी प्रथम पाहिले ते 'वहिनी' या रांगणेकरांच्या नाटकात. त्या नाटकातले बाकी सारे आठवणीतून पुसल्यासारखे झाले आहे. पण आजही स्पष्टपणे आठवते ती घरंदाज सुरेखपणाने रंगमंच उजळून टाकणाऱ्या लीलाताई ओगल्यांची 'वहिनी' आणि तिच्यासमोर उभा असलेला, गोजिरवाणा दिसणारा धाकटा दीर—पी. एल. त्यांचे लेखन मी 'अभिरुची'त वाचत आलो होतो; पण त्यांच्या भेटीचा योग आला नव्हता. त्या काळात अमरेंद्र गाडगीळ एक साप्ताहिक चालवत होते आणि पी. एल. त्यात एकपानी व्यक्तिचित्रांची माला लिहीत होते. माणसाच्या वागण्याबोलण्यातले बारकावे टिपणारी त्यांची नजर, त्यांच्या सुखदुःखांशी सहज सहानुभूती साधणारी त्यांची वृत्ती, भाषेचा साधासुधा, नेमका, अर्थवाही आणि विशेष म्हणजे अस्सल मराठी वळणाचा उपयोग या गुणांनी मला आकर्षित केलेले होते. 'मौज'-'सत्यकथे'साठी त्यांचे लेखन मिळवायचे या हेतूने मी त्यांना पुण्यास जाऊन भेटलो. मला आठवते, तेव्हा ते पी. वाय. सी. जिमखान्यावरच्या एका मोठ्या बंगल्यामागील आऊटहाऊसच्या वरच्या मजल्यावर राहत होते. लांबोडक्या हॉलसारखी ती जागा गरीब मध्यमवर्गीय कुटुंबाला शोभेल अशीच होती. सामानसुमान, भांडीकुंडी, फर्निचर फारसे नव्हते; त्यामुळे ती अधिक मोठी, मोकळी वाटली. जमिनीवर बैठक अंथरलेली. त्यावर लोड, तक्क्ये. मी गेलो तेव्हा





सुनीताबाई भाकरी थापत होत्या. त्यांच्या अंगावर साधी सुती साडी. पी. एल. पायजमा-सदऱ्यात. दोघांनी प्रसन्नपणे माझे स्वागत केले. अगदी मोकळेपणाने गप्पा केल्या. 'मौज'-'सत्यकथे'साठी लिहायला पी. एल.नी तत्परतेने संमती दिली. मी खुषीने जायला निघालो तेव्हा ते म्हणाले, "मी एक नाटक लिहिलंय 'तुका म्हणे' नावाचं. संध्याकाळी वाचणार आहे. तुम्ही ऐकायला या वेळ असला तर." मला काय, तेव्हा वेळ खूप होता आणि लेखकाच्या नव्या लेखनाची तर अपूर्वाईच वाटे. संध्याकाळी मी गेलो तेव्हा दहापंधरा मंडळी जमली होती. त्यांत वसंत सबनीस होते असे आठवते. सारे समवयस्क, गप्पिष्ट, हास्यविनोदाने वातावरण भारून टाकणारे. पी. एल. त्यात प्रमुख. त्यांनी नाटक वाचायला सुरुवात केली मात्र, सारे एकाग्रतेने ऐकू लागले. पी. एल.चे ते नाट्यपूर्ण वाचन आणि त्याचा मनावर झालेला तीव्र परिणाम आजही आठवतो. आणि इंद्रायणीच्या डोहात बुडवलेले तुकारामाचे अभंग तरले या घटनेतील दैवी चमत्काराला फाटा देऊन त्याचे सर्वस्वी लौकिक व सामाजिक स्पष्टीकरण देण्याची जी धीट कल्पकता त्यांनी दाखविली होती तिने चमकून गेलो होतो, तेही आठवते.

त्यानंतर त्यांच्या पुण्या-मुंबईतल्या वेगवेगळ्या घरी जाण्याचा योग अनेकदा आला. मुख्यतः लेखनाच्या निमित्ताने. कधी एखाद्या नव्या गायक-गायिकेची मैफल त्यांनी योजिलेली असे ती ऐकण्यासाठी. वसंतराव देशपांड्यांची एक अतिशय रंगलेली बैठक मी त्यांच्या प्रॉक्टर रोडवरल्या छोट्या घरी ऐकली. केशवराव भोळ्यांच्याबरोबर. मालिनी राजूरकरांचे गाणे सांताक्रूझला 'मुक्तांगण'च्या हॉलमध्ये. त्यांनी 'मौज'-'सत्यकथे'साठी पुष्कळ लेखन केले. मुख्यतः वाङ्मयीन विडंबने. व्यक्तिचित्रे. क्वचित कथाही. 'अंगुस्तान विद्यापीठ', 'सहानुभाव संप्रदाय, 'मराठी वाङ्मयाचा गाळीव इतिहास', 'बटाट्याच्या चाळी'तले बहुतेक लेख, खानोलकर, बेगम अख्तर, कुमार गंधर्व,... ही यादी वाढवत नाही. आपल्या हातून विशेष काही लिहून झाले आहे असे वाटले की, त्यांना 'मौज' दिवाळी अंकाची किंवा 'सत्यकथे'ची आठवण येई आणि त्यासाठी ते लेखन राखून ठेवून, तसे कळवून ते देत. मला यात 'मौज'-'सत्यकथे'चा गौरव वाटे. 'बटाट्याची चाळ' हे पुस्तक त्यांनी 'मौज प्रकाशन गृहा'ला दिले तेव्हा मला तसेच वाटले. त्यांच्याच नव्हे तर एकूणच मराठी विनोदी साहित्यात 'बटाट्याची चाळ'चे स्थान अनन्यसाधारण आहे असे मला वाटते.

पी. एल.च्या कलेचे क्षेत्र जसे विस्तारत गेले, तशी त्यांची लोकप्रियता, त्यांची प्रतिष्ठा, त्यांचे वैभव हेही वाढत गेले. त्यांची कार्यक्षेत्रे बदलली, राहण्याची गावे व जागा बदलल्या, वयाबरोबर शरीरयष्टीत बदल झाला. पण बदलले नाही ते त्यांचे मुळातले साधे पण बालसुलभ सरलमनस्कपण. माथ्यावरचे केस सुंदर पांढरे झाले तरी त्यांचे निर्मळ, अनौपचारिक, प्रसन्न वागणे-बोलणे बदलले नाही. मध्यमवर्गीय राहणी बदलली नाही. ती गरीब होती त्याहून थोडी सुखवस्तू झाली; पण तिचा पिंड मध्यमवर्गीयच राहिला. त्यांनी आपल्या विविध कलाप्रयोगांत चित्रण केले ते मध्यमवर्गीय पांढरपेशी जीवनाचे आणि त्यांचा अफाट रसिकवृंदही मुख्यतः महाराष्ट्रभर पसरलेला मध्यमवर्गीयच राहिला. या वर्गातील माणसांची सुखदुःखे त्यांनी ज्या समरसतेने जाणली





आणि सहृदयतेने चित्रित केली तितकी क्वचितच दुसऱ्या कोणा आधुनिक मराठी लेखकाने केली असतील. झपाट्याने बदलत जाणाऱ्या कुटुंबव्यवस्थेत, समाजरचनेत, आर्थिक परिस्थितीत आणि राजकीय सत्तेच्या खेळात या वर्गाची जी भावनिक, वैचारिक आणि मूल्यजाणिवेत फरपट झाली आणि अजूनही होत आहे, तिचे इतक्या आत्मीयतेने निरीक्षण करणारा लेखकही विरळा. त्या वर्गातील माणसांच्या भावनाविचारांतील, मूल्यजाणिवेतील अंतर्द्वंद्वे, सर्वच आघाड्यांवर त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडी, पत्करावे लागणारे पराभव, आणि त्यातून वागण्या बोलण्यात व राहणीत उद्भवणाऱ्या विसंगती इतक्या सहानुभूतीने समजून घेणारा दुसरा लेखक सहज आठवत नाही. मराठी समीक्षेत 'मध्यमवर्गीय' ही संज्ञा गेली काही वर्षे, मुख्यत: मार्क्सवादाच्या प्रभावामुळे, टीकेचा विषय झाली आहे. सांस्कृतिक क्षेत्रात वापरला जाणारा तो एक अपशब्दच आहे. त्या क्षेत्रातील प्रच्छन्न सत्ताकारणाचे ते एक हुकमी हत्यारही असावे. पी. एल.च्या वाट्याला त्याचे वाद कमी आलेले नाहीत. पण कलावंत म्हणून त्यांचे कौतुक असे की, त्यांनी आपल्या प्रकृतिधर्माशी, कसल्याही मोहाने किंवा भीतीने, प्रतारणा केली नाही. आपल्या अनुभूतींशी किंवा जाणिवेशी बेइमानी केली नाही. कलावंत म्हणून नाही तशी व्यक्ती म्हणूनही नाही. आत्मनिष्ठा अशी अविचल राखणे सोपे नसते.

मात्र त्यांच्या या आत्मनिष्ठेचे एक वैशिष्ट्य व सामर्थ्य आहे. मध्यमवर्गाच्या संज्ञेत एक अंतर्द्वंद्व असते. दारिद्र्याची त्याला भीती असते. दरिद्री माणसे, त्यांची दरिद्री राहणी आणि त्यातली दु:खे, त्यांची मूल्यसरणी, त्यांच्या विचारभावनांची चलनवलने, यांच्याबद्दल मध्यमवर्गीयाला अज्ञान असते आणि अज्ञानापोटी अतिरिक्त बनलेली भीती किंवा दडस असते. उलट श्रीमंतांबद्दल, त्यांच्या सुखोपभोगांबद्दल, वैभवामुळे मिळणाऱ्या सत्तेबद्दल आणि स्वैरतेकडे झुकणाऱ्या स्वातंत्र्याबद्दल एक प्रकारचे छुपे, स्वप्नरंजनात्मक आकर्षण असते. पण त्याच वेळी परंपरेतून, शिक्षणातून, विचारचिंतनातून संस्कारित झालेल्या मानवी मूल्यांची चाड असते. ती शक्यतो सांभाळण्याची इच्छा व धडपड असते. केवळ जिवंत राहण्याच्या मूलभूत संघर्षात सापडलेल्या गरिबाला ही मूल्ये परवडतच नाहीत; आणि वैभव साधलेल्या माणसाला त्यांची पर्वा राहत नाही. त्या वायफळ मूल्यविचारावाचून त्याचे काही अडत नाही. परिणामी समाजधारणेला आणि संस्कृतिसंवर्धनाला आवश्यक असलेली ही जीवनमूल्ये सांभाळण्याची जबाबदारी अपुला आपण वैरी झालेल्या मध्यमवर्गावर पडते. पूर्वी सुसंस्कृत मध्यवर्गीय घरात शहाणी माणसे सांगायची की, 'आपल्यापेक्षा जास्त असलेल्याकडे पाहू नये; कमी असलेल्याकडे पाहावे. आपल्या चतकोर भाकरीतील अर्धा चतकोर त्याला द्यावा.' पी. एल.ना असे कोणा आजी-आजोबांनी सांगितले असेल, की उपजत शहाणपणाने त्यांनी ते जाणले? 'आर्यांच्या सणांचा इतिहास' लिहिणाऱ्या 'ऋग्वेदी' आजोबांकडून त्यांना अशा उदात्त, आर्य मूल्यांचा परंपरागत वारसा मिळाला की, मिळालेल्या उदार मानवतावादी शिक्षणातून त्यांनी ज्ञानप्रेम, स्वातंत्र्य, समता, न्याय, कर्तव्यनिष्ठा, कृतज्ञता, क्षमा, प्रेम, करुणा ही मूल्ये आत्मसात केली? असे दिसते की त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आणि वाङ्मयात वर उल्लेख केला ते मध्यमवर्गीय अंतर्द्वंद्व नाही. त्यांना आपल्या जीवनराहणीची व मूल्यसरणीची निवड करता आली आहे, म्हणूनच आपल्यापेक्षा संधी व साधने कमी लाभलेल्या दरिद्री, ग्रामीण, दलितवर्गाबद्दलचा त्यांचा जातिवंत कळवळा आटला नाही. त्यांना त्यांनी

सदैव झुकते माप दिले—मग ते आनंद यादव असोत, यशवंत मनोहर असोत, आरती प्रभू असोत की इंद्रजित भालेराव. नव्या धडपडणाऱ्या कलावंतांचे त्यांनी भरभरून कौतुक केले. जयवंत दळवींनी 'साठवण'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, पी. एल.च्या पत्रव्यवहारामध्ये समकालीनांशी झालेला पत्रव्यवहार कमी आढळतो. त्यांनी नवोदितांना लिहिलेली पत्रे मात्र कितीतरी अधिक आढळतात आणि ती चांगली सविस्तर असतात. दळवींनी नोंदलेली ही गोष्ट अर्थपूर्ण आहे. पी. एल.च्या स्वागतशील व उत्साही रसिकतेची जशी ती खूण आहे, तशीच ती त्यांनी केलेल्या मूल्यनिर्णयाची साक्ष आहे. त्या निर्णयानुसार, आपल्यापेक्षा जास्त असलेल्या वर्गात दाखल होण्याची आशाळभूत लौकिक धडपड त्यांनी केली नाही. तशा वर्गबदलाचे मुख्य साधन जो पैसा तो त्यांनी खूप कमावला. पण उदात्त विचाराने सत्कार्यांना, खऱ्याखुऱ्या सहधर्मचारिणीच्या दृढ कर्तव्यनिष्ठ पुढाकाराने आणि सहकार्याने, दान करून टाकला. त्या वरिष्ठ वर्गातील गुणी व्यक्तींच्या गुणांची योग्य कदर केली, पण त्या वर्गातील माणसांची, त्यांच्यातील दंभाची, आत्मतृप्तीची, प्रदर्शनप्रियतेची थट्टा अधिक केली; आणि तीही प्रसंगी श्रेष्ठ विनोदकाराला आवश्यक असलेली करुणार्द्र दृष्टी बाजूला ठेवून.

स्टीफन लीकॉक नावाच्या प्रसिद्ध विनोदी लेखकाने 'ह्यूमन ॲण्ड ह्यूमॅनिटी' नावाचे विनोदाची तात्त्विक मीमांसा करणारे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्याने विनोदाची व्याख्या अशी केली आहे की, विनोद म्हणजे जीवनातील विसंगतीचे करुणार्द्र मनाने केलेले चिंतन आणि त्याचा कलात्मकतेने केलेला आविष्कार होय. पी. एल.चे वाङ्मय वाचताना, त्यांचे बहुरूपी खेळ बघताना, त्यांची भाषणे-संभाषणे ऐकताना लीकॉकच्या व्याख्येचा सतत प्रत्यय येत राहतो. त्यांच्या प्रतिभेत माणसाच्या मनातील आणि वागण्याबोलण्यातील अनंतरूपी विसंगतींचा चटकन व नेमका वेध घेण्याची शक्ती आहे आणि त्या विसंगतींचे तितक्याच चपळपणे आणि अनपेक्षितपणे व्यंगचित्र काढणारे भाषाप्रभुत्व आहे. लीकॉकच्या व्याख्येतील 'करुणार्द्र चिंतन' हे शब्द महत्त्वाचे आहेत. माणसांच्या भावनाविचारांत किंवा वागण्याबोलण्यात ज्या सुप्तासुप्त किंवा प्रत्यक्षाप्रत्यक्ष विसंगती भरलेल्या असतात, त्यांच्याबद्दल जर अंतर्यामी सहानुभूती व शहाणी समज नसेल, त्या विसंगतीचा स्पर्श आपल्याला झालेला नाही आणि आपले सगळे जीवन तर्कसंगत व अंतर्बाह्य सुसंगतीने नटलेले आहे अशा अहंकाराचा वारा जर बाधलेला असेल, तर तो लेखक उपरोधाचा, वक्रोक्तीचा किंवा कुचेष्टेचा वापर प्राधान्याने करतो आणि आपल्या विषयाला हास्यास्पद ठरवतो, अपमानित किंवा शरमिंदा करतो. त्याचा वाचक-प्रेक्षकही निर्दयपणे हसतो. आपल्यातील विसंगतीचा त्याला त्या क्षणापुरता तरी विसर पडतो आणि एक प्रकारे भ्रामक अहंकाराने सुखावतो. पी. एल.च्या लेखनात दुखावणाऱ्या उपरोधाचा किंवा वक्रोक्तीचा वापर क्वचितच आढळतो. ज्याच्यातील विसंगतीचे ते अतिशयोक्तीने अथवा फार तर उपहासाने व्यंगचित्रण अथवा विडंबन करीत असतात त्याच्याशी त्यांचे अतिशय स्वाभाविकपणे तादात्म्य झालेले असते. जणू या विसंगती मनुष्यप्राण्यात सार्वत्रिक आणि



सार्वकालिक आहेत, त्या आपल्यातही असतील, अशा जाणिवेने ते इतरांच्या निमित्ताने स्वत:ला हसून घेत असतात. मोकळ्या व निर्मळ मनाने स्वत:ला हसण्याची शक्ती हे सुसंस्कृत माणुसकीचे लक्षण आहे. मानवी संसाराचा हा खेळ, सहज क्रीडावृत्तीने त्यात सामील होऊन पण त्याच वेळी अलिप्तपणे व सहानुभूतीने न्याहाळायचा, त्यातील व्यंगे व विसंगती मर्मग्राही दृष्टीने हेरायच्या आणि जातिवंत खेळकरपणाने त्यांचे व्यंगचित्रण, नक्कल किंवा विरूपीकरण करायचे, यामागील जीवनदृष्टी उथळ असत नाही; ती खोल असते. आणि त्याची निरर्थकता जाणवल्यानेच जणू ती सारे हसून साजरे करीत असते. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांपासून मराठी विनोदाची परंपरा पाहिली तर असा निरामय विनोद अगदी अपवादात्मक नसला तरी विरळच होता. चिं. वि. जोशींच्या लेखनात त्याचे



ठसठशीत आणि वेड लावणारे दर्शन घडले. अत्र्यांच्या 'झेंडूच्या फुला'त आणि प्रारंभीच्या विनोदी कथांतही ते झाले. पी. एल.च्या विनोदाचे त्या जातीच्या विनोदाशी जणू रक्ताचे नाते आहे.

मात्र त्यासाठी त्यांनी साहित्यक्षेत्राची अटक मानली नाही. खरे तर वाङ्मयीन विनोदाला आवश्यक ती भाषेची साधने त्यांच्या हातात सिद्ध होती—मग ती कोटी असो, अर्थश्लेष असो किंवा अतिशयोक्ती असो. त्यांचे वाङ्मय वाचताना वाटते की, पी. एल.च्या अंतर्मनात शब्दांचा अथवा वाक्याचा नाद आणि अर्थ यांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म छटांचा व ध्वनींचा अखंड खेळ चालू असतो आणि ते सारे पी. एल.च्या कल्पकतेच्या हलक्या टाळीच्या इशाऱ्याने त्यांच्या सेवेला हजर होतात. एखाद्या विनोदकाराने आयुष्यभर त्या सामर्थ्यावर निर्वाह केला असता. पण पी. एल.च्या प्रतिभेने वाङ्मयीन विनोदाचे कुंपण ओलांडले आणि नाटक, चित्रपट, बहुरूपी खेळ अशी अनेक कलांची क्षेत्रे आपल्या अवखळ क्रीडेने व्यापली. बहुरूपी खेळाची तर, प्राचीन लोककलेच्या परंपरेशी आतड्याचे नाते जोडत, अभिनव आणि आधुनिक रूपात पुनर्निर्मिती केली. त्यांनी नाटकांत व चित्रपटांत कामे केली खरी, पण कित्येकदा वाटते की त्यांच्यात अभिनेत्यापेक्षा नकलाकार प्रबळ व प्रतिभाशाली होता. आपल्यातील अभिनयाची मर्यादा त्यांनी, कलावंतांत अपवादात्मकच आढळणाऱ्या, सुजाणपणाने ओळखली आणि आपल्यातील नकलाकाराला नवनिर्मितिक्षम कलावंतांच्या पातळीवर नेले. रंगभूमीवर व्यक्तिरेखा उभ्या केल्या नाहीत, तर व्यक्तींच्या ठायी असलेल्या आणि विसंगतींनी युक्त असलेल्या प्रवृत्तींची व्यंगचित्रे जिवंत केली. एखाद्या आर. के. लक्ष्मणने, किंवा आपल्या जवळच्या वसंत सरवट्यांनी आपल्या हास्यचित्रांत निर्माण करावी त्याप्रमाणे. त्याच वेळी भाषेच्या लिखित वा वाचिक व कल्पनागम्य मर्यादा ओलांडल्या, तिच्यात अंतर्हित असलेले दृश्य, आंगिक रूप साकार केले आणि अशा दुपेडी विणीचा एक नवाच कलाप्रकार त्यांनी मराठी रंगभूमीवर जन्माला घातला, आणि त्याला अपूर्व यश व प्रतिष्ठा मिळवून दिली. मार्सेल मार्सोच्या अभिजात मूकनाट्याचे हे जणू दुसरे टोक. त्यांनी विनोदी नाटके लिहिली आणि ती रूपान्तराचा उत्तम नमुना आहेत, अगदी देवलांच्या 'संशयकल्लोळ'शी नाते सांगणारी, हे खरे; पण 'बटाट्याची चाळ', 'वाऱ्यावरची वरात', 'असा मी असामी', 'वटवट' हे खेळ हा त्यांच्या विनोदी नाट्यप्रतिभेचा आणि रंगभूमीच्या कलेवरील सर्वांगीण प्रभुत्वाचा अभूतपूर्व, नवनिर्मितिशील आविष्कार होता असे म्हणावे लागेल. एकपात्री प्रयोगापेक्षा

त्याची जात व प्रत वेगळीच आहे.

चार्ली चाप्लीनबद्दलचा नितान्त आदरभाव पी.एल.नी अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे. त्यांच्या बैठकीच्या खोलीतले चाप्लीनच्या ट्रॅम्पचे मोठे छायाचित्र नेहमी लक्ष वेधून घेते — जसा बडे गुलामअलींचा सुंदर अर्धपुतळा. अलीकडे त्यात वसंतराव देशपांडे यांच्या अतिशय वेधक छायाचित्राची भर पडली आहे, आणि माधव आचवलांच्या रंगीत व्यक्तिचित्राची. विनोद, संगीत आणि स्नेह या त्यांच्या जिवींच्या जिव्हाळ्याची ती प्रतीकेच आहेत. चाप्लीनच्या 'लाइमलाईट' नंतरच्या शेवटच्या दोन चित्रपटांची समीक्षा करताना एका टीकाकाराने असे म्हटले आहे की, ''आपल्यावर झालेल्या अन्यायाने दुखावलेल्या चाप्लीनने या चित्रपटात तिखट उपरोध व कडवट वक्रोक्ती यांचा वापर करून अमेरिकन संस्कृतीवरचाच आपला राग उगवून घेतला आहे. तो जणू प्रेक्षकांना म्हणतो आहे, ''याला हसून घ्या. हे केवळ हास्यास्पद आहे.'' पण 'लाइमलाईट'पर्यंत तो जणू म्हणत होता, ''याला हसा. मानवी संसार हा स्वभावत:च अशा औपरोधिक विसंगतींनी आणि अटळ अंतर्विरोधांनी भरलेला आहे. तो हसून साजरा करा झालं!'' मार्सेल मार्सो किंवा चाप्लीन यांच्याशी तुलना केलेली पी.एल.ना स्वत:लाच आवडणार नाही. तशा अतिशयोक्तीची ते थट्टा करतील, तिला हास्यास्पद बनवतील आणि झटकून टाकतील. ते योग्यच आहे. पण चाप्लीन काय किंवा मार्सेल मार्सो काय हे कलेच्या ज्या मार्गावरचे परमसिद्धी लाभलेले प्रतिभावंत आहेत, त्याच बिकट आणि आपल्याकडे अक्षुण्ण राहिलेल्या वाटेवर पी. एल.नीही साधनेची चार पावले टाकली आहेत हे मान्य करायला हवे. 'संगीत चिवडामणी', 'नारायण', 'अंतू बर्वा' यांसारखे त्यांचे काही लेख वाचताना, अथवा 'बटाट्याची चाळ'सारखे बहुरूपी खेळ पाहताना लीकॉकच्या व्याख्येतील 'करुणार्द्र चिंतन' या शब्दांची किंवा चाप्लीनच्या समीक्षकाच्या वर सांगितलेल्या उक्तीची साक्ष पटते यात शंका नाही. अनावर हास्याच्या कल्लोळात आपले हात नकळत डोळ्यांच्या कडा केव्हा पुसू लागतात ते कळत नाही. नाहीतरी 'हसणे रडणे मुळात एकच' हे विंदा करंदीकरांचे वचन अनेक अर्थांनी खरेच आहे.

पी.एल.चा विनोद आक्रमक शस्त्रासारखा झाला तो एकदाच. आणीबाणीनंतरच्या निवडणुकांच्या काळात. आचार्य कृपलानींची वाणी व लेखणी उपरोध-वक्रोक्तीच्या खेळात फार तरबेज होती. तिच्या फटकाऱ्यातून गांधी-नेहरूही सुटले नाहीत. त्यांची अशी गोष्ट सांगतात की, ते एकदा काहीशा हताशपणे म्हणाले होते, ''काय करू? या देशाला विनोदबुद्धी नाही. नाहीतर केवळ उपहास-उपरोधाच्या शक्तीने मी हे सरकार उलथवून टाकले असते.'' पी.एल.नी आपल्या अमोघ वक्तृत्वाने तसली किमया करून दाखवली. उपहास, उपरोध, विडंबन, वक्रोक्ती अशा विनोदाच्या सर्व साधनांचा मर्माघाती उपयोग करून, सत्ताधारी पक्षाला धूळ चारण्यात महाराष्ट्रात तरी त्यांचे श्रेय मोठे आहे. पण असा एखादा प्रसंग वगळला, अथवा एकदोन वैयक्तिक वाद सोडले, तर त्यांचा विनोद अजातशत्रूच ठरला. मराठी माणसाच्या विनोदबुद्धीबद्दल म्हटले जाते की, तो एक वेळ मित्र गमावील, पण त्याच्यावर कोटी अथवा विनोद करण्याची संधी सोडणार नाही. पी.एल. या समजुतीला अपवाद आहेत. त्यांनी कोटी करण्याची संधी कधी सोडली नाही — आजही सोडीत नाहीत; पण त्यामुळे एकही मित्र गमावला नाही. उलट अगणित चाहते जोडले. कारण एकदा त्यांनीच म्हटल्याप्रमाणे, ते कमरेखाली वार कधी करीत नाहीत. आता काही काही माणसे आपला कमरपट्टा अंमळ वर चढवतात. मग त्यांचा इलाज चालत नाही खरा.




मार्सेल मार्सोच्या मूकनाट्याच्या खेळात 'द मास्कमेकर' म्हणून एक विलक्षण प्रभावी खेळ आहे. सहसा आपल्या कार्यक्रमाच्या शेवटी मार्सो तो करतो. वेगवेगळ्या भावनांच्या मुद्रांचे मुखवटे बनवणारा एक कलावंत आहे आणि तो एकेक मुखवटा आपल्या चेहऱ्यावर चढवतो आणि काढतो. कधी हसरा, कधी उदास, कधी गंभीर, कधी विषण्ण, कधी दु:खी, कधी जणू खिदळणारा. मार्सो आपली मूक-नाट्यासाठी धारण केलेली मुद्रा या बदलात कायम ठेवतो. त्यावर चढणारे-उतरणारे भिन्न भिन्न भावनांचे मुखवटे तो वाढत्या वेगाने बदलतो — शेवटी इतक्या वेगाने की त्यावर पाहणाऱ्याची नजर ठरत नाही, पण भावना मात्र जाणवत राहतात आणि अचानक या कानापासून त्या





कानापर्यंत तोंड फाकून खिदळणारा विदूषकी मुखवटा त्याच्या चेहऱ्याला चिकटून बसतो आणि तो निघता निघत नाही. कितीही उचकटला, ठोकला, ओढला, फोडून टाकू पाहिले तरी नाही. या प्रयासात तो गर्भगळित होतो, थकतो, घामाघूम होतो, गलितगात्र होतो आणि अखेरीस मृतप्राय होऊन जमिनीवर कोसळतो. त्याच्या चेहऱ्याला चिकटलेला तो मुखवटा मात्र विचकट हसत असलेला दिसत राहतो. प्रेक्षकाच्या अंगावर काटा येतो. हसण्याची भीती वाटते आणि आपण गेले दोन तास हसत होतो याची शरम. गळ्यात आवंढा दाटतो. श्वास अडतो. डोळे पाण्याने भरून येतात. ते पुसण्याचे भान राहत नाही. कार्यक्रम संपल्यानंतरच्या टाळ्या वाजवण्याचे हातांत जणू त्राण उरत नाही. विनोदी कलावंतांचे करुण भागधेयच मार्सेल मार्सोने आपल्या या खेळात मूर्त केलेले असते. पी.एल.ना या भागधेयाची उपजत जाणीव असावी. त्यामुळे विदूषकाचा मुखवटा त्यांनी प्रसंगी चढवला पण तो चिकटू दिला नाही. त्यांना त्यांच्यातील इतर कलांची मदत झाली असावी. त्यांनी विनोदाप्रमाणे इतर वाङ्मयप्रकार हाताळले, आणि त्यात आपल्या गंभीर प्रेरणा-प्रवृत्तींचा आविष्कार केला — मग ती व्यक्तिचित्रे असोत, नाटके असोत, रवींद्रनाथांसारख्या विभूतीवरील व्याख्याने असोत, मुलांसाठी लिहिलेले गांधींचे सुंदर चरित्र असो की, असंख्य आस्वादक व विवेचक प्रस्तावना असोत. वाङ्मयाप्रमाणे संगीतासारख्या कलेची संगत केली. नभोवाणी, दूरदर्शन यांसारख्या तंत्रप्रधान माध्यमात काम केले. ते केवळ सोंगाडे, केवळ बहुरूपी, केवळ विदूषक राहिले नाहीत. त्यांच्या या बहुपेडी व अनेकपदरी व्यक्तिमत्त्वाला आणि कलानिर्मितीला रसिकांनी तशीच समजदार दाद दिली आणि विदूषकाचे मार्सोला अटळ भासणारे भागधेय पी.एल.ना पुष्कळच चुकवता आले.



पी.एल.नी आणखी एक भूमिका चुकवली आणि ती म्हणजे गंभीर, तात्त्विक विश्लेषण करणाऱ्या समीक्षकाची. खरे म्हणजे त्यांची बुद्धिमत्ता कुशाग्र आहे. अनेक कलांच्या व विषयांच्या संस्काराने त्यांचे ज्ञान समृद्ध आणि रसिकता सुसंस्कारित झाली आहे. त्यांची पंडितमैत्री अफाट आहे आणि देशाटनही कमी नाही. सभेत संचार तर अखंड आहे. त्यामुळे प्राप्त होणारे चातुर्य त्यांनी अमाप कमावले, पण शास्त्रग्रंथविलोकनाने येणारी तात्त्विक, तर्ककर्कश मीमांसा टाळली. याचे एक कारण म्हणजे ते पिंडाने गुणग्राहक आहेत. जे जे सुंदर, उदात्त, उन्नत आहे त्याने ते वेडावून जातात — काही वेळा अंमळ अधिकच. 'गुणी गुणं वेत्ति' हा न्याय त्यांच्या बाबतीत सर्वार्थाने खरा आहे. त्यांनी हेही जणू सहज अंत:प्रेरणेने जाणले आहे की, सौंदर्याचे विश्लेषण फारसे करता येत नाही, नि:शेष तर नाहीच नाही, आणि सौंदर्याचा प्रत्यय मूलत: व अंतिमत: व्यक्तिनिष्ठ असतो; तो यथार्थपणे व परिपूर्णतेने दुसऱ्याला सांगता येत नाही. त्याचा ब्रह्मानंदसहोदर हर्ष सगळ्या अस्तित्वासकट ज्याचा त्याने अनुभवायचा असतो आणि त्याचा अपरिहार्य असा आनंदोद्गार व्यक्त केला तरी तर्कबुद्धीच्या चिमटीत त्याला पकडता येत नाही. तसा प्रयत्न शेवटी निरर्थक व गैरलागू ठरतो. विश्लेषणाने आपण सौंदर्याची हत्या करतो हे पी.एल.ना सहजप्रवृत्तीने उमजले असावे. त्यांच्या अभिजात रसिकतेचे हे प्रगल्भ शहाणपणच म्हणावे. अथवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य किंवा मर्यादा.

जयवंत दळवींनी 'साठवण'च्या प्रस्तावनेत पी.एल.च्या आईंचे उद्‌गार सांगितले आहेत. त्यांनी दळवींना लिहिले, "भाईचे लिखाण हा माझ्या जिवाचा विरंगुळा आहे. मन सैरभैर झाले की भाईचे एखादे पुस्तक घेऊन मी वाचत बसते. वाचता वाचता एका वेगळ्याच मुक्त साम्राज्यात गेल्याचा भास होतो व मनाला शांतता प्राप्त होते." ते उद्‌गार वाचले तेव्हा मनात आले की, क्वचितच कोणी

मातेने आपल्या मुलाचे असे कौतुक केले असेल आणि क्वचितच कोणा पुत्राने मातृऋण असे फेडले असेल. पी.एल.च्या जगभर पसरलेल्या चाहत्यांच्या अनुभवाचा हा प्रातिनिधिक उद्‌गारच आहे असे म्हणता येईल आणि कदाचित त्यांच्या वाङ्मयाचे ते यथार्थ व अर्थपूर्ण मूल्यमापनही ठरेल.

'आपापले कार्यक्षेत्र व्यापून टाकणारे प्रतिभावंत असतात, पण त्यांतला एखादाच आपल्या समाजाच्या समग्र संस्कृतीलाच व्यापून उरतो. पी.एल. हे असे विरळा प्रतिभावंत आहेत, असे कुसुमाग्रजांनी म्हटले आहे. तुलना करायची नाही, पण रवींद्रनाथ जसे बंगाली व भारतीय परंपरेचे व संस्कृतीचे उत्तम प्रतिनिधी आहेत, तसे पी.एल.ना मराठी संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणता येईल. बाराव्या-तेराव्या शतकापासून अगदी आधुनिक काळापर्यंत मराठी संस्कृतीच्या वेगवेगळ्या अंगांत जे जे सत्त्वशील, सुंदर, उदात्त, उन्नत, नवनिर्मितिशील, सुरेल, नाट्यपूर्ण व मूल्ययुक्त आहे ते पी.एल.च्या व्यक्तिमत्त्वात आणि कलानिर्मितीत व्यक्त झाले आहे असे म्हणता येईल. 'कुवलयमाला' या प्राचीन ग्रंथात महाराष्ट्रीयांचे वर्णन करताना ते 'कलहशील' आहेत असे म्हटले आहे. पी.एल.च्या प्रतिनिधित्वात तेवढी उणीव सांगता येईल; आणि ती स्वागतार्हच आहे असे म्हणता येईल. निसर्गानेच त्यांना ती भांडखोरपणाची 'मऱ्हाटी' देणगी दिली नसावी. पण निसर्गाने अनंतहस्ताने त्यांना ज्या देणग्या दिल्या आहेत त्यांना तोड नाही. जी. ए. कुलकर्णींनी माधव आचवलांचे वर्णन 'देवाजवळ वारीला असणारा माणूस' असे केले होते. पी.एल.ची ईश्वरावर श्रद्धा नाही, पण श्रद्धावान भक्तांबद्दल त्यांना परमादर आहे — मग ते श्रद्धावान पुरुष कोणत्याही मंगल, सुंदर, विद्येच्या वा समाजहितैषी क्षेत्रांतील असोत. त्या सर्व निष्ठावान भक्तांच्या — त्यात पी.एल.चे भक्तही आले — मनात असे उद्‌गार अखंड गुंजत असतील की, ''देव न मानणारा पण परमेश्वराजवळ जास्त वशिला असलेला हा माणूस आहे!'' निसर्ग म्हणा वा ईश्वर म्हणा, त्याने दिलेल्या अलौकिक देणग्यांची गणती करताना एका दैवायत्त (पी.एल. मनात म्हणतील, 'मदायत्त') देणगीचा विसर कधीही कोणालाही पडणार नाही आणि ती म्हणजे सुनीता देशपांडे. या निसर्गदत्त व दैवायत्त देणग्यांसह पी.एल.नी निरामयपणे शतायू व्हावे.

. . . . . . . . . . . . . . . . **श्री. पु. भागवत**

महाराष्ट्र टाइम्स, ६ नोव्हेंबर १९९४, पु. ल. देशपांडे यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने प्रकाशित झालेला लेख.



# मला उमगलेले पु.ल.

मला आजही स्वच्छ आणि स्पष्ट आठवतो तो 'आणीबाणीचा काळ'. राष्ट्रानं स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनुभवलेलं पहिलं हुकुमशाही पर्व. 'स्वातंत्र्य' संकल्पनेला बसलेला पहिला मोठा हादरा. आचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, विहार स्वातंत्र्य आणि मत स्वातंत्र्याला पाडलेलं जबरदस्त खिंडार. 'व्यक्तिकेंद्रित' सत्तालालसेनं 'एका समूहाला' वेठीस धरलेल्या शोकांतिकेचा तो काळ. भारतीय भूमीने अनुभवलेल्या अनेक दमन चक्रांपैकी हे एक चक्र. स्वकीयांनी स्वकीयांवर स्वखुषीने लादलेलं स्वदेशी दमन चक्र.

'सहिष्णु'तेचा वारसा आणि संस्कार लाभलेल्या समाजाला दडपणं अवघड नसतं हा आतापर्यंत



परकीयांना लागलेला शोध यावेळी स्वकीयांनाही लागला आणि त्यांनी त्याचा पुरता उपयोग करून घेतला. स्वातंत्र्याच्या मनोहारी चित्रातल्या सप्तरंगांना नजर लागली ती सत्तेच्या डोळ्यांतल्या काजळाची. मग काय सप्तरंग अबोल झाले, बधिर झाले, निस्तेज झाले, चित्रातल्या रेषा झुकल्या, वाकल्या, थकल्या, चित्रातले आकार अर्थहीन, विचारहीन झाले, चित्राचा तोल ढळतोय, पोत हरवतोय असं वाटत असतानाच अनेक हात मदतीला धावले. शब्द आक्रोश करू लागले, स्वरांनी तार छेडली, पावलांनी आघाती पदन्यास केला, शिल्पांनी भिवया ताणल्या, शाहिरांचे डफ कडाडले. 'स्वातंत्र्य' टिकविण्यासाठी स्वकीयांनी स्वकीयांविरुद्ध पुकारलेला तो पहिला मोठा लढा होता.

सामाजिक बांधिलकी, राजकीय संवेदना, सांस्कृतिक जाणीव असलेले; राष्ट्रावर, समाजावर, माणसांवर प्रेम करणारे आणि 'स्वातंत्र्य' संकल्पनेचा अर्थ उमगलेले आणि त्याचं मोल कळलेले फार थोडे कलावंत आणि साहित्यिक या दमन चक्राच्या विरोधात दंड थोपटून जाहीरपणे रस्त्यावर उतरले, त्यात भाई अर्थात पु.ल. देशपांडे हे अग्रभागी होते. त्याकाळी मी कॉलेजमध्ये विद्यार्थी होतो. आणि विद्यार्थी चळवळीत सक्रिय होतो. म्हणून एका कलावंतानं, साहित्यिकानं आपला



आविष्कार-परिघ ओलांडून परिणामाची तमा न बाळगता रस्त्यावर उतरून या लढ्यात उडी घेण्याचं महत्त्व मला अधिक वाटत होतं. महाराष्ट्रात त्याकाळातही सामाजिक बांधिलकी मानणारे काही कमी साहित्यिक, कलावंत नव्हते परंतु अशा दडपशाहीच्या विरोधात दोन हात करण्याचं धैर्य आणि धाडस दाखवणारे फार मोजके होते. साहित्यिकाचं, कलावंताचं, रंगकर्मीचं काम केवळ त्यांच्या कलामाध्यमातून अभिव्यक्त होणं एवढंच असतं का, असा प्रश्न मला वेळोवेळी पडतो, आत्ताही पडतो. समाजावर, राष्ट्रावर, स्वातंत्र्यावर संकट आलं तर आमची भूमिका अभिव्यक्तीपुरतीच मर्यादित हवी का? मला वाटतं जेव्हा टोकाची संकटं येतात तेव्हा रस्त्यावर उतरून आपला विरोध दर्शवणं, प्रसंगी समाजाचं नेतृत्व करणं हेही कलावंताचं काम आहे. म्हणून मला भाईंच्या त्या डोळसपणाचं आणि धाडसाचं मोल तेव्हांही वेगळं वाटलं आणि आताही ते वेगळं वाटतं. भाई आणीबाणी लादणाऱ्या शक्तींच्या विरोधात शेवटपर्यंत लढले आणि उद्देश सफल होताच बाजूलाही झाले. तेव्हापासून भाई माझ्यासाठी केवळ एक साहित्यिक आणि एक कलावंत उरले नाहीत तर आदराचे स्थान झाले.

भाईंबद्दलचं माझं कुतूहल आता वाढत चाललं होतं. कधीतरी त्यांना भेटावं असंही वाटत होतं. भाईंच्या विविध क्षेत्रातल्या कामगिरीबद्दल बीडसारख्या ठिकाणी जेवढं मिळेल तेवढं वाचत होतो. तशी भाईंची आणि माझी ओळख शाळाकॉलेजातल्या अभ्यासक्रमामधली. अभ्यासक्रमातले लेखक विद्यार्थ्यांना साताजन्माच्या वैऱ्यासारखे वाटतात. पण भाईंचं लिखाण त्याला अपवाद असायचं. माझी त्यांची खरी आमनेसामने ओळख झाली ती १९८६ साली. मी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचा (दिल्ली) अभ्यासक्रम पूर्ण करून मुंबईला करिअर करण्यासाठी आलो त्यानंतर. डॉ. रानडे मला त्यांच्याकडे घेऊन गेले होते. एन. सी. पी. ए.च्या रंगभूमी विकास प्रकल्पात मी काम करावं अशी डॉ. अशोक रानड्यांची इच्छा होती. भाई माझा इंटरव्ह्यू घेणार होते. मला माझ्या आयुष्यात आतापर्यंत दोनच माणसांसमोर जाताना टेन्शन आलं होतं. एक होते श्री. इब्राहीम अलकाजी आणि दुसरे भाई. मी

नर्व्हस होतो. शर्टची बटणं चारचारदा नीट करत होतो. हातात कागदपत्रांच्या फाईल्स होत्या. दरवाजा उघडून रानडे आत गेले. त्यांच्या पाठीपाठी मी. रानडे म्हणाले, "या वामन." मी काही बोलायच्या आत भाई म्हणाले, "अरे, बस, बस. कधीपासून जॉईन होतोयस?" संपलं. माझं टेन्शन संपलं. मग चहा-पाणी. इतर गप्पाटप्पा. अशा पद्धतीनं एकही प्रश्न न विचारता माझा झालेला पहिला आणि शेवटचा इंटरव्ह्यू. समोर आलेल्या माणसाला क्षणात आपलंसं करावं तर ते भाईंनीच. आपल्या मोठेपणाचा, प्रतिभेचा लवलेशही त्यांच्या वागण्यात डोकावत नाही. आणि असं होऊ न देणं हे तेवढं सोपं नाही.

जवळ जवळ दहा वर्षं मला भाईंच्या सहवासात काम करण्याची संधी मिळाली. या सहवासात कळलेल्या भाईंचे आणि त्यांच्याकडून मिळालेल्या शिदोरीचे अनंत संस्कार आणि उपकार माझ्यावर आहेत. या काळात भाईंचं अष्टपैलूत्व फार जवळून अनुभवता आलं. जीवनातली फार कमी क्षेत्र असतील जिथे भाईंचा वावर झाला नसेल. साहित्य, संगीत, नाटक, चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ, एकपात्री प्रयोग, सांस्कृतिक सांस्कृतिक, संस्था, संस्था उभारताना दाखवलेलं द्रष्टेपण, प्रशासन, निरूपण, काव्यवाचन, नाट्यवाचन, सामाजिक कार्य, चर्चा, मैफिली इत्यादी इत्यादी. नाटक आणि चित्रपटात तर या माध्यमांच्या सर्व विभागांमध्ये त्यांनी मोलाची कामगिरी केली आहे. नाटककार, अभिनेता, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद या सर्व विभागात त्यांनी त्याच ताकतीने काम केले आहे.

साहित्यिक म्हणून भाईंचा परिचय महाराष्ट्राला आणि देशाला जवळ जवळ साठ-पासष्ठ वर्षांचा आहे. महाराष्ट्रातल्या कित्येक पिढ्या भाईंच्या साहित्याची पारायण करीत वाढल्या आहेत. खेड्यापासून शहरापर्यंत, सामान्यांपासून विद्वानांपर्यंत, गुंडापासून पुंडापर्यंत, नेत्यापासून कार्यकर्त्यापर्यंत, लहानापासून मोठ्यापर्यंत, देशापासून परदेशापर्यंत ज्यांचं साहित्य केवळ वाचलंच नाही तर पुजलं जातं असा दुसरा साहित्यिक मिळणं कठीण. पु.ल. देशपांडेंचं पुस्तक घरात नाही असं एकही घर या महाराष्ट्र पठारावर मिळणं अशक्य. आजही लाखो लोक भाईंची पुस्तक नित्यनेमाने वाचणारे आहेत. भाईंनी आपल्या साहित्यात चितारलेली माणसं पुन:पुन्हा समजून घेऊन आपला आनंद द्विगुणित करीत आहेत. साहित्यिकाला असा आणि एवढा वाचकवर्ग लाभणं आणि वाचकाला असा साहित्यिक मिळणं हा योगायोग विरळाच.

भाईंच्या साहित्याबद्दल खूप बोललं गेलंय, लिहिलं गेलंय, लिहिलं जातंय. त्यांच्या साहित्यावर बोलावं असा माझ्याकडे कुठलाही अधिकार नाही. मी एक सामान्य वाचक आणि त्याच भूमिकेत राहायला मला अधिक आवडेल. पण एक रंगकर्मी म्हणून, विशेषत: तरुण पिढीचा रंगकर्मी म्हणून, भाईंचं नाट्य माध्यमातलं योगदान, त्यांनी नाटकाच्या विकासात घातलेली भर, मराठी रंगभूमीला परिचित नसलेली दालनं उघडण्याचं केलेलं महत्त्वपूर्ण काम, नाटक या व्यवसायाला लावलेली शिस्त, रंगभूमीवर केलेले अनोखे प्रयोग आणि या सगळ्यांतून नाटकाला लावलेलं वेगळं वळण हे माझ्या दृष्टीनं फार महत्त्वाचं आहे.

दहा वर्षांच्या सहवासात मला भाई जाणवत राहिले ते एक अत्यंत संवेदनशील माणूस म्हणून. वास्तवात घडणाऱ्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घडामोडींमुळे भाई कधी आनंदी तर कधी टोकाचे अस्वस्थ होताना मला दिसले. मुंबईत दंगली, बॉम्बस्फोट झाल्यानंतरचे भाई मी प्रत्यक्षात पाहिले

ज्या जगात मी आलो ते हे जग मृत्यूपूर्वी मी सुंदर करून जाईन अशी जिद्द हवी. केवळ विद्यार्थ्यांबद्दलच नव्हे तर आपल्या सर्वच समाजाबद्दल माझी ही तक्रार आहे की, आपण जीवनाकडे पाहतच नाही. तरुण असंतुष्ट म्हणून ओरड होते. मी म्हणतो तरुण असंतुष्ट नाहीत तो काय देश आहे? तरुणांनी असंतुष्टच राहिले पाहिजे. पण ते या अर्थाने की त्यांनी जीवनाचे आव्हान स्वीकारायचे. "प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयार खोदा" असे केशवसुतांनी सांगितले आहे. त्यातील 'लेणी' हा शब्द फार सुंदर आहे. त्यांनी चित्रे रंगवा असे म्हटले नाही. तर, कलानिर्मिती ही त्याहून अवघड कामगिरी आहे. ही निर्मिती सहजासहजी होत नाही. त्यासाठी पत्थर फोडून त्याच्याशी झुंज द्यावी लागते. हे आव्हान तुम्ही स्वीकारा, तशी जिद्द बाळगा, एवढेच माझे आजच्या तरूण पिढीला सांगणे आहे.

**– पु. ल. देशपांडे**

आहेत, बाबरी मसजिद पडल्यानंतरही मी त्यांना जवळून पाहिले आहे, रशियाचे तुकडे होताना भाईंच्या चेहऱ्यावरची काळजी, चिंता मी अनुभवली आहे. भारत मॅच जिंकतोय म्हटल्यावर हुरळून जाणारे भाईही मी अनुभवले आहेत, माझ्या नाटकांना व्यावसायिक स्पर्धेत तीनही पारितोषिके मिळाली तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडणाऱ्या आनंदाचाही मी साक्षी आहे, तालमीत एखाद्या गायिकेनं घेतलेली तान/हरकत पटताच मनसोक्त दाद देत प्रोत्साहित करणारे भाईही मला माहीत आहेत. समोर घडणाऱ्या घटनांना, स्थित्यंतरांना मनसोक्त दाद देणं हा भाईंचा 'स्थायी भाव'. मग दाद देताना ते कधी विनोदाचा आसरा घेतात, तर कधी भावविभोर शब्दांना थरथरणाऱ्या ओठांचा आसरा देतात. एक नाटककार म्हणून भाई मला जाणवत राहिले ते हे असे. 'सुंदर मी होणार'मधील स्वातंत्र्य संकल्पनेचा पाठपुरावा आणि प्रतिभेला कुठल्याही चौकटीत जेरबंद करता येत नाही हे वास्तव लोकांसमोर मांडणारे भाई कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा समाजाला भोंगळवादाकडेच नेणार, त्यामुळे सबंध मानवी नातीच भरडली जाणार, हे 'तुजं आहे तुजपाशी'मध्ये सत्यचित्र दाखवणारे भाई, सत्तेवर राहण्यासाठी आत्म्याचा कौल सोडून भ्रष्टाचाराचा आसरा घेणारे आमचे नेते आणि त्या खेळामध्ये निष्पाप लोकांचा जाणारा बळी, जीवन म्हणजे एक योगायोगाची साखळी नसून ते तुम्ही घडवायला इवं, नीट रचायला हवं असं 'एक झुंज वाऱ्याशी'मधून सांगणारे भाई बदलत्या परिस्थितीला सामोरं जात आपली नाट्यजाणीव समृद्ध करतात. त्यांची नाटकंच मुळी त्या त्या काळातल्या आंतरिक अस्वस्थतेला त्यांनी मोकळी वाट करून दिल्याचं सांगतात. भाईंनी स्वतंत्र नाटकं खूप कमी लिहिली असतील परंतु जी रूपांतरित केली त्यांची निवडही त्यांनी त्या त्या काळातल्या सामाजिक, राजकीय घडामोडीला दिलेला प्रतिसाद वाटतात. रूपांतराची हातोटी हा तर भाईंचा केवळ अद्वितीय विशेष. त्यांनी सांगितलं नसतं तर त्यांनी रूपांतरित केलेली नाटकं ही रूपांतरित आहेत असं कोणालाही वाटलं नसतं. त्यांचं



रूपांतरकौशल्य हे तर रूपांतरशास्त्रातला वस्तुपाठ म्हणून शिकावं, शिकवलं जावं असं अद्वितीय.

भाईंना वास्तवातही माणसांची विलक्षण ओढ आहे. त्यांच्या अवतीभोवती जमणारी एका दिवसातली माणसं पाहिली तरी त्याचा प्रत्यय येतो. वेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीची, वेगवेगळ्या स्वभावविशेषांची, निरनिराळी रंग, रूप, आकार असलेली माणसं अनुभवणं, अजमावणं, समजून घेणं ही त्यांची मोठी आवड. त्यांच्या साहित्यांतून, नाटकांतून, एकपात्री प्रयोगांतूनही याचा अनुभव आपल्याला येत राहतो. जिवंत हाडामांसांची, वेगवेगळ्या वळणाची, भावविश्वाची माणसं 'वेगळ्या' नजरेतून उभी करणं हा भाईंचा एक अन्यन्यसाधारण विशेष.

आम्ही कथा-कादंबऱ्या लिहितो म्हणजे काय करतो? माणसांच्या अंत:करणातले कढ लिहित असतो ना? साहित्यिकाला जे वाटते ते सांगण्याचा, लिहिण्याचा हक्क आहे. ही सनद काही कोणा पक्षाने दिलेली नाही. ही पूर्वापार चालत आलेली सनद आहे! 'झूट बोले कौआ काटे' हे लिहावयासाठी आम्हांला विचारस्वातंत्र्य नकोय. ज्या ज्या क्षणी जे जे झोंबते ते लिहिण्याचे स्वातंत्र्य आम्हांला हवे आहे.

– पु. ल. देशपांडे

भाई म्हणतात 'नाट्य निकेतन'मध्ये गेल्यानंतर मो. ग. रांगणेकरांच्या सहवासात आणि नाटकात त्यांना दिग्दर्शक म्हणून वेगळी अनुभूती आली. नाटकातल्या 'कंपोझिशन'चा अर्थ त्यांना उमगला. त्यांच्या दिग्दर्शनात ही संवेदना पुढे वाढीला लागलेली एक नाट्य दिग्दर्शक म्हणून मला दिसली. नाटक ही मिश्रकला आहे. यात वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, चित्रकला, नृत्य, नाट्य, संगीत, वातावरण यांचं मिश्रण असतं. रंगवलेल्या पडद्यासमोर घडणाऱ्या 'टु डायमेन्शनल' नाटकाचं रूपांतर वरील गोष्टी वापरून 'थ्री डायमेन्शनल' करण्यात भाईंचाही सिंहाचा वाटा आहे. नाटकात कंपोझिशनचा वापर, त्यातल्या प्रत्येक फ्रेमचा केलेला विचार त्यांच्या नाटकात जाणवत राहतो. नेपथ्य, प्रकाशयोजना, रंग, रेषा, रूप, आकार, पोत, नटाच्या शरीराची रचना आणि मांडणी, रंगभूषा, शब्द, स्वर, ताल, लय, संगीत यांचा



वापर भाईंच्या कंपोझिशनमध्ये जाणीवपूर्वक डोकावतो. नाटकाच्या सदरीकरणातही भाईंनी असंख्य प्रयोग केलेले आहेत. कॉमेडी, ट्रॅजेडीच्या तत्त्वांसहित त्यांनी वापरलेला मुक्त नाट्याच्या बाजाचाही त्यात समावेश आहे. एकपात्री प्रयोग, रेव्ह्यूज, म्युझिकल्स ही भाईंनी भारतीय रंगभूमीला दिलेली देणगी आहे. या मोकळ्या केलेल्या वाटेवरून आज कितीतरी प्रयोग होताना दिसताहेत. भाईंचं द्रष्टेपण आजच्या रंगभूमीच्या विकासाचा पाया आहे.

एकपात्री लोकनाट्याची परंपरा भारताला तशी नवीन नाही. कीर्तन, प्रवचन, निरूपणाच्या विविधाविष्कारातून ती जीव धरून होती आणि आहेही. परंतु भाईंनी या परंपरेची 'मिती'च बदलली. एकपात्री परंपरेला बहुपात्री रूप देऊन आधुनिक संवेदनेनं तिला सिंचली आणि भारतीय आधुनिक नाटकात तिला मानाचं स्थान प्राप्त करून दिलं. भाई स्वत: उत्तम आणि चुतरस्त्र अभिनेते नसते तर हे शक्य झालं असतं का मला कळत नाही. परवाच 'बटाट्याच्या चाळी'ची कॅसेट पाहिली आणि अभिनेता म्हणून भाईंच्या उत्तुंगतेचा परिचय झाला. उत्स्फूर्तता, लवचिकता, शरीरभाषेचा त्यांनी केलेला वापर, आवाज बदलातली हुकमत, भाषेचा वापर, शब्दांशी त्यांनी केलेले खेळ, उच्चारणातली सहजता, शब्दांमधलं शोधलेलं संगीत, शब्दफेकीमधील अचूकता, रंगमंचावरून ओसंडून वाहणारी ऊर्जा, शिताफीनं लपवलेली दमछाक, शेवटपर्यंत टिकवलेला जिवंतपणा अशा कितीतरी—प्रत्येक नटाला आवश्यक असणाऱ्या—गोष्टी भाईंनी जपल्या होत्या. एकाच प्रयोगात उभी केलेली कितीतरी माणसं, त्यात गायनाचे केलेले प्रयोग, शारीरिक हालचालीतून उभी केलेली पात्रं आणि निर्भाषिकाचा वापर हे सगळं वेड लावणारं. आजच्या नटनट्यांनी भाईंकडून एवढं जरी शिकलं तरी ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलावंत सहज होतील, यात मला एक दिग्दर्शक म्हणून आणि प्रशिक्षक म्हणून कुठलीही शंका वाटत नाही.

भाईंच्या सान्निध्यात आणखी एक गोष्ट मला रंगकर्मी म्हणून प्रकर्षाने जाणवली; ती म्हणजे 'परफेक्शन'साठी त्यांची चाललेली धडपड. त्यांनी जे जे काही केलं त्यात त्यांनी जीव ओतला. शेवटच्या क्षणापर्यंत ती गोष्ट नीट व्हावी म्हणून ते लढत राहिले. एन. सी. पी. ए.मध्ये त्यांनी आणि डॉ.

रानड्यांनी संगीताचे काही कार्यक्रम सादर केले. त्याच्या तालमी मी आवर्जून पाहिल्या. गळ्यातून एक एक हरकत नीट बाहेर पडावी म्हणून भाई गायकांना वेगवेगळ्या पद्धतीनं समजावून त्या परिणामापर्यंत पोहोचवत. बैठकीची लावणी, देवगाणी, मानापमानातील गाणी, सावन अशा कितीतरी कार्यक्रमांचं निरीक्षण करताना मी भाईंना ऐकलंय. शिवाय सुनीताबाई आणि त्यांनी सादर केलेल्या कवितावाचनाचा मी साक्षीदार आहे. तिसऱ्या घंटेच्या आधी भाईंना मी खूप अस्वस्थ होताना पाहिलं आहे. मला वाटे, भाई सिद्धहस्त 'परफॉरमर' मग हे उगीचच का टेन्शन घेताहेत? परंतु रंगमंचावर जाण्यापूर्वी जणू काय ते पहिल्यांदाच रंगमंचावर जाणार आहेत असं वाटे. रंगमंचावर गेल्यानंतर आणि प्रेक्षक पाहिल्यानंतर त्यांची ती अस्वस्थता कुठच्या कुठे जाई आणि भाई एका वेगळ्याच विलक्षण तेजाने तेजाळलेले मी पाहिले आहेत. हल्ली दिसणारा 'बनचुकेपणा' त्यांच्या वागण्यात मला कधीही दिसला नाही, जाणवला नाही. 'एक झुंज वाऱ्याशी'चा पहिला प्रयोग मला आठवतो. ते लेखक आणि मी दिग्दर्शक. मला खूप टेन्शन आलेले. मी दिवसभर एन.सी.पी.ए.च्या प्रायोगिक नाट्यगृहामध्ये ठाण मांडून बसलेलो. भाई त्या दिवशी सकाळपासूनच अस्वस्थ. दर अर्ध्या तासाने थिएटरमध्ये यायचे. विचारायचे, "सगळं तुझ्या मनाप्रमाणे झालंय ना? सगळं नीट लागलंय? लाईट्स नीट झाल्यायत?" नटांना, मला कॉन्फिडन्स द्यायचे, पण मला जाणवायचं ते स्वत: आतून खूप अस्वस्थ आहेत.

प्रयोगघटिका जवळ जवळ येत होती. वातावरण अधिकच गंभीर होत चाललं होतं. तिसरी घंटा व्हायची होती. मी लाईट कॅबीनमध्ये तंत्रज्ञानांच्या सोबत बसलो होतो. अचानक भाई आत आले आणि म्हणाले, "मला इथं बसून प्रयोग बघता येईल का?" मी म्हणालो, "भाई, तुम्ही प्रेक्षकांत बसून प्रयोग बघणार आहात. तुमची जागा राखून ठेवलीय." ते काही जायला तयार होईनात. शेवटी मी आणि श्री. विजय देसाई यांनी जबरदस्तीनं त्यांना प्रेक्षागृहात नेलं. ते म्हणाले, "मी एका अटीवर आत बसेन. जर तुम्ही मला शेवटच्या रांगेत बसू दिलं तरच." ते कुणालाही दिसणार नाहीत अशा ठिकाणी शेवटच्या रांगेत बसून होते. प्रयोग संपल्यानंतर रंगमंचावर आले आणि माझं, कलावंत, तंत्रज्ञांचं खूप कौतुक केलं. तिसऱ्या घंटेपूर्वीची चेहऱ्यावरची त्यांची अस्वस्थता जाऊन त्यांचा चेहरा आता समाधानाने उजळलेला मी पाहिला.

भाई नेहमी म्हणतात, "माझं लिखाणसुद्धा एक परफॉरमन्सच आहे." त्यांचं साहित्य वाचतानाही याचा अनुभव वाचकांना येत असावा. आपण जे वाचतोय ते कुणीतरी आपल्या कानात सांगतंय, बोलतंय असंच वाटतं राहतं. भाई निखळ गप्पा मारत असले तरी त्यांच्यातला परफॉरमन्स आपल्याला जाणवत राहतो. शेक्सपिअरच्या भाषेत सांगायचं तर जगणं हाच मुळी एक परफॉरमन्स आहे. जगताना आपण किती मन लावून आणि एकाग्रतेने जगलो, त्यात किती समाधान मिळवलं हे महत्त्वाचं वाटतं. भाईंनी सर्वच क्षेत्रांतील सहभागाला परफॉरमन्सची जोड दिली आणि त्यातला प्रत्येक परफॉरमन्स हा परिपूर्णतेकडे नेला आणि एका क्षेत्रात एक माणूस जेवढी उंची गाठेल त्यापेक्षा कितीतरी उत्तुंग अशी शिखरं त्यांनी प्रत्येक क्षेत्रात गाठली. त्यांना त्या उंचीपर्यंत घेऊन गेला तो त्यांच्यातला परफॉर्मरच.

भाईंनी भाषेच्या संदर्भात जेवढे प्रयोग लिखाणात आणि सादरीकरणात केले असतील तेवढे प्रयोग जगातल्या कुठल्याही कलावंताला शक्य झाले नसतील. भाषा ही प्रत्येक माणसाप्रमाणे बदलते किंबहुना शब्द, भाषा आणि उच्चारण हा भूमिकेचा आत्मा असतो हे भाईंना पुरेपूर कळलं होतं. महाराष्ट्रातल्या एकाही विभागातली भाषा आणि उच्चार त्याच्या हातून सुटला असेल असं वाटत नाही. लिखित भाषेची जाण तर त्यांना होतीच पण उच्चारित भाषा त्यांनी ज्या ताकतीने रंगमचांवर आणली आणि ती सादर केली त्याला तोड नाही.

जो जे वांछील तो ते लिहो यामागे जीवन अधिक सुंदर करण्यासाठी, दुरितांचे तिमिर घालविण्यासाठी, ही भावना नसेल तर कलानिर्मितीच्या मुख्य प्रेरणेशीच ती प्रतारणा होईल. आणि म्हणून इथे लेखक आणि वाचक या दोघांनाही आपली जबाबदारी कळायला हवी.

**– पु. ल. देशपांडे**

शब्द आणि स्वर त्यांच्यासमोर झुकून उभे राहताना मी अनुभवले आहेत. शब्दातलं आशयचित्र, अर्थचित्र आणि दृश्यचित्र लोकांपर्यंत पोहोचवावं ते भाईंनीच. म्हणून शब्द, स्वर त्यातली लय आणि ताल हे भाईंच्या कंठातून बाहेर पडण्यासाठी आसुसलेले मी अनुभवले आहेत. याबाबतीत तर जगातल्या कुठल्याही कलावंताने भाईंचा हेवा करावा असंच हे त्यांचं वैभव.

भाईंनी आपल्या साहित्यात, नाटकात, विविध रंगमंचीय आविष्कारात मनोरंजनाची कास कधी सोडली नाही. अभिरुचीसंपन्न आणि दर्जेदार मनोरंजन हा त्यांच्या आविष्काराचा आत्मा. त्यात त्यांनी कधी तडजोड केली नाही. मनोरंजनाच्या कक्षा रुंदावण्यावर त्यांनी भरच दिला. परंतु आपला आविष्कार केवळ मनोरंजनाच्या पातळीवरच ठेवल्याचंही कधी त्यांच्या आविष्कारातून जाणवत नाही. मनोरंजनातून रसिकांना आणि प्रेक्षकांना जीवनानुभवापर्यंत नेण्याचा गांभीर्यानं प्रयोग केला. म्हणूनच भाईंचं साहित्य आणि नाटक लोक विसरता विसरत नाहीत. आपल्या कलाविष्कारामागे आपलं चिंतनही त्यांनी महत्त्वाचं मानलेलं जाणवतं. मग ते 'तुझे आहे तुजपाशी' असो, 'एक झुंज वाऱ्याशी' असो नाही तर 'व्यक्ती आणि वल्ली' असो. या प्रत्येक आविष्कारात त्यांनी आम्हाला जीवनाच्या वेगवेगळ्या वळणावर नेऊन उभं केलंय आणि जगण्याचं त्यांना मिळालेलं भान आम्हाला देण्याचा प्रयत्न केलाय. वरकरणी विनोदी वाटणाऱ्या माणसांमधून त्यांनी आम्हाला जगण्याच्या मूलतत्त्वांशी नेऊन ठेवलंय. भाई तुमचे अनंत उपकार आम्ही कधीच विसरू शकत नाही.

भाई, काळजी वाटते, चिंता वाटते ती आजची. आज आमचा माणूस कधी नव्हे एवढा माणसांपासून, समाजापासून राष्ट्रभावनेपासून दूर चाललाय. धर्माच्या नावावर तो मंदिरं, मसजिदी, चर्च उद्ध्वस्त करत सुटलाय. स्वातंत्र्याच्या नावानं स्वैराचार करत सुटलाय. 'माझं ते माझं आणि तुझं तेही माझंच' अशा वृत्तीचा बनत चाललाय. आपल्या स्वार्थासाठी तो निष्पाप जीवांना ओलीस ठेवू लागलाय. भ्रष्टाचारी, स्वार्थी प्रवृत्तीचा सुळसुळाट झालाय. विवेक हरवून तो अतिरेकी होत चाललाय. काश्मीर, पंजाब, उत्तरपूर्व भागात त्यानं हाहाकार उडवून दिलाय. त्याला दुसऱ्याचा जीव हा आपल्या गोळीचा खेळ वाटू लागलाय. निष्पाप स्त्रिया-पोरं ही त्याची शिकारक्षेत्र झाली आहेत. भाई, तुम्ही 'आणीबाणी'त उभे राहिलात तुम्हाला अत्याचार दिसत होता म्हणून. तुम्ही त्याचा मुकाबलाही आपल्यापरीने केलात. आजची आणीबाणी ही वेगळी आहे. तिच्या विरोधात तुम्हाला उभं राहा तरी कसं म्हणावं? मात्र तशी गरज पडली तर आजच्या साहित्यिकांना, रंगकर्मींना, कलावंतांना या वेगळ्या दमन चक्राच्या विरोधात समक्ष उभं राहायला प्रेरणा द्या, बळ द्या, आशीर्वाद द्या.

. . . . . . . . . . . . . . . . **वामन केंद्रे**

*हा लेख लिहिताना डॉ. शुभदा शेळके आणि मुक्ता राजाध्यक्ष यांचे मोलाचे सहकार्य लाभले म्हणून हा लेख मी लिहू शकलो.*

दरिद्री शाळा हा राष्ट्रीय काळिमा आहे असे आम्हांला वाटतच नाही. गावातले सर्वांत मनोहर स्थान म्हणजे गावातली शाळा, गावाच्या सुसंस्कृततेचा सर्वांत मोठा पुरावा म्हणजे गावातल्या सार्वजनिक मुताऱ्या आणि जिथे लहान-थोर स्त्री-पुरुष एकत्र येऊन संध्याकाळी खेळतात आणि खेळ पाहतात अशी क्रीडांगणे आणि फुलांनी बहरलेल्या सार्वजनिक बागा ही गावाची श्रीमंती असे आपल्यापैकी कितीजणांना वाटते? असल्या ह्या आपल्या देशात 'संस्कृती', 'शिक्षण' वगैरे शब्दही उच्चारायला लाज वाटते. यावर उपाय शोधला आहे तो सरकारीकरणाचा. म्हणजे रोगापेक्षा उपाय अधिक धोक्याचा. 'मुक्तता' हा ज्या कार्यपद्धतीचा पाया त्या शिक्षणपद्धतीला जखडले आहे सरकारी नियमांत. शिक्षकांचे initiative काढून घेतले आहे. म्हणजे शिकवण्यात रस नसलेले गुरुजी आणि शिकण्यात रस नसलेले शिष्य यांना एकत्र बांधून ठेवले आहे आणि आम्ही 'शिक्षण' देत व घेत आहो अशा भ्रमात राहतो आहो.

– पु. ल. देशपांडे



# एक मनस्वी व्यक्तिमत्त्व

## वसंत दावतर

प्रा. वसंत दावतर यांची माझी ओळख तशी फार पूर्वीपासूनची. पण त्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत व्हायला खूपच काळ जावा लागला आणि आजही परस्परांबद्दल खूप आपुलकी असली, सद्भावना असली तरी त्या मैत्रीत एक सीमारेखा आहे. त्यांच्या-माझ्यात

एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून हास्यविनोद करीत, कधी मस्करी करीत, एकमेकांच्या फिरक्या घेत, एकमेकांवर काहीवेळा रागावत रुसत आणि तो राग त्वरित विसरून परत खिदळत जाण्याचे प्रसंग कधीच आले नाहीत. तरीही प्रा. दावतर यांच्याविषयी मला नेहमीच स्नेहभाव वाटत राहिला आहे. या स्नेहभावात आदराचा, सौजन्याचा भाग अधिक आहे.

प्रा. वसंत दावतर सोमैय्या कॉलेजमध्ये मराठीचे विभागप्रमुख म्हणून रूजू झाले त्यापूर्वी वाङ्मयक्षेत्रात वाङ्मयाचा एक जाणकार म्हणून मी त्यांना दुरूनच ओळखत होतो. मुंबई मराठी साहित्य संघात त्यांनी एक व्याख्यानमाला आयोजित केली होती. त्या व्याख्यानांना मी उपस्थित असे. व्याख्यान संपल्यानंतर आभारप्रदर्शनाचे काम दावतर करीत. त्या दोन ते तीन मिनिटांच्या भाषणात दावतर झालेल्या व्याख्यानाविषयी मतप्रदर्शन करीत. त्यात व्याख्यात्यांच्या शैलीबद्दल काही मोजकी पण अतिशय समर्पक व समतोल विधाने असत. दावतरांच्या भाषणात व्याख्यानबाजी करणाऱ्यांचा रुबाब आणि प्रचंड आत्मविश्वास नसे. पण विलक्षण नेमकेपणा असे. या माणसाकडे साहित्याच्या मर्मशोधनाची दृष्टी आहे याचा सुखद प्रत्यय त्यावेळी मला आला व पुढेही येत राहिला.

पुढे दावतरांनी एक अभिनव प्रयोग मराठी समीक्षाक्षेत्रात केला. त्यांनी 'आलोचना' नावाचे 'केवळ समीक्षेला वाहिलेले' मासिक सुरू केले. यातला अभिनव भाग म्हणजे या मासिकातील लेखांवर समीक्षकांची नावे नसत. मला या उपक्रमाचे सशंक कौतुक वाटत असे. एकतर त्यावेळी सत्यकथेचा फार मोठा दबदबा होता. सत्यकथेत आपली कविता छापून आली आता 'मरायला मोकळी झाले' असा आनंदोद्‌गार काढणाऱ्या कवयित्रीचे समाधान मला माहीत आहे. सत्यकथेत छापून आल्याची नाममुद्रा उमटली की तो मराठीतील मान्यवर लेखक, कवी वा समीक्षक झाला असेही मानले जाई. अर्थात सत्यकथेत लेखनाची निवड चोखंदळपणे होत होती आणि मराठीतील सर्वच साहित्यिकांना तिथे प्रतिष्ठा होती यात शंका नाही. असे असले तरी, जेव्हा मोजकीच माणसे साहित्याची निवड करू लागतात तेव्हा व्यक्तींच्या आवडीनिवडी, रागलोभ, आस्वादाच्या सीमा यांच्यामुळे मर्यादा पडतातच. अशावेळी साहित्यिक, सांस्कृतिक वातावरणात प्रसंगी नेटाने विरोधी भूमिका घेणाऱ्या आणि वेगळा विचार मांडणाऱ्या माणसांची, संघटनांची, संस्थांची मोठी गरज असते. साहित्यिक आस्वादाच्या या मर्यादांना काही पायबंद घालणे, वेगळ्या वाटा सुचविणे, उपेक्षितांना यथायोग्य स्थान देणे आणि अभावितपणे, अजाणता झालेली दादागिरी रोखणे आवश्यक असते. वसंत दावतरांनी ही गरज ओळखून समीक्षेपुरते का होईना पण एक माध्यम योग्यवेळी व्यवहारात आणले हे मराठी वाङ्मयाला झालेले त्यांचे मोलाचे योगदान आहे असे मला वाटते.

समकालीन साहित्यव्यवस्थेतील प्रस्थापित विचार, व्यक्ती वा संस्था यांचा अनुनय आलोचनेने कधीही केला नाही. किंबहुना प्रस्थापित व्यवस्थेमधील अंतर्गत विसंगतींवर, भोंगळपणावर व्याजवैचारिकतेवर तिने नेहमीच टीकास्त्र सोडले. हा विरोधासाठी विरोध नव्हता किंवा जुन्याशी नव्याचा झगडाही नव्हता. साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात ज्या वस्तुनिष्ठतेची, तर्कनिष्ठतेची, शिस्तीची अपेक्षा आलोचनेला होती त्यासाठी धरलेला तो हट्टाग्रह होता. हा हट्टाग्रह हे वसंत दावतरांच्या व्यक्तिमत्त्वाचेच एक प्रतिबिंब होते असे म्हणता येईल.

ही कामगिरी फारच बिकट होती. त्यातच आलोचनेत लिहिणाऱ्यांना आर्थिक मोबदला मिळत नसे. आर्थिक लाभाची अपेक्षाही एकवेळ लेखक बाजूला ठेवू शकतो. पण दावतरांनी जोखीम पत्करली होती ती समीक्षकाचे नाव लेखाबरोबर न देण्याची. ही खरोखर मोठी जोखीम होती. मम्मटाने साहित्याच्या प्रयोजनांची चर्चा करताना फार मोठे प्रयोजन अगदी आरंभीच नोंदवले आहे, "काव्यम् यशसे अर्थकृते....." अर्थाची अपेक्षा न करणे चालू शकते पण लेखनातून यशही मिळत नसेल तर लिहिण्याची मोठी आधारशिलाच डळमळते. आरंभी आरंभी काही तरूण नवोदित लेखक हे निष्काम कर्म सृजनात्मक उर्मीने करतीलही पण लेखनासंबंधी हुकमत आल्यावर हे कठीण आहे. प्रा. दावतरांचा या मागचा हेतू फारच उच्च होता हे समजू शकते. लेखनावर नाव नसेल तर लेखकाला विशेषत: समीक्षकाला एक स्वातंत्र्य मिळते. ते स्वातंत्र्य म्हणजे सृजनशील लेखकाला काय वाटेल, आपले संबंध बिघडतील या भयापासून काहीशी मुक्ती मिळते. समीक्षात्मक लेखन अधिक काटेकोर, अधिक वस्तुनिष्ठ, अधिक साक्षेपी, अधिक मोकळेपणाने होण्याची शक्यता वाढते. मात्र त्याचबरोबर ते नको तितके परखड, निर्मम आणि घणाघातीही होण्याचे भय असते. मला वाटते, या टोकालाही काही समीक्षा गेली आहे. तरीही, समीक्षकाकडे समीक्षक म्हणूनच पाहावे, पूर्वग्रहाने लेखनातील विचारसरणीचे किंवा प्रतिपादनाचे मूल्यमापन होऊ नये, व्यक्तिनिष्ठेने लेखनाकडे पाहाण्याच्या प्रवृत्तीत बदल व्हावा या हेतूने दावतरांनी शेवटपर्यंत हे धोरण



बदलले नाही. आणि पूर्वप्रसिद्ध लेखांव्यतिरिक्त व पत्रांव्यतिरिक्त आलोचनेत प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही लेखनावर नामनिर्देश दिला गेला नाही.

आलोचनेच्या या धोरणामुळे लेखकाला पैसा नाही तरी चारसहा जाणकारांची मते (शक्य तर 'वाहवा 'वाहवा') ऐकायला मिळावीत ही त्याची प्रामाणिक इच्छा पूर्ण होत नसे. चौथ्या वर्षाच्या बाराव्या अंकात या धोरणासंबंधीची चर्चा प्रसिद्ध झाली आहे. अखेरीस आलोचनेने वर्षभरातल्या लेखनाची सूची द्यावी असे ठरले. तितका वेळ थांबायचा, वाट पहायचा, धीर धरायचा एक संयमाचा पाठच दावतरांनी लेखकांना शिकवला असे म्हटले पाहिजे.

दावतरांनी कष्टाने, धडपडीने आणि जबाबदारीने एकोणतीस वर्षे आलोचना हे मासिक प्रकाशित केले. या सर्व जोखिमेबद्दल, धडपडीबद्दल मराठी वाचकाने कृतज्ञता दाखवायला हवी. अंशत: ही कृतज्ञता त्यांना मिळालेल्या या पुरस्कारातून व्यक्त झाली याचा मला व्यक्तिश: अतिशय आनंद झाला. लोकप्रिय प्राध्यापकांजवळ ज्या गोष्टी असतात त्या दावतरांच्या व्यक्तिमत्त्वात नसाव्यात. तरीही त्यांनी आपल्या भोवती होतकरू लेखकांचा, समीक्षकांचा गोतावळा जमा केला. त्यांच्या निष्काम कार्यरततेच्या मदतीने मराठी समीक्षा निश्चितच अधिक संतुलित झाली. वस्तुनिष्ठ झाली. या कार्यात दावतरांना मदत करणाऱ्या तरूण समीक्षकांनाही धन्यवाद द्यायला हवेत. प्रा. वसंत दावतर यांनीच हे लिहिले पाहिजे.

प्रा. दावतर विचक्षण आहेत. त्यांची मते अतिशय घट्ट असतात. त्यासाठी ते पडेल ती किंमत मोजायला तयार असतात. आणि हा केवळ स्वत:च्या मताचा आग्रह नसतो. वस्तुनिष्ठतेच्या, तर्काच्या कसोटीवर सिद्ध झालेल्या विचारांचा आग्रह असतो. प्रा. वसंत दावतरांशी माझे मतभेद झालेले आहेत. एखाद दुसऱ्या बैठकीत आम्ही टोकाच्या भूमिका घेतल्या आहेत. मात्र त्या मतभेदांची पातळी बौद्धिक मतभेदापुरतीच राहिली हे माझे नशीब. आणि प्रा. दावतरांच्या मनाचा मोठेपणा. एकदा तर त्यांना मध्येच अडवल्यामुळे त्यांनी 'याबद्दल तुम्ही क्षमा मागितली पाहिजे' अशी हट्टी भूमिका घेतल्याचे आठवते. मात्र नंतर सर्व मतभेद चहाच्या पेल्यात विरघळले.

माणसांशी मतभेद राहिले नाहीत किंवा ते चहाच्या पेल्यात विरघळले तरी दावतर आपला विचार आणि त्याबरहुकूम कृती सोडत नाहीत. शुद्धलेखनाविषयीची त्यांची विचारसरणी आणि व्यवहार हे याचे एक उत्तम उदाहरण आहे. मराठीत शुद्धलेखनाचा वाद निर्माण झाला. शुद्धलेखनात काही बदल होऊन नवे शुद्धलेखन आले. प्रा. दावतर यांना ते




मान्य नव्हते. या प्रश्नाची तात्त्विक चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. (आणि ते मला जमणारही नाही.) पण दावतरांनी नव्या शुद्धलेखनाचा स्वीकार केला नाही. त्यांचे आलोचनेचे लेखक नव्या शुद्धलेखनाप्रमाणे लिहीत. दावतर कटाक्षाने त्या शुद्धलेखनाला जुन्या नियमांप्रमाणे संशोधित करीत. हा सर्व व्याप त्यांनी सहन केला. या सर्व व्यापात दावतरांची खूपच शक्ती खर्च झाली असावी.

या संदर्भात आणखी एक गोष्ट लिहावीशी वाटते. प्रा. दावतरांसारखे लेखनशक्ती प्राप्त झालेले विद्वान जेव्हा संपादकीय जबाबदारी स्वीकारतात तेव्हाच त्यांनी एक मोठा त्याग केलेला असतो. लेखनाची निवड करताना न स्वीकारण्यासारखे साहित्य वाचावे लागते (आणि त्याचे प्रमाण फारच मोठे असते.) आणि स्वीकारलेल्या लेखांवर संस्कार करावे लागतात. हे ध्यानात घेतले तर संपादक या प्राण्याबद्दल, त्याच्या निष्काम सेवेबद्दल मला नेहमीच कौतुक वाटत राहिले आहे. आलोचनेसारखे केवळ समीक्षात्मक लेखन प्रसिद्ध करणारे मासिक किती कष्टातून सिद्ध होते याचा विचार केला तर दावतरांबद्दलचा आदर फारच बळावतो.

एका बाजूला आलोचनेचे संपादन चालू असतानाच दावतरांनी चर्चासत्रेही आयोजित केली. त्यातील चर्चा संकलित करून, महत्त्वाच्या विषयांवर संबंधितांकडून लिहून घेऊन महत्त्वाचे विशेषांक प्रसिद्ध केले. हे सर्व पाहिले की या माणसाच्या चिकाटीबद्दल आश्चर्य वाटते. मला त्यांनी 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्राप्त झालेल्या लेखकांवर, ग्रंथांवर आलोचनेचा विशेषांक संपादित करायला सांगितले होते. मी तो यथाशक्ती सिद्धही केला. पुढे काही काळाने तो अंक प्रसिद्ध होईल की नाही याविषयी शंका निर्माण झाली. त्यामुळे मी खूपच खट्टू झालो, दावतरांवर रागावलोही. त्याचवेळी दूरदर्शनवर आलोचनेच्या कार्याविषयी एक चर्चा घेण्याचे

ठरत होते. यासंबंधी दावतर काही मित्रांसमवेत माझ्याकडे आले. मी रागात असल्याने सहभागी व्हायला नकार दिला. दावतरांना हे फारच खटकले. नंतर त्यांनी दूरदर्शनवरचा तो कार्यक्रम रद्दच केला. पुढे ज्ञानपीठ विशेषांक छापला गेला. त्यावेळी मला माझ्या वागण्याची शरम वाटली - आजही ती आहे. त्यावेळी मी दावतरांच्या अडचणी समजून घेऊन सहकार्य करायला हवे होते, असे आजही वाटते. तो कार्यक्रम रद्द करून मला त्यांनी चांगलाच धडा शिकवला पण पुढे त्याविषयी एक अवाक्षरही काढले नाही हा त्यांचा मोठेपणा.

प्रा. दावतर कधी आमच्या घरी येत. ते आल्यावर तास दोन तास गप्पांत कसे जायचे ते कळत नसे. गप्पांत साहित्याचाच विषय असे. कधी साहित्याविषयी बोलताना साहित्यिकांविषयीही उल्लेख असायचे. मात्र या बाबतीत दावतर फारच सावधगिरीने बोलत, कधी नर्म विनोदात आपली नाराजी, व्यथा उघड करीत. पण त्यांना निंदारस फारसा आवडत नसावा.

घरातील वृद्ध माणसे आणि लहान मुले यांच्याशी मात्र त्यांची फारच चटकन मैत्री जमते. माझा मुलगा प्रदीप लहान असताना त्याच्याशी ते दिलखुलासपणे हास्यविनोद करीत. कोकणी खाद्यपदार्थ, कोकणी वस्तु आणि कोकणी माणसे यांविषयी दावतरांना खास प्रेम. या संदर्भात त्यांचे सौ. लीलाशी चांगले जमे. एकदा बोलताना दावतरांनी ताडगुळाचा विषय काढला. त्याबरोबर लीलाला काहीसे अडखळल्यासारखे झाले. ताडगूळ हा पदार्थ तिला फारच नवा होता. पुढे काही दिवसांनी दावतरांनी आठवणीने ताडगूळ आणला. ती भेट आम्हाला खूपच भावली, अविस्मरणीय वाटली.

अशा तऱ्हेच्या नव्या नव्या गोष्टी आपल्या जवळच्या शबनममधून काढून वाटणे हा दावतरांचा आवडता छंद.

प्रा. न. र फाटक या आपल्या गुरुच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा' विचारांचा, धारणेचा सखोल ठसा दावतरांच्या व्यक्तिमत्त्वावर आहे. प्रा. फाटकांविषयी ते अतिशय गहिंवरून बोलतात. 'ज्ञानाच्या क्षेत्रात लोकशाही नाही. पुरावे, माहिती, युक्तिवाद आणि ज्ञान यांच्या बळावर जो श्रेष्ठ ठरेल तोच या क्षेत्रात मान्यता पावेल' हा न. र. फाटकांचा दावतरांकडून ऐकलेला असाच एक विचार. अशा विचारांनी आणि फाटकांच्या स्पष्ट, परखड विचारपद्धतीने दावतरांचे व्यक्तिमत्त्व संस्कारित झाले आहे. साहजिकच स्पष्टवक्तेपणा, परखडपणा, प्रामाणिकपणा, तत्त्वनिष्ठा, चिकाटी या संशोधकाला अत्यावश्यक असणाऱ्या गुणांचा वारसा त्यांना फाटकांकडून मिळाला आहे.

प्रा. दावतरांचा आणखी एक विलोभनीय गुण म्हणजे प्रसिद्धी पराङ्मुखता. आलोचनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. यू. आर. अनंतमूर्ती हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे होते. या कार्यक्रमातील प्रमुख समारंभात दावतर व्यासपीठावर बसले नाहीत. अनामिक लेखन करणाऱ्याच्या तटस्थ, निर्लेप व्रताप्रमाणे ते व्यासपीठावर अनुपस्थित राहिले; डॉ. अनंतमूर्तींना हे मोठेपण जाणवले. त्यांनी आवर्जून या गोष्टीचा गौरवाने उल्लेख केला. आलोचनेतर्फे झालेल्या काही समारंभांतही दावतरांचे हे दूरस्थपण जाणवले, भावलेही. साध्या समारंभातही दिमाखात मिरवणाऱ्या संयोजकांच्या दाखवेगिरीच्या संदर्भात या गोष्टी मनाला अधिकच भिडतात.

. . . . . . . . . . **चंद्रकांत बांदिवडेकर**

भाषा 'सोवळी' ठेवूं नये, भाषेनें प्रवाही असावें, या प्रकारचा हितोपदेश वेगवेगळ्या क्षेत्रांतून होत असतो. हा हितोपदेश आकर्षक असतो. कारण, एक तर असा हितोपदेश करणारी मंडळी सामान्यत: उच्च पदस्थ असतात; आणि दुसरें म्हणजे व्यवहारांत हा हितोपदेश चलनी नाण्यासारखा चालूं शकतो. कारण, या व्यवहाराला विचाराची जोड असण्याची गरज नसते. भाषेंतील वर्णनवादी अभ्यासकांच्या जवळपास जाणारा हा हितोपदेश वरकरणीं भासतो. त्यामुळें तो शास्त्रीय मार्गाची बूज ठेवणारा आहे, असेंहि वाटत राहातें. पण या संदर्भात विचार करण्यासारखा एक मुद्दा म्हणजे, 'सोवळें नसणें' म्हणजे स्वैर असणे का? आणि प्रवाही असणें म्हणजे प्रवाहपतित असणें का? मी 'शुद्धिवादी' नाहीं. पण या संदर्भात डॉ. मा. त्र्यं. पटवर्धनांनीं केलेला प्रवृत्तीचा मुद्दा, आणि उच्च-मध्यम पातळीवर जी प्रवृत्ति मूळ धरूं लागते, ती खालीं संक्रमित, आभिसारित होऊन भाषेला 'खिचडीचें' स्वरूप प्राप्त करून देते, या दोन परिणामांकडे विचारवंतांनी लक्ष देणें आवश्यक आहे. या प्रवृत्तींचें अतिशय बोलकें उदाहरण म्हणजे आज बोलभाषेंत हरक्षणाला दृष्टीस पडणारें इंग्रजी-हिंदी मिश्रित मराठी. हें मराठी प्रमाण मानावें का? अशा मराठीनें किंवा कोणत्याहि भाषेनें तात्कालिक व्यवहारिक काम भागत असलें, तरी मूलत: भाषिक विकास होतो का? मी संस्कृतप्रचुर मराठीचा पुरस्कर्ता नाहीं. तरी हा प्रश्न मला सतावत राहातो. अशा खिचडीला भाषाभ्यासांतसुद्धां मागासलेपण म्हणतात, हें भाषातज्ज्ञांना मुद्दाम सांगितलें पाहिजे असें नाहीं. या प्रक्रियेनें आपण भाषाविकास कसा साधणार आहोंत? आणि यांतून समाजाचा भाषिक विकस कसा घडवून आणणार आहोंत? या प्रश्नांचीं शक्य तर तात्त्विक आणि व्यवहारिक अशीं उत्तरें बोलभाषातज्ज्ञांनीं शोधलीं पाहिजेत. निदान ह्या भाषाव्यवहाराचें सद्य:कालीन स्वरूप काय आहे, याचा व्यापक अभ्यासप्रकल्प हातीं घेतां येणार नाहीं का? याबाबत चुटकेवजा निर्देश पुरेसे आणि उपयोगी नाहींत.

— **वसंत दावतर**



# एक व्रतस्थ अभ्यासक




मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संशोधनासाठी स्वत:चा प्रपंच पणाला लावून लाख मोलाचे संशोधनकार्य करणाऱ्या संशोधनसाधकांची एक गौरवशाली परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. अशा व्रती संशोधकांच्या मालेतील शेवटचा वाटावा असा, आणि भाषा-साहित्य, संपादन-






संशोधन या उभयविध क्षेत्रांत प्रखर ज्ञानलालसेने, सत्यनिष्ठेने व एकनिष्ठेने आजही सक्रिय असलेला एक संशोधक, संपादक, समीक्षक, भाषातज्ज्ञ ही परंपरा अखंड चालू राहील यासाठी येणाऱ्या पिढीकडे आशेने पाहतो आहे. त्याचे नाव आहे प्रा. वसंत केशव दावतर.

आज आपल्या जीवनव्यवहाराचे जवळपास प्रत्येक अंग बाजारभावाने प्रभावित झालेले असताना धनलाभ आणि प्रसिद्धी यांची अपेक्षा नव्हे तर उपेक्षा करीत भाषा व साहित्य संशोधनाला वाहून घेणाऱ्या दावतरांसारख्या व्यक्तीविषयी काही लिहिता-बोलताना कोणाचेही मन भरून येणे साहजिक आहे. पण सत्यान्वेषी व स्पष्टवक्त्या दावतरांना चिकित्सा न करता भावाकूल होऊन वर्णिलेले स्वतःचे मोठेपणही रुचणार नाही. ज्ञानाच्या क्षेत्रात भावनिकतेला, व्यक्तिवादाला, बहुसंख्येला थारा नाही असे मानणाऱ्यांपैकी दावतर आहेत. तर्क व विश्लेषक बुद्धीला प्रमाण मानून केलेली वस्तुनिष्ठ व सर्वंकष चिकित्सा हे त्यांचे बलस्थान आहे. भाषा आणि साहित्यसमीक्षा या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी जी कामगिरी केली तीमध्ये त्यांच्या मर्मदृष्टी देणाऱ्या तर्ककठोर विश्लेषक बुद्धीचा प्रत्यय येतो.

प्रा. दावतर हे जुन्यांतील नवीन आणि नवीनांतील जुने संशोधक आहेत. संहिताचिकित्सेपासून व्यावहारिक मराठीपर्यंत अनेक विषय त्यांनी हाताळले. 'साहित्यधर्म', 'साहित्यमूल्य' आदींचा शोध घेत असताना जुन्या-नव्या अशा सर्व मतांची साक्ष काढली. तसे करताना स्वदेशी-विदेशी असा भेद केला नाही की कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह बाळगला नाही. प्रत्येक मत तर्कबुद्धीवर व सारासार विवेकावर पारखून घेणे आणि बाह्य प्रभावापासून मुक्त राहून रोखठोक लिहिणे या त्यांच्या वृत्तीने अनेकजण दुखावलेही असतील. किंवा त्यांना तर्ककर्कशतेचा प्रत्यय आला असेल. पण स्वतः दावतरांनी याची कधी पर्वा केली नाही की आपला मार्गही बदलला नाही. नियतकालिके, ग्रंथ, चर्चासत्रे अशा वेगवेगळ्या माध्यमांतून दावतरांनी आपला साहित्य आणि भाषाविचार मांडला. त्यांच्या एकंदर समीक्षात्मक, सैद्धान्तिक, संशोधनात्मक लेखनाचा धांडोळा घेतला तर त्यातून शास्त्रशुद्ध चिकित्सा व विवेक यांची कास न सोडणाऱ्या निर्भय, निःस्पृह अभ्यासकाचे दर्शन घडते. विशेष म्हणजे भाषा, साहित्य यांच्याशी निगडित ज्या विभिन्न विषयांवर त्यांनी लिहिले त्यात एक प्रकारची बौद्धिक शिस्त, भक्कम सैद्धान्तिक बैठक व वैचारिक भूमिकांमधील आंतरिक सुसंगती आढळून येते.

प्रा. दावतर यांची प्रथमदर्शनी ओळख ही 'आलोचना'कार दावतर अशी आहे हे कोणीही अमान्य करणार नाही. 'आलोचना' हे 'केवळ समीक्षेला वाहिलेले' आणि 'साहित्य व इतर कला यांविषयींच्या विविध अंगांना स्पर्श करणारे' मासिक सुमारे तीन दशके ज्या बांधिलकीने, तळमळीने दावतरांनी चालविले तिला तोड नाही. या त्यांच्या कार्याबद्दल मराठी साहित्यविश्व त्यांचे कायमचे ऋणी राहील. 'आलोचने'चा पहिला अंक सप्टेंबर १९६२ मध्ये प्रसिद्ध झाला. आज हे मासिक बंद पडले असले आणि त्याच्या पुनरुज्जीवनाची अपेक्षा दावतरांकडून करणे अनुचित असले तरी या मासिकाने मराठीची वाङ्मयीन संस्कृती समृद्ध करण्यात जे योगदान दिले ते ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. 'आलोचने'तील खुद्द दावतरांचे लिखाण हे केवळ साहित्यसमीक्षेपुरते सीमित नव्हते. वाङ्मयीन टीकेपेक्षा वाङ्मयीन तत्त्वदर्शनाकडे त्यांचा कल अधिक होता, असे वाटावे, इतके तात्त्विक स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे. वाङ्मयाचा आत्मधर्म, वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांची अंतःसूत्रे शोधण्यात त्यांना विशेष रस होता. 'कादंबरीची अंगभूत वैशिष्ट्ये' 'लघुकथानिर्मिति व तिची अंगे' यांसारख्या लेखातून त्यांची हीच प्रवृत्ती दिसून येते. साहित्यकृतीची समीक्षा करतानाही तिच्या 'साहित्यपणा'चा, 'सौंदर्यतत्त्वा'चा विचार त्यांना महत्त्वाचा वाटे.

'मराठी टीका' (१९६६) या प्रा. दावतर यांनी

संपादित केलेल्या ग्रंथातून त्यांची साहित्य व समीक्षादृष्टी समग्रतेने व्यक्त झाली आहे. प्रस्तुत ग्रंथातील 'मर्ढेकर युगांतील मराठी टीका' या त्यांच्या लेखात त्यांनी मराठी टीकेतील संस्कारवाद, अनुभववाद, व्यक्तिवाद यांचा समाचार घेत समीक्षेने साहित्यकृतीचे अधिष्ठान सोडता कमा नये, तसेच जीवनानुभव व कलानुभव यांच्याकडे अधिक काळजीपूर्वक पाहिले पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. मराठी टीका स्वत:ची क्षेत्रमर्यादा ठरवून शास्त्रीय शिस्त पाळत नाही ही त्यांची तक्रार आहे. साहित्याशी संबंधित क्षेत्रांचा विचार करताना साहित्याच्या गाभ्याचा विषयसापेक्षतेने विचार झाला पाहिजे; त्यांची प्रस्तुतता तपासण्यासाठी तत्त्वे, मूल्ये निश्चित केली पाहिजेत हा दावतरांचा आग्रह आहे. यासंदर्भात सोस्यूर या स्वीस भाषावैज्ञानिकाच्या विवेचनाची साक्ष काढीत दावतर लिहितात, "अभ्यासाच्या आरंभीच आपल्या विषयाची परिमिति आणि पद्धति या निश्चित करून घेणें, हा संकुचितपणा नसून, अनेक संबंधी विषयांपासून आपल्या विषयाचे वेगळेपण लक्षांत घेणें होय. आपल्या अभ्यासांतील यथार्थतेसाठी मूलभूत आवश्यक अशी ही गोष्ट आहे. अनेक संबंधी विषयांमागें धावण्यानें 'अंतर्दृष्टि' प्राप्त होत नसून, व्यापकता लाभत नसून गोंधळ होतो." ('मराठी टीका').

दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यांची व्यवस्था लावताना दावतरांनी हीच भूमिका घेतली आहे. "दलित आणि ग्रामीण या नव्या जाणिवा आहेत, असें आपण मानतों पण हें मानतांना आपला आधार ऐतिहासिकतेचा, वर्तमान वर्णनपरतेचा आहे आणि म्हणून साहित्यमूल्य ठरविण्यास, सर्जनाचें, नवसर्जनाचें मूल्य ठरविण्यासाठी त्या जाणिवा उपयोगी पडूं शकत नाहींत, हें जाणून घेण्याची आपली तयारी नसते... सौंदर्याच्या व्याख्येंत सामाजिक, राजकीय, वैचारिक चळवळीची गरज यांचा समावेश केला तर अशा व्यवस्थेंत आपल्या विषयाचें स्वत्व, भिन्नत्व (डिफरेन्शिया) कसे प्रकट होणार?"

याचा अर्थ दावतरांना अन्य विषयांच्या संदर्भात साहित्याचा विचार करणे मान्य नाही असा नाही. त्यांचा कटाक्ष आहे तो साहित्याची पृथगात्मता, व्यवच्छेदकता जपण्यावर. तसे न करता साहित्याची सर्वव्यापकता, सर्वसमावेशकता शोधू जाणे म्हणजे साहित्यालाच वाऱ्यावर सोडणे होय. साहित्याची ओळख करून घेण्यासाठी आधुनिक ज्ञानशाखांचे, तदंतर्गत विचारप्रणालींचे साह्य घेण्यास दावतरांचा विरोध नाही. पण हे सर्व करावयाचे ते साहित्याच्या संदर्भातील त्यांची प्रस्तुतता पडताळूनच. साहित्यावरील वेगवेगळ्या चर्चासत्रांतून अन्य ज्ञानशाखांच्या तज्ज्ञांनी आपापल्या विषयक्षेत्राला केंद्रस्थानी ठेवून केलेला साहित्याचा विचार किती प्रस्तुत आहे आणि किती अप्रस्तुत आहे हे शेवटी साहित्याच्या अभ्यासकानेच ठरवायचे आहे. म्हणूनच साहित्याचा 'आत्मधर्म' शोधणे आणि त्याच्याशी इमान राखणे दावतरांना महत्त्वाचे वाटते.

साहित्याचा आस्वाद आणि साहित्याचा अभ्यास यांविषयीची दावतरांची भूमिका स्पष्ट आणि स्वच्छ आहे. 'मला असे वाटते' छापाच्या आणि आस्वादक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समीक्षेतील पोकळपणा दावतरांनी वेळोवेळी दाखवून दिला आहे. 'मराठी समीक्षा, जिथे सुरू व्हावी तिथेच ती नेमकी संपते' (आलोचना, जुलै १९८७) हे त्यांचे मराठी समीक्षेविषयीचे निरीक्षण पुरेसे बोलके आहे.

'आलोचना' मासिकाच्या संपादनाची, लेखनाची धुरा वाहत असताना दावतरांनी 'आलोचना प्रकाशना'च्या वतीने स्वत: संपादित केलेली काही पुस्तकेही प्रकाशित केली. त्यांत 'केशवसुत गाउनि गेलें' (१९६६), 'गीतकाव्य' (१९७१), 'साहित्याचें शिक्षण' यांचा प्रामुख्याने समावेश आहे. प्रा. दावतर हे सोमय्या महाविद्यालयात मराठी विभाग-प्रमुख होते. तेथूनच ते सेवानिवृत्त झाले. मराठीचा अध्यापक म्हणून असेल कदाचित पण साहित्याचा अध्ययन-अध्यापन व्यवहार हा त्यांचा सतत आस्थेचा विषय राहिलेला आहे. 'साहित्याचें शिक्षण' या त्यांच्या पुस्तिकेत त्यांनी साहित्याच्या अभ्यासाचे एकूण १२ स्तर त्यांतील तपशिलासह व क्रमवार विकासाचे सूत्र ठेवून अभ्यासकांसमोर मांडले आहेत. विद्यापीठीय स्तरावर मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप काय असावे यावर 'आलोचने'च्या माध्यमातूनही दावतरांनी विचारमंथन घडवून आणलेले दिसते. समीक्षक दावतरांचे हे एक लक्षणीय रूप आहे.

साहित्याच्या अभ्यासाप्रमाणेच भाषेच्या अभ्यासाचा विचारही दावतर आस्थेने व गांभीर्याने करताना दिसतात. साहित्यव्यवहाराप्रमाणेच मराठीच्या भाषाव्यवहाराचेही त्यांचे निरीक्षण व आकलन थक्क करणारे आहे. भाषेकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोण, मराठीचा भाषिक इतिहास आणि वर्तमान भाषिक व्यवहार यांचा सखोल अभ्यास असल्यामुळे दावतरांचे भाषाविषयक लेखनही नवी दृष्टी देणारे आहे. दुर्दैव असे की या लेखनाकडे अनेकांचे लक्ष गेलेले नाही. आज आपण मराठी भाषेच्या पीछेहाटीची चर्चा करतो. तिच्या संवर्धनाची चिंता करतो. पण कृती मात्र काही होत नाही. भाषेचे क्षेत्र हे उपयोजनाचे क्षेत्र आहे. व्यवहाराकडे पाठ

फिरवून केवळ सैद्धान्तिक पातळीवर केलेला भाषाविचार पुरेसा ठरत नाही. कोणत्याही समाजाचा भाषाव्यवहार हा नैसर्गिक व कृत्रिम अशा उभयविध प्रक्रियांतून सिद्ध होत असतो. भाषिक प्रश्नांची सोडवणूक करताना या दोन्ही प्रक्रियांचे भान ठेवावे लागते. या संदर्भात १९९४ मध्ये प्रकाशित झालेलीं 'मराठीचें शिक्षण' आणि 'मराठी शुद्धलेखन' ही दावतरांची दोन पुस्तकें दावतरांमधील भाषासंशोधकाचे, भाषातज्ज्ञाचे दर्शन घडवितात.

'मराठीचें शिक्षण' या ग्रंथात दावतरांचा भाषा-मातृभाषा-प्रमाण भाषा-भाषाव्यवहार यासंबंधीचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोण प्रत्ययास येतो. हा दृष्टिकोण त्यांच्या वाङ्मयविषयक भूमिकेइतकाच लक्षणीय आहे. भाषा हे व्यवहाराचे क्षेत्र असले तरी भाषाव्यवस्था हे ज्ञानाचे क्षेत्र आहे. त्यामुळे भाषाविषयक निर्णय हेही ज्ञानाचे क्षेत्र मानले पाहिजे हे त्यांचे मत त्यांनी वाङ्मयव्यवहारासंबंधी घेतलेल्या तात्त्विक भूमिकेशी सुसंगतच म्हटले पाहिजे. बहुमताच्या व चळवळीच्या बळावर साहित्यबाह्य विषयांची साहित्यावर होणारी कुरघोडी ही जशी त्यांना अमान्य आहे तद्वत भाषिक प्रश्नांचा निर्णय करताना सारासार विवेक, दूरगामी परिणाम यांची पर्वा न करता केवळ संख्याबळावर निर्णय घेण्याची प्रवृत्तीही ते त्याज्य मानतात. भाषाव्यवहारात विधिनिषेध मानू नये ही उदारमतवादी भूमिका दावतरांना मान्य नाही. चुकीचे उच्चार आणि चुकीचे लेखन यांमुळे काही बिघडत नाही अशी भूमिका घेणाऱ्यांचा दावतर अतिशय संयमाने आणि युक्तिवादपूर्वक समाचार घेतात. भाषा ही सारखी बदलत असते हे खरे असले तरी व्यापक सामाजिक उपयोगासाठी प्रामाण्याच्या रूपाने तिला पायाभूत स्थैर्य आवश्यक असते. भाषाव्यवहाराच्या प्रवाहीपणामुळे जे नवे नवे प्रयोग आचारात येत असतात, त्यांची व्यवस्थेशी संगती लावण्याचा प्रयत्न केल्याशिवाय अशा प्रयोगांना केवळ बहुसंख्य व्यवहाराच्या बळावर प्रामाण्य देणे व्यवस्थेला बाधक तर ठरणार नाही ना याचा विचार करूनच निर्णय घेतले पाहिजेत. अज्ञानाने किंवा अनवधानाने अथवा साहचर्य-संबंधाच्या गफलतीच्या ग्रहामुळे चुकीचे, व्याकरणाच्या चौकटीत न बसणारे आणि आणि ही चौकट मोडण्याचे तार्किक किंवा सुसंगत कारण नसता निर्माण होणारे शब्द व अशी रूपे यांना बहुसंख्य वापराच्या बळावर प्रामाण्य देण्याची शिफारस अनेकदा केली जाते. पण ती बरोबर नाही अशी दावतरांची भूमिका आहे. एकभाषी समाज म्हणून टिकायचे असेल, विविध, व्यापक व सूक्ष्म व्यवहार क्षेत्रांत भाषासंवर्धन करावयाचे असेल तर अशा व्यवस्थेचा विवेक बाळगावा लागतो. त्यासाठी काही पथ्येही पाळावी लागतात.

येथे भाषेच्या प्रयोगशरणात्वाबद्दल दावतरांनी केलेला विवेकही लक्षात घेण्यासारखा आहे. ''प्रयोगशरणत्व हा भाषिक व्यवहारांत प्रामाण्याचा निकष असला, तरी शिक्षणप्रक्रियेंतील 'शिकणें' व 'शिकवणे' या घटकांची बूज राखूनच आवश्यक त्या मर्यादित प्रयोगशरणत्वाचा स्वीकार केला पाहिजे. योग्य भाषिक संस्कार न घडल्यामुळें अस्तित्वांत येणारे स्वैर प्रयोग हे प्रयोगशरणतेच्या आधारें प्रमाण ठरविल्यामुळें अनागोंदी निर्माण होत असेल, तर प्रयोगशरणतेला आवर घातला पाहिजे. नाहीतर शिक्षणप्रक्रियाच संपुष्टात येईल, याचें भान ठेवले पाहिजे.'' ('मराठीचें शिक्षण').

निरनिराळ्या व्यवहारांसाठी भाषा जाणीवपूर्वक घडवावी लागते आणि ती जाणीवपूर्वक शिकावी व शिकवावी लागते या धारणेतूनच मराठीच्या शिक्षणाचा व्यापक व स्तरनिहाय आकृतिबंध दावतर अभ्यासकांसमोर सादर करतात. या त्यांच्या प्रयत्नामागे मराठीच्या भाषाशिक्षणाला इष्ट ते वळण लागून ती व्यावहारिक दृष्टीने समृद्ध व्हावी हा हेतू आहे. 'भाषा वाचवा' म्हणून आक्रोश करण्यापेक्षा तिच्या नियोजनबद्ध विकासाचा कार्यक्रम विविध स्तरांवर प्रामाणिकपणे राबविणे दावतरांना महत्त्वाचे वाटते. अशा नियोजनबद्ध भाषासंवर्धनाचे एक प्रमुख अंग म्हणून दावतर भाषाशिक्षणाचा विचार करतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपली भाषा आपणास नीटनेटकी यावी असे शैक्षणिक किंवा सार्वजनिक वातावरण नाही, आपल्या एकूण जीवनव्यवहारात भाषेला मध्यवर्ती स्थान नाही याची दावतरांना खंत वाटते. मातृभाषेच्या उपेक्षेने ते व्यथित होतात. आज भाषाशिक्षणाची कशी परवड झाली आहे हे सांगताना मराठी भाषेच्या उच्चारित व लिखित स्वरूपाच्या दयनीय अवस्थेकडे ते आपले लक्ष वेधतात. यातून मार्ग काढण्यासाठी शिक्षणाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मराठीच्या शिक्षणाचे स्वरूप काय असायला हवे याचे दिग्दर्शनही करतात.

विद्यापीठीय स्तरावर मराठीचे स्थान व शिक्षण हा दावतरांच्या विशेष चिंतनाचा विषय आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठांतून दिले जाणारे मराठीचे शिक्षण आणि त्यातून व्यक्त होणारे विद्यापीठांचे मराठीबाबतचे धोरण दावतरांना अस्वस्थ करते. या संदर्भात दावतरांचे पुढील निरीक्षण नोंदवण्यासारखे आहे, ''मराठी भाषा बाजारांत, नाही

तर घरगुती व्यवहारापुरती मर्यादित व्हावी, करमणुकीसाठी फार तर तिचा उपयोग करावा, अशी तिची उत्तरोत्तर पीछेहाट व्हावी, या प्रकारची पद्धतशीर योजना विद्यापीठस्थ अधिकाऱ्यांनी व विद्यावंतांनी आखलेली दिसतें.'' ('मराठीचें शिक्षण')

मराठीचे शुद्धलेखन हा दावतरांच्या भाषाचिंतनातील आणखी एक महत्त्वाचा विषय आहे. 'मराठी शुद्धलेखन' या पुस्तकात त्यांची खास स्वत:ची अशी लेखनविषयक भूमिका त्यांतील तपशिलासह वाचायला मिळते. दावतर 'साहित्य महामंडळा'ने तयार केलेले व महाराष्ट्र शासनाने मान्य केलेले (१९६१, १९७२) मराठीचे लेखनविषयक नियम स्वत:च्या तसेच स्वत:च्या अधिकारात प्रसिद्ध करावयाच्या इतरांच्या लेखनात (उदा. 'आलोचना'मधील सर्व लेखनात) पाळत नाहीत हे सर्वज्ञात आहे. यामागे त्यांची विशिष्ट तात्त्विक भूमिका आहे आणि त्यांनी ती सातत्याने अभ्यासकांसमोर मांडलेली आहे. दावतरांना मराठीच्या प्रचलित शुद्धलेखनातील बराच तपशील जसा मान्य नाही तसेच ज्या पद्धतीने या नियमांची सिद्धता व अंमलबजावणी झाली ती पद्धतीही मान्य नाही. 'उच्चारानुसारी लेखन' या शुद्धलेखनविषयक भूमिकेबाबतही ते मतभेद व्यक्त करतात. 'लिपीच्या मर्यादांची वास्तव जाणीव ठेवून भाषेतला काही भाग जसा बोलण्यातील व्यवहाराकडे सुपूर्द करावा, तसाच काही भाग शक्य तितका लिपीत व्यक्त होण्याची संधी ठेवावी' अशी दावतरांची भूमिका आहे.

भाषेच्या स्वाभाविक गतिचक्राशी व स्थित्यंतर-प्रक्रियेशी विसंगत अशा एकतंत्री भाषाव्यवहाराचा पुरस्कार करणाऱ्यांना दावतर यांनी आपल्या टीकेचे लक्ष्य बनवले आहे. एकवाक्यतेच्या नावाखाली भाषेवर होणारा अत्याचार दावतरांना अस्वस्थ करतो. भाषेचे नियमन निरपवादपणे व कोणत्याच एका ठरीव चाकोरीने होत नसते. तसे ते करण्याचे प्रयत्न अवास्तव पातळीवरचे व परिणामी निरर्थक ठरतात. शुद्धलेखनाचा व्याकरणाशी संबंध नाही ही भूमिकाही दावतरांना मान्य नाही. व्याकरण भाषेतच असते हे खरे असेल तर शुद्धलेखनाचा व्याकरणाशी संबंध स्वाभाविक व नैसर्गिक मानला पाहिजे. लेखनविषयक नियम ठरविताना व ते आत्मसात करताना व्याकरणाचा विचार अपरिहार्य ठरतो. उच्चार, सोय, सुलभता या तत्त्वांपेक्षा 'संदिग्धतेला नि:संदिग्ध करणे' हे तत्त्व शुद्धलेखनामध्ये मूलभूत महत्त्वाचे आहे हे दावतरांचे मत विचार करण्यासारखे आहे.

दावतरांची मराठीच्या शुद्धलेखनासंबंधीची भूमिका मराठीच्या शुद्धलेखन परंपरेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून नोंदविण्याइतकी महत्त्वाची आहे. स्वत:ला अभिप्रेत असलेल्या तात्त्विक भूमिकेशी व शुद्धलेखनाच्या नियमांशी एकनिष्ठ राहून दावतर आपला लेखनव्यवहार करीत असतात. याचा अर्थ लेखनव्यवहाराच्या नियमनाला त्यांचा विरोध आहे किंवा प्रत्येकाला मन:पूत लेखनस्वातंत्र्य असावे असे त्यांना वाटते असे नाही, तर लेखनपद्धतीच्या लष्करीकरणाला त्यांचा विरोध आहे. अज्ञानजन्य अशुद्ध लेखनाला त्यांचा विरोध आहे. कोणत्याही प्रकारचे नियम सुसंगतीने व काटेकोरपणे न पाळण्याच्या प्रवृत्तीला त्यांचा विरोध आहे. आज मराठीच्या लेखनव्यवहारात शुद्धलेखनाबाबत जी दयनीय स्थिती आढळून येते ती बदलण्यासाठी त्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या राबवण्याची खरी गरज आहे. 'समाजाला भाषेचे, लेखनविषयक नियमांचे महत्त्व पटेल अशी पावले शासकीय व विद्याक्षेत्रात पडली पाहिजेत. प्रमाण नियमांनुसार काटेकोर असे भाषालेखन झाले नाही तर अडते असे समाजाला दिसून आल्याशिवाय त्याची भाषेबद्दलची अनास्था दूर होणार नाही. यासाठी संबंधित सर्वांना प्रसंगी कठोर व्हावे लागेल' या त्यांच्या प्रतिपादनातून शुद्धलेखनाला भाषाव्यवहारात ते किती महत्त्व देतात हे आपल्या लक्षात येते.



'मराठी संशोधन मंडळा'चे अध्यक्ष म्हणून दावतर आज कार्यरत आहेत. मंडळाच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या 'मराठी संशोधन पत्रिके'चे अनेक विशेषांक त्यांच्या साक्षेपी संपादनाखाली अभ्यासकांना उपलब्ध झालेले आहेत. 'संहितासमीक्षा आणि पारिभाषिक संज्ञा' (१९८७) हा ग्रंथ त्यांच्या आणखी एका वेगळ्या विषयातील व्यासंगाचे दर्शन घडवितो. आजही प्रयोगावस्थेत असलेल्या या विषयातील दावतरांचे कार्य पायाभूत महत्त्वाचे आहे.

आपल्या प्रारंभीच्या काळात दावतरांनी अल्प स्वरूपात भाषांतराचेही काम केलेले आहे. अब्राहम लिंकनचे छोटेखानी चरित्र 'एब लिंकन' (१९५८) आणि 'जाहिरात कला आणि कल्पना' (१९७६) ही त्यांची भाषांतरित पुस्तके आहेत.

मराठी भाषा व साहित्यव्यवहार यांत सारखीच रुची आणि गती असलेला व्यासंगी अभ्यासक व व्रतस्थ संशोधक म्हणून दावतरांचे स्थान निर्विवादपणे मोठे आहे.

**प्रकाश परब**

१ ऑगस्ट १९९१ रोजी कांदिवली येथे काही मित्रमंडळींनी एकत्र येऊन 'Thinkers' Academy - Bombay' ही संस्था स्थापन केली.

यात मुख्यत: पुण्याचे डॉ. सुरेन्द्र बारलिंगे, मुंबईचे आचार्य नारायण देसाई, कांदिवलीचे प्राचार्य वि. मा. शिर्के आदी मंडळी होती. लवकरच 'नवशक्ती'च्या त्यावेळच्या संपादिका वसुंधरा पेंडसे-नाईक, पुण्यातील प्रा. विश्वनाथ कऱ्हाड, दिल्लीच्या निर्मलाजी देशपांडे, संगमनेरचे प्रा. कौंडिण्य आदी विचारवंतांचा सहभाग संस्थेला लाभला.

डॉ. सुरेन्द्र बारलिंगे हे ह्या संस्थेचे प्रेरणास्थान. कांदिवली येथे प्राचार्य शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शाळा, पुरोगामी युवक मंडळ, सहविचार केंद्र इत्यादी अनेक संस्थांचे एक सुंदर जाळे विणले गेले होते. कार्यकर्त्यांचे, माजी विद्यार्थ्यांचे एक मोहोळच जणू तयार झाले होते. पुरोगामी विचारांच्या दिशेने वाटचाल हा त्यांचा मार्ग. हे कार्य चालू असता डॉ. बारलिंगे यांचे मालाडमधील त्यांच्या फ्लॅटमध्ये येणे वाढू लागले. आचार्य देसाईही बोरीवली येथे कायम वास्तव्यास आले आणि केंद्र तयार झाले.

इथल्या तरुण मंडळींत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक समस्यांवर नेहमीच चर्चा होत असे. दोनशे-तीनशे युवकांच्या सभा होत असत. कलापथके, ग्रंथालये, सहली, चर्चासत्रे, व्याख्याने अशा कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे होत असे. लोकशाही, समाजवाद, मार्क्सवाद यांचे आकर्षण निर्माण झालेल्या या मंडळींना समाजवादी देशांचे आकर्षण वाटे. आणि ही वाटचाल चालू असतानाच




# एक विचारप्रवर्तक नियतकालिक

# ताज

सोविएत युनियनचे विघटन झाले. समाजवादी विचारांना एक प्रचंड तडा गेला. एका मोठ्या वैचारिक मंथनाची सर्वांनाच गरज वाटू लागली.

यातूनच डॉ. सुरेन्द्र बारलिंगे यांच्या प्रेरणेने 'Thinkers' Academy - Bombay' या संघटनेचा जन्म झाला. यापुढे विचारांची ही प्रक्रिया केवळ कांदिवली-बोरिवलीपुरती मर्यादित न ठेवता साऱ्या महाराष्ट्रभरच्या मंडळींना त्यात

सामावून घेण्याचे ठरले.
डॉ. बारलिंगे हे पुण्यातील तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख होते. तत्त्ववेत्ते म्हणून त्यांची कीर्ती होती. अनेक ग्रंथांचे कर्ते, देशभराच्या विद्यापीठांत एक विद्वत्मान्यतेचे स्थान असलेले समीक्षक, अनेक शिक्षण संस्थांचे संस्थापक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष स्वातंत्र्यसैनिक असे बारलिंगे जेव्हा 'थिंकर्स ॲकॅडेमी'चे अध्यक्ष झाले तेव्हा ॲकॅडेमीचा महाराष्ट्राला परिचय व्हायला फारसा वेळ लागला नाही. आचार्य नारायण देसाई हेही सुमारे पंचवीस ग्रंथांचे लेखक, आणि अनेक ग्रंथांना पुरस्कार प्राप्त झालेले. त्यांची जोड ॲकॅडेमीला लाभली.
ॲकॅडेमीने एक वैचारिक भूमिका घेतली. महाराष्ट्रातील विचारवतांशी वैचारिक देवाणघेवाण व्हावी, वैचारिक नाते जोडता यावे, समाजातील निरनिराळ्या वैचारिक पातळीवरील लोकांशी हितगुज साधता यावे या उद्देशाने 'Thinkers' Academy Jorunal' नामक एक मासिक मार्च १९९२ मध्ये प्रकाशित झाले. 'पत्रिकेचे प्रयोजन' नामक एक निवेदन जर्नलच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध केले. आणि सुखद आश्चर्याचा धक्का असा मिळाला की या अंकाच्या ५०० प्रकाशित प्रती पाठविल्या असताना अंकाच्या प्रतींसाठी अन्य ६००-७०० मागणीपत्रे आली. या जर्नलचे एक हजार वर्गणीदार व्हायला फारसा वेळ लागला नाही. वैचारिक मासिकाची नितान्त गरज हा जसा त्यामागील घटक, तसेच डॉ. बारलिंगे यांची विचारधारा हाही महत्त्वाचा घटक ठरला. अशी ही विचारधारा कोणती होती? बारलिंग्यांनीच त्यावेळी म्हटल्याप्रमाणे —
''आज आपण एका युगाच्या टोकाशी उभे आहोत. लवकरच आपण एका नवीन युगात प्रवेश करणार आहोत. हे नवीन युग मानवजातीकरिता कसे असेल हे आताच सांगता येणार नाही. पण हे युग सुखसमृद्धीचे व्हावयाचे असेल तर त्याची तयारी मात्र आजच करावयास हवी. आपली तयारी झाली नसेल तर आजच्या युगाने कड फिरविल्याबरोबर वैचारिक भूकंप झाल्यासारखे आपण सारे कोसळून पडू, उन्मळून पडू. या युगाच्या सुरुवातीस आमच्या मनावर एका ध्येयवाक्याचे अधिराज्य होते. आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे होते. समता आणि बंधुभाव हवा होता. आम्हाला समाजवाद हवा होता. एकापरीने माणसाने हे ध्येय या युगात गाठले पण होते. पण पाहता पाहता आपले हे स्वप्न विरून गेले. विज्ञान आणि तंत्रशास्त्राच्या भरवशावर आपण साऱ्या जगात बदल घडवून आणू शकू असा विश्वास आपण मनाशी बाळगला होता. पण पत्त्यांचा बंगला कोसळावा त्याप्रमाणे अर्ध्या अधिक जगातून हा विश्वास नाहीसा झाला आणि उरलेल्या अर्ध्या जगातही तो कितपत टिकेल हे सांगता येत नाही. या युगाने आजपर्यंत जगात कधीही न झालेली रणकंदने पाहिली आहेत. जागतिक स्तरावरील दोन महायुद्धे पाहिली आहेत, अण्वस्त्रांची युद्धे पाहिली आहेत. या महायुद्धांच्या शेवटी मानवतेचे स्वप्न साकार होण्याचाही आपणास भास झाला आहे आणि त्याचबरोबर मानवतेचे हे स्वप्न साकारले जात असताना ज्याप्रमाणे हिंसा-अत्याचारांचा खच पडला तसे मात्र हे स्वप्न विरत असताना झाले नाही. परमाणूचा स्फोट तर तेथे झाला नाहीच पण साध्या बंदुकीच्या गोळीचा आवाज पण आपणास ऐकू आला नाही. मध्यंतरीच्या एका क्षणी सोविएत रणगाडे मॉस्कोच्या रस्त्यारस्त्यांवरून फिरत असता आम जनतेने एवढी गर्दी केली की रणगाड्यांनाही आपले काम उरकता आले नाही. म्हणजे जी हारजीत



'ताज'चे संपादक - श्री. बाबुराव रणदिवे, विनायक शिर्के, नारायण देसाई

झाली ती केवळ विचारांची झाली, शास्त्रास्त्रांची नाही. म्हणजे विचारांचे शस्त्र किंवा अस्त्र हे कोणत्याही हिंसक शस्त्रापेक्षा अधिक परिणामी ठरले. कोणत्याही तंत्रशक्तीपेक्षा माणसाची विचारशक्तीच अधिक प्रभावी ठरते हे यामुळेच सिद्ध झाले. तंत्रशक्ती, विज्ञानशक्ती ही बाहेरची शक्ती. तिचा विचार झाला असता तर हिंसेने हैदोस घातला असता. तसे झाले नाही. म्हणजे जे तंत्रशक्तीने साधता येत नाही ते आत्मशक्तीने साधता येते. हा दिलासा या युगाने कड फेरता फेरता आम्हाला दिला. या युगाने पुढच्या युगाच्या सिद्धतेकरिता आम्हाला दिलेला हा महामंत्र आहे.

"आत्मा नसलेल्या जडवादी समानतेची जागा आत्मवादी बंधुभावाने घेतली पाहिजे ही विचारसरणी हीच नव्या युगाची नांदी आहे.

"जागतिक पातळीवर जे घडले तेच देशाच्या पातळीवर घडले. या युगाने गुलामगिरीतून आपल्या देशाला मुक्त केले. पण गुलामगिरीबरोबर अज्ञानानेही आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर शिक्कामोर्तब केले होते. देशाची शकले होण्याच्या क्रियेतून आपले स्वातंत्र्य जन्मास आले. पण जन्मास आल्यावरसुद्धा विचारांची शकले करण्याची आपल्या स्वातंत्र्याची शक्ती तशीच राहिली. त्यामुळे हिंसा, अत्याचार, भ्रष्टाचार, काळाबाजार, जातीयता, अतिरेकीपणा यांचाच प्रत्यय आपणास पदोपदी येऊ लागला. शिक्षण, व्यापार, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी साऱ्या क्षेत्रातच आपणास कच खावी लागली. पण हे सारे आपल्या अप्पलपोटेपणामुळे घडते, इतरांबद्दलच्या अनास्थेमुळे घडते, हे आपण जाणले नाही. ही सारी ओझी आपल्या अंगावर घेऊनच आपल्या देशाचा नागरिक प्रवासी पुढच्या युगाच्या यात्रेस निघाला आहे. त्याने आपल्याजवळच्या या ओझ्यांना, या पापांना बाजूस सारले पाहिजे तरच त्याचा प्रवास सुखद, सुखरूप होऊ शकेल. विचारांच्या शस्त्रामुळेच आपल्याजवळचे अज्ञानाचे ओझे दूर सारता येईल हा आमचा विश्वास आहे. हा विश्वासही अर्थातच आम्हाला विचारमंथनातून मिळाला.

"आपल्या पुराणात प्रलयाची आणि समुद्रमंथनाची कथा आहे. हिंसा, अत्याचार, अज्ञान यांचा जेव्हा कडेलोट होतो तेव्हा प्रलय होतो. सारी रत्ने, मूल्ये समुद्रात, प्रलयात नाहीशी होतात. या मन्वंतराच्या सुरुवातीस अशा प्रलयातून व्यवस्थेकडे जाताना देवासुरांनी समुद्रमंथन केले होते आणि त्यातून १४ रत्ने निर्माण झाली. खरे म्हणजे हे समुद्रमंथन, विचारांचे मंथन नसावे; नाहीतर त्यातून सुरा आणि हलाहल निघाले नसते.

"जे विचारसंथन करण्याचा आमचा प्रयत्न आहे त्यातून विषवल्ली न निघता अमृतच निघावे हीच आमची इच्छा, आमचा प्रयत्न, आमची श्रद्धा आहे."

मार्च १९९२ च्या 'थिंकर्स ॲकॅडेमी जर्नल'चे डॉ. सुरेन्द्र बारलिंगेलिखित हे पहिले संपादकीय! आमचा जाहीरनामाच तो!

लवकरच या जर्नलला आठ वर्षे पूर्ण होतील. अपेक्षित वाटचालीत बरेच काही घडले. पहिला गमतीदार चमत्कार म्हणजे Thinkers' Academy Joruna1 या नावाने सुरू केलेल्या मासिकाच्या नावात (त्या शब्दांची आद्याक्षरे एकत्रित करता) **'TAJ'** गवसला. हेही डॉ. बारलिंग्यांच्याच एक दिवस सहज लक्षात आले. सुरुवातीस मराठी, इंग्रजी, हिंदी या भाषांतून लेख द्यावे असा विचार होता. नंतर मुख्यत: मराठीतून लेख द्यावे असे ठरले. तेथून या अंकाचे नाव **ताज** झाले. आज 'ताज'चा परिवार खूप वाढला आहे. बाबुराव रणदिवे यांसारखे एक अनुभवी संपादक बारलिंग्यानंतर संपादक मंडळाला लाभले. सल्लागारांत तर दिल्लीच्या निर्मला देशपांडे, औरंगाबादचे डॉ. संभाजीराव भोसले, होमी भाभा केंद्राचे डीन आणि प्राध्यापक डॉ. हेमचंद्र प्रधान, पुण्याचे डॉ. भेलके, के. रं. शिरवाडकर, प्रा. स. रा. गाडगीळ, प्रा. नागोराव कुंभार, प्रा. सुधीर पानसे, प्रा. सी. डी. देशमुख आदी मंडळी लाभली आणि अनेक दृष्टींनी 'ताज' अन् ॲकॅडेमी संपन्न झाली. 'ताज'ला नागपूरला प्रा. क्रांती पांडे, गोव्यात रमेश कोलवाळकर, चंद्रपूर-गडचिरोलीला नरेन्द्र भगवती प्रसाद मिश्रा, पुण्याला मंगेश कऱ्हाड आणि मुंबईला दशरथ सावंत असे विभाग प्रतिनिधी लाभले आहेत.

प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. यशवंत सुमंत, डॉ. सुधीर पानसे, डॉ. सदा कऱ्हाडे, श्री. कुमार केतकर, प्रा. ग. प्र. प्रधान, श्री. भाई वैद्य, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. जयकुमार पाटील, श्री. शरद बेडेकर आदी अनेक लेखकांनी वैचारिकदृष्ट्या 'ताज' संपन्न केले. 'ताज'च्या अवतीभवती नियमित व्याख्याने, चर्चासत्रे आयोजित केली जातात.

'ताज'ला सूर्यकांत देसाई, अभय नाडकर्णी अशांसारख्या उत्तम कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले आहे. INSTITUTE OF COMPUTER TECHNOLOGY (ICT) सारख्या अद्ययावत संस्थेकडे 'ताज'च्या सजावटीची व मांडणीची जबाबदारी आहे. आणि अनेक अडचणींवर मात करीत चाळके प्रिंटर्सने अगदी सुरुवातीपासून आजतागायत त्याच्या छपाईची जबाबदारी घेतली आहे.

अशा या वाटचालीत 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा १९९९ चा 'वैचारिक नियतकालिकाचा पुरस्कार' मिळाल्यामुळे 'ताज'कारांचा विश्वास द्विगुणित झाला, आपल्या ध्येयावरील विश्वास बळावला आणि अडचणींवर मात करून पुढे जाण्याचे बळ लाभले.

आज बारलिंगे असते तर सर्वात जास्त आनंदित झाले असते अन् म्हणाले असते, "आता आपली जबाबदारी वाढलीय. स्वातंत्र्य, लोकशाही, समता, वैज्ञानिक दृष्टी आदी तत्त्वे समाजात दृढ करण्यासाठी अधिक मेहनत करूया, अधिकांना या कार्याशी जोडूया."

. . . . . . . . . . . **दशरथ सावंत**




# कबीर

जागतिक स्तरावरील श्रेष्ठ संत कवी कबीर (१३९८-१५१८) यांच्या ६व्या जन्मशताब्दीच्या दोन वर्षे आधीच त्यांच्या निवडक काव्याचा, सर्जनशील अनुवाद करून कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी अत्यंत मोलाचे साहित्यिक व सांस्कृतिक उत्तरदायित्व यशस्वीपणे निभावले आहे. त्यांचे अभिनंदन खास अशासाठी की या महान साधकाला विचारविश्लेषण व काव्यदर्शन किंवा निरूपण व स्वरूपण यांच्याद्वारे मराठी वाचकांपर्यंत सुविहितपणे व सुंदरपणे पोहोचविण्याचे कार्य करणारे पाडगावकर हे मराठीतील पहिले सर्जनशील सारस्वत आहेत. खरे पाहता आगरकर, सावरकर, फुले, आंबेडकर, गाडगेबाबा यांच्या महाराष्ट्राला कबीरासारख्या बुद्धिवादी, अंधश्रद्धाविरोधी व सोळा आणे 'सेक्युलर' संताची खरीखुरी ओळख नसावी व मराठी वाचकाला ती नीट करू दिली न जावी ही खंत, खेद व आश्चर्याची बाब होय. हिंदी अध्यापकवर्गानेही कबीर फक्त अभ्यासापुरता शिकविला; त्याला व्यापक वाङ्मयीन समीक्षेत (मराठीतून) रुजू केला नाही. विशेष म्हणजे गेले सबंध वर्ष या महामानवाच्या सहाशेव्या जन्मशताब्दीचे असूनही वृत्तपत्रे, नियतकालिके,

**● मंगेश पाडगावकर**



विद्युत्प्रसारमाध्यमे, शाळा-कॉलेजे, सांस्कृतिक कार्यक्रम, राज्यशासन यापैकी कुठेही या घटनेची जागृतिपूर्वक दखल घेतली गेल्याचे दिसले नाही.

वरील पार्श्वभूमीवर पाडगावकरांच्या 'कबीर' (मौज प्रकाशन, १९९७) या पुस्तकाचे प्रयोजन विशेषच लक्षवेधी ठरते. नाही म्हणायला प्रस्तुत लेखाच्या लेखकाने १९८४च्या 'साधना' दिवाळी अंकात 'देवळाची पायरी न चढलेला संत' व 'जग अजूनही जेथे पोहोचू शकलेले नाही, तेथे ५५० वर्षांपूर्वी पोचलेला महापुरुष' असे सूत्र घेऊन विस्तृत लेख लिहिला होता. पण लेखकच 'समासा'तला असल्यामुळे त्याकडे कुणाचे फारसे लक्ष गेले नाही. परंतु मंगेश पाडगावकरांसारख्या चतुरस्र कीर्तिमान कवीच्या ह्या कार्याकडे एक 'रुटीन' भाषांतर म्हणूनच पाहिले गेले. इतकेच काय 'कबीर'ला मिळालेल्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या पुरस्कारासंदर्भातही एका नामवंत वृत्तपत्रातून तक्रारीचा सूर उमटला. वस्तुतः मंगेश पाडगावकरांच्या सदर पुस्तकाचा उपरोल्लिखित संदर्भाच्या दृष्टिकोणातून विचार केल्यास त्याचे महत्त्व उमगेल. त्यांनी येथे केवळ पद्यानुवादच केलेला नसून अत्यंत अभ्यासपूर्ण, सूत्रबद्ध, विश्लेषणात्मक आणि साक्षेपी असे 'मुक्त चिंतन' सुरुवातीला जोडले आहे. ते इतके वेधक, संतुलित आणि दृष्टिसंपन्न आहे की त्यायोगे संतसाहित्यसमीक्षेत मोलाची भर पडली आहे. शिवाय हा काव्यानुवादसुद्धा केवळ यशस्वी अनुवादाच्या पातळीवरच राहत नसून अनेक ठिकाणी तो अनुसर्जनाच्या पातळीवरही पोहोचलेला आहे. सदर लेखाच्या लघुचौकटीत पाडगावकरांचे कबीरविषयक मुक्त चिंतन आणि काव्यानुवाद यांचा (काहीसा) समीक्षात्मक असा परिचय करून द्यायचा आहे. परंतु त्यापूर्वी थोडे कबीराविषयी सांगणे आवश्यक आहे.

संत कबीराला तुलना नाही. इतर समस्त संतांपेक्षा सर्वार्थाने आगळावेगळा असा हा निखळ ज्ञानी संत आहे. त्याच्या वागण्या-बोलण्यात कणाचाही अंतर्विरोध नाही. 'सगुण-निर्गुण दोन्ही विलक्षण' असं त्याचं दुहेरी बोलणं नाही. तो पंढरीसम कोणतेही क्षेत्र जाणत नाही व त्याची वारी त्याला माहीत नाही. विशिष्ट तिथीला तीर्थक्षेत्रातील देवमूर्तींच्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने आटापिटा करणे त्याला वेडेपणाचे वाटते. तो भारतातील १४व्या शतकातला पहिलावहिला आस्थावान दलित कवी आहे. ('आस्थावान' हे विशेषण अधोरेखित). कबीराला मंदिरप्रवेशाच्या प्रतिबंधाबद्दल हीनगंडाची टोचणी किंवा दलित संत चोखामेळ्याप्रमाणे 'ठेविले अनंते'ची भावना नाही; 'द्राक्षे आंबट'ची ही प्रतिक्रिया नाही. उलट मंदिरात जाणाऱ्यांनाच तो निकालात काढतो. मुसलमान कुटुंबात वाढला असला तरी 'अगर खोदाय (खुदा) मसजीदु बसत है, और मुल्क कोहि केरा?' (खुदा जर मशिदीत राहतो तर बाहेरचा मुलुख कुणाचा?) असा त्याचा सवाल आहे. दगडाच्या मूर्तीबद्दल त्याचे जळजळीत बोल आहेत, *'पाहन पूजै हरि मिलै, तो मैं पूंजूँ पहार। तातें घरकी चक्की भली पीस खाय संसार॥''* (पाषाणाची पूजा करून देव भेटत असेल तर छोट्या दगडीमूर्तीऐवजी मोठ्ठा डोंगरच बरा नव्हे का? मग त्यापेक्षा घरातलं जातंच चांगल नाही का? निदान पीठ तरी देईल!)

आता वारकरी संतांनीही असे विचार व्यक्त केले आहेत. पण त्यांचे हात दोन्ही डगरीवर आहेत. कबीराचे तसे सुतराम नाही. तो निर्भयपणे, निर्भीडपणे आणि निर्णायकपणे सांगतो, *'मन मथुरा, दिल द्वारिका काया कासी जान। देही माही देहरा, तामें ज्योति पिछान॥'* मनाच्या देव्हाऱ्यातील आत्मज्योतीशी एकरूप होणे हेच कबीराचे अध्यात्म आहे. ही ज्योत म्हणजेच परमात्मा आणि परमात्मा म्हणजेच तुम्ही-आम्ही सर्वजण. त्या ज्योतीला सोयीसाठी नावे द्यायची राम, रहीम, अल्ला, करीम, विठ्ठल (बिठलु), गोव्यंद, हरी वगैरे. कबीराने ही सर्व नामाभिधाने वापरली आहेत, पण कबीराचा राम हा दशरथाचा पुत्र नव्हे, तो आत्मारूपी राम आहे. तो अर्थातच निर्गुण-निराकार आहे. याउलट साकार मानवदेहधारी साधक हा त्रिगुणात्मक आणि विकारशरण आहे. या विकारांवर विजय मिळवण्याचा सर्वोत्तम उपाय सर्वांभूती तो साईं रमतो (घट-घट में वह साईं रमता) याची सतत जाणीव ठेवणे हा आहे. 'माया' हे नाव असलेली फ्रॉईडियन लिबिडोसदृश प्रबळ प्रवृत्ती मानवाला पदोपदी फशी पाडते. तिच्या कच्छपी निश्चयपूर्वक न जाणे आणि आपली प्रत्येक कृती ही इतर प्राण्यांच्या, मानवांच्या चैतन्यात वसत असलेल्या आत्मतत्त्वाशी एकरूप होण्याची साधनाच आहे ही दृढ धारणा कायम मनाशी जपणे ही खरी अध्यात्म साधना आहे.

अत्यंत स्पृहणीय बाब ही की, मंगेश पाडगावकरांनी आपल्या 'मुक्त चिंतना'त एकंदर कबीरविचाराचे स्वत:च्या टिप्पण्यांसह मर्मग्राही विवेचन केलेले आहे; त्याबद्दल जाणून घ्यायचेच आहे. मात्र येथे एक ध्यानी घ्यावे की कबीर हा बसवेश्वराप्रमाणे प्रतिक्रियावादी व बंडखोर नाही. तो अस्सल ज्ञानी आहे. किशोरपणी व्रतबंध नाकारणारा बसवेश्वर जेव्हा दुसऱ्या गुरूकडून गळ्यात लिंग अडकवून घेतो तेव्हा त्याने जानवेच घातलेले असते. शिवाय तो पंथ



संस्थापक. ''एका शिवदेवाशिवाय दुसऱ्या देवदेवतांचे स्मरणही पाप आहे, व्यभिचार आहे...'' अशी त्यांची वचने वाचली म्हणजे कबीराचे सच्चेपण आणखीनच स्पष्ट होते. त्याची निराकारोपासना इतर धर्मांतील, पंथांतील निराकारोपासनेहून वेगळी व भेसळरहित आहे. हे इतर धर्म आपापले प्रेषित, त्यांच्या उपदेश-संदेशांच्या पोथ्या, त्यातून निर्माण झालेले कर्मकांड — टिळा, माळा, लिंग, क्रॉस वगैरे 'आभरणे' इत्यादींचे बळी ठरले आहेत. कबीराने या सर्व बाह्य उपचारांचा धिक्कार केला; त्यातील वैय्यर्थ ठामपणे 'वाजवून' दाखविले. 'व्यर्थ टिळा व्यर्थचि जपमाळा । तू न जाणिले जर गोपाळा ॥ (: अनुवाद, पाडगावकर). कबीर हा जगातील एकमेव 'सेक्युलर संत' आहे. त्याच्यापरता धर्म याचा अर्थ समतामूलक नैतिक आचरण. हिंदू-मुस्लिम ऐक्य घडविणारा संत अशी त्याची भलामण करून त्याला 'एनकॅश' करणाऱ्यांना कबीर कळलेलाच नसतो.

कबीराच्या संतव्यक्तिमत्त्वाची ही आध्यात्मिक बाजू जितकी तेजस्वी व दीपस्तंभासारखी तितकेच त्याचे काव्य हे सहज- स्फूर्त उत्कट अभिव्यक्तीचे 'सावळे सुंदर रूप मनोहर !' आणि पाडगावकरांसारखा आशिक कवी जेव्हा त्याच्या काव्याचे 'कविकर्मात घुसून' आस्वादन करतो आणि *'कबिरावर घन प्रीतीचा येत असे बरसून । हिरवी हो वनराइ ही, आत्मा चिंब भिजून ॥'* अशा मनोहर अनुवादातून त्याचे अनुसर्जन करतो तेव्हा रसिक व साक्षेपी वाचक हरखून जातो. कबीराने 'त्या' हृदयस्थ आत्मज्योतीला ज्ञानचक्षूंनी ओळखले आहे आणि त्या तेजपुंजाला प्रियकर कल्पून व स्वतः प्रियतमा बनून आध्यात्मिक अभिसाराचे मनोहारी असे काव्यात्म इंद्रधनुष्य रंगविले आहे. आणि तितक्याच अनुभूतियुक्ततेतून मिस्कील उपरोधिकपणे अंधश्रद्धांचे वाभाडे काढले आहेत. मंगेश पाडगावकरांसारख्या एकाच वेळी रोमॅण्टिक, औपरोधिक, सौंदर्योपासक, बुद्धिप्रामाण्यवादी व दंभभंजक आनंदयात्री कवीला कबीरामध्ये जणू समानधर्मा भेटला व ते त्याच्या प्रेमात पडले आणि त्यातून 'कबीर' या सुंदर पुस्तकाची निर्मिती झाली.

हिंदी संतकाव्यातील मीरा (१९६५), कबीर (१९९७) व सूर (१९९९) ह्या तीन शिखर कवींना अनुवाद प्रक्रियेतून मराठीत अवतरित करून पाडगावकरांनी ऋषिऋण फेडले आहे. लक्षणीय योग असा की पाडगावकरांच्या कविव्यक्तित्वात वरील तीन्ही कवींच्या स्वभाव व काव्यवैशिष्ट्यांचा संगम झालेला आहे. रोमॅण्टिक मीरा व सूर आणि आध्यात्मिक तादात्म्याबरोबर नाठाळांच्या माथी काठी हाणणारा कबीर या सर्वांच्या भावनिक व सर्जनात्मक बलस्थानांच्या अनुषंगाने पाडगावकरांनी आपले साधिकार अनुवादसर्जन करून कबीर व सूर यांच्यासंबंधीच्या मुक्त चिंतनातून त्यांच्या आध्यात्मिक बैठकीचा व काव्यगुणांचा प्रत्यय घडविला आहे. शिवाय 'सूरदास' ह्या सांगतेच्या अनुवादकृतीच्या प्रस्तावनेत आधीचे दोन कवी व मराठी संतकवी या सर्वांचा एकत्र परामर्शही घेतला आहे. ही घटना तुलनात्मक वाङ्मयास्वादाच्या क्षेत्रातील निःसंशय एक अभूतपूर्व व अभिनंदनीय आहे. या संदर्भात एक माझे निरीक्षण असे की पाडगावकर मीरा व सूर यांच्या भावसंवेदनापरिप्लुत काव्याविष्कारावर भाळले, परंतु कबीराच्या 'आयडियॉलॉजी'मध्ये त्यांना समानधर्मा भेटला आहे. सूरदासाच्या पदबांधणीचे व कल्पनाविलासाचे वर्णन त्यांनी खूपच रममाण होऊन केलेले दिसते. अर्थात कबीराची भाषा, नैसर्गिक ऊर्जा, रूपक-प्रतीकयोजना वगैरेंचा आस्वाद त्यांनी घडविला आहेच; परंतु कबीराच्या विद्युत्‌जहाल विचारांचा लोळच असा की त्याला न्याय दिल्यावाचून त्यांना पुढे जाणे शक्य नव्हते.

'कबीर : एक मुक्त चिंतना'साठी पाडगावकरांनी भरपूर अभ्यास केलेला जाणवतो. विशेषतः त्यांना आचार्य हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या 'कबीर' (१९४२) या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे खूप साहाय्य झाले आहे. एका क्षणाचे अर्धविषयांतर करून हिंदी काव्यसमीक्षेतील एका विचित्र व चिंत्य वस्तुस्थितीचा उल्लेख करावासा वाटतो. खुद्द हिंदी भाषी वाङ्मयक्षेत्रातच १९४२ पर्यंत व पुढेही दीड-एक दशक कबीरकाव्याभोवती लोकविरोधी, प्रतिक्रियावादी, आक्रमक व तापसी असे वलय निर्माण करून या काव्याची उपेक्षाच होत राहिली होती. लक्षणीय असे की गुरुदेव रवींद्रनाथांनी १९१० साली क्षितिमोहन सेन यांना कामास लावून कबीर-साहित्याचे मौखिक परंपरेतून प्राप्त होणारे संकलन करविले होते व १९१४ साली स्वतः कबीराच्या १०० कवितांचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला होता. हजारीप्रसादांनी 'कबीर' हे पुस्तक लिहून अभ्यासकांना हलवून जागे केले. त्यांनी ठणकावून विधान केले की, ''हिंदी साहित्य के एक हजार वर्षों के इतिहास में कबीर जैसा व्यक्तित्व लेकर कोई लेखक उत्पन्न नहीं हुआ ।'' ते म्हणतात, ''वे वाणी के 'डिक्टेटर' थे ।... गोष्ट ज्या ढंगात त्यांना सांगायची होती ती त्याच रीतीने त्यांनी भाषेकडून वदवून घेतली. जमेल तेव्हा गोडीतून नाहीतर तिचा कान धरून''
पाडगावकरांच्या मुक्त चिंतनात कबीराची कविता व शब्दकळा यावर अशाच धाटणीचे भाष्य सुंदरपणे आले आहे. उदाहरणार्थ, ''भाषेकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण रोखठोक व व्यावहारिकही आहे

आणि त्याच क्षणी तो त्याच्या उत्कट आंतरिक अनुभवाशी घट्ट जोडलेलाही आहे... तो कधी दणकावून सांगतो तर कधी ठणकावून. अशा वेळी जो तोंडाला येईल तो शब्द कबीराचा असतो. अट एकच असते आणि ती म्हणजे आतला जो 'बोलनहारा' आहे त्याच्याशी या शब्दाने इमान राखले पाहिजे.''

'कबीर : एक मुक्त चिंतन'मधील कबीराच्या धर्मविषयक विचारांबाबत पाडगावकरांचे पुढील विधान नितान्त लक्षवेधी आहे, ''धर्म ही संस्था किंवा संघटना मान्य करणाऱ्या कोणालाही कबीर परवडणारा नाही... 'धर्म न मानणारा आध्यात्मिक माणूस' असे कबीराचे वर्णन करावे लागेल.'' या मुक्त चिंतनात कबीराच्या विकासातील टप्पे, कबीरावरील प्रभाव, काव्यसौष्ठव व भाषासौंदर्य इत्यादी अनेक उपविषय आले आहेत व कबीरकाव्याची उत्कृष्ट परिक्रमा झालेली आहे. अर्थात त्यातील काही मुद्दे मतभेदाचे असू शकतात. उदाहरणार्थ, 'माया'नामक शक्तीबद्दल कबीराला भीती नाही किंवा मायाविरोध हा त्याच्या विकासातला एखादा टप्पा नाही. मायाखंडन हा कबीरकाव्याचा केंद्रीय विषय आहे. तसेच 'उलटबांसी' (प्रतीकात्मक कोड्यातून बोलणारी उक्ती) ही काही कबीराची काव्यप्रकृती ठरत नाही. जाता जाता केलेला प्रतीकात्मक बुद्धिविलास या दृष्टीने अशा संतरचनांकडे पाहिले जावे असे वाटते. शिवाय प्रतीक व रूपक यातील सूक्ष्म भेदही येथे ध्यानी घ्यावा लागेल. आणखी असे की कबीरकाव्यातील उलटबांसी हे नाथसंप्रदायी कवितेतील संध्या-भाषा (म्हणजे छायाप्रकाश भाषा) या प्रकारच्या द्व्यर्थी शब्द-प्रतीक रचनात्मक भाषेतील गुप्त संदेशांचेही हे परंपरापालन आहे. स्व-भाव नव्हे.

लेखमर्यादा संभाळीत असताना अनुवादकार्याबद्दल सांगायचे राहून जाऊ नये म्हणून त्यासंबंधी संक्षेपाने. प्रथमत: मौज प्रकाशनाच्या उत्कृष्ट निर्मितीबद्दल समाधान व्यक्त केले पाहिजे. पाडगावकरांनी मीरा, कबीर व सूर या तीनही पुस्तकांत डाव्या पानावर हिंदी पद्य व उजव्या बाजूस पद्यानुवाद अशी धाटणी अवलंबल्यामुळे या अनुवादाला विशेष प्रत्ययात्मकता प्राप्त झालेली आहे. पुस्तकाच्या शेवटी दिलेली अकारविल्हे सूची उपयुक्त ठरली आहे. अनुवादाच्या दृष्टीने पाहता मुख्य गोष्ट ही की ५५० वर्षांपूर्वीच्या बोली हिंदीचा प्रमाण मराठीत झालेला हा अनुवाद आहे. त्यामुळे शब्दनिवड, व्याकरणिक रचना याबाबतीत काही वेगळी वाट काढावी लागली आहे. स्वत: पाडगावकरच सांगतात, ''आजच्या मराठी भाषेची ठेवण आणि एक कवी म्हणून रचनेच्या बाबतीतले माझे विशिष्ट व्यक्तिमत्त्व आणि वळण हे घटक इथे नाकारणे शक्य नव्हते.''

उल्लेखनीय असे की एकंदर अनुवादात शक्यतो छंदबदल झालेला नाही. १५० दोह्यांचे दोहा छंदातच रूपांतरण झाले आहे. वस्तुत: दोहा हा मराठीच्या वहिवाटीचा छंद नव्हे. परंतु पाडगावकरांनी त्याची लय छान सांभाळलेली आहे. उदाहरणार्थ, *'तेरा साईं तुज्झमें ज्यों पुहुपन में बास। कस्तूरिका मिरग ज्यों फिर फिर ढूँढे घास ॥''* याचा अनुवाद, *'तुझ्यात रे स्वामी तुझा जैसा वास फुलांत। कस्तुरिमृग भटकत फिरे शोधित गंध तृणात ॥'* येथे पुहुपनसाठी पुष्पात असे न येता फुलात असे तद्भव रूप योग्यपणे आले आहे. तसेच 'फिर फिर'चे 'भटकत फिरे' असे करून वाक्यविन्यासही बदलून घेतला आहे. अशाच प्रकारची किमया इतरत्रही, अर्थातच, झालेली आहे.

छंदबदल हा गीतांच्या अनुवादात बऱ्याचदा करावा लागला असला तरी भावलय सांभाळण्यावर विशेष लक्ष दिले गेले आहे. त्यातही छंद कायम ठेवून बोली व प्रमाण भाषेतील लय सांभाळण्याचे कौशल्य विशेष अभिनंदनीय आहे. उदाहरणार्थ, *'दरियाव की लहर दरियाव है जी। दरियाव और लहर भिन्न कोयम्?''* (अनुवाद) *लहर दर्या असे दर्या लहर। भिन्न कोणी नसे एक होयम् ॥''* येथे 'कोयम्' हा कबीराचा झोकदार शब्दबदल अनुवादातही तसाच उमटला आहे. याचबरोबर छंद बदलातही भाव लय कशी जमली आहे हेही पाहण्याजोगे आहे. *उदाहणार्थ, 'काहे री नलनी तू कुम्हिलानी। तेरीही नालि सरोवर पानी ॥'* (अनुवाद) *'जलात नलिनी, असुनि अशी। कोमेजसि तू सांग कशी ॥* काही ठिकाणी तर अनुवाद हा मूळ रचनेप्रमाणे जपलेला आहे. उदाहरणार्थ, 'कबीर म्हणे त्यागिता अहंता। भक्ताला भगवंत योग्यता ॥

'कबीर'मधील अनुवाद संपूर्णत: सुसफल झाला आहे असे म्हणणे मात्र अवघड आहे. अत्यंत निदिध्यासपूर्वक हिंदी जाणकारांशी संपर्क साधून व स्वत:चे समाधान होईपर्यंत 'ठाण मांडून' पाडगावकरांनी हे कार्य केले आहे. प्रस्तुत लेखकाला हे व्यक्तिश: ज्ञातही आहे. तरीही काही शब्दांबाबत, उक्तींबाबत थोडी तक्रार राहणारच. उदा. 'जोग जुगुत सों' (पृ. ७८-७९) याचा अर्थ 'जागृति योगे' हा न होता 'योग-युक्तीने' असा होणार. ''सारी दुनिया भई सयानी, मैं ही इक बौराना'' (पृ. ९०) येथे 'बौराना'साठी 'मला फक्त पागल माना' असे म्हणण्याऐवजी 'मीच फक्त दिवाणा' असे म्हणून 'बौराना'चा उचित शब्दानुवाद साधता आला असता वगैरे.

परंतु हे सर्व 'समासा'तील मुद्दे आहेत. मुख्यत: अनुवाद कबीरकाव्याला न्याय देणाराच झाला आहे. आणि हे महत्कार्य मराठी वाङ्मयात वैचारिक व काव्यात्मक अशी दुहेरी भर टाकणारे ठरले आहे, हे नि:संशय.

. . . . . . . . . . . . . **श्रीरंग संगोराम**

# अधांतर




## जयंत पवार

मुंबई महानगरीमधील गिरणगाव आणि त्यामधील श्रमिकांचे, कष्टकरीवर्गाचे जग हा एके काळी उद्योगशील, विशिष्ट प्रकारच्या मराठी संस्कृतीचे जतन करणारा चैतन्यशील असा भाग होता. या जगामधील परस्परांविषयीचा स्नेहभाव, आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा आटोकाट प्रयत्न, या श्रमिकवर्गाने भांडवलदारांविरूद्ध आणि प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात उभारलेले लढे, त्यामधील जयापजय, हर्षामर्षाचे प्रसंग या साऱ्यांचे चित्रण मराठी साहित्यात अपवादानेच झालेले आहे. भा. वि. वरेरकरांसारख्या नाटककारांना श्रमिकांच्या या दुनियेतील प्रश्नांची जाण



होती. परंतु ती जाण आपल्या नाटकांमधून प्रकट करीत असताना त्यांनी स्वीकारलेल्या आदर्शवादी आणि काहीशा रोमँटिक दृष्टीमुळे त्यांच्या नाटकांचे स्वरूप देखील तसेच झाले. 'कामगार रंगभूमी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नाटकांमधून श्रमिकांच्या या जीवनाचे, त्यामधील प्रश्नप्रतिप्रश्नांचे चित्र भावनेने ओथंबलेल्या, भडक अशा प्रसंगांद्वारे बटबटीतच रेखाटले गेले. साठीच्या दशकात, गिरणगावाचे, त्यामधील माणसांच्या कष्टप्रद, संघर्षमयी जीवनाचे प्रत्ययकारी दर्शन नारायण सुर्व्यांच्या कवितेने मराठीत प्रथमच घडविले. सुर्व्यांच्या कविता हा श्रमिकांच्या दुनियेतील संघर्षाचा आणि चैतन्यशीलतेचा सळसळता, प्रगल्भ असा पहिला उद्‌गार होता. त्यानंतरचा काळ मात्र गिरणगावाच्या दृष्टीने अतिशय खडतर व झपाट्याने बदलणारा ठरलेला आहे. प्रदीर्घ काळ चाललेल्या गिरणी कामगारांच्या संपाने गिरणगावाचे आणि त्यामधील महाराष्ट्राच्या विविध भागांतून, विशेषत: कोकणपट्टीतून आलेल्या माणसांचे, कुटुंबांचे जीवन आणि पर्यायाने त्यांचे भावजीवन उध्वस्त झाले. गिरण्यांचे स्थलांतरण आणि आधुनिकिकरण करण्यामधून निर्माण झालेल्या जमिनींच्या प्रश्नांमुळे तर कामगार आणि त्यांचे कुटुंबीय यांचे प्रश्न अधिकच जटिल बनले. एके काळी अनुभवाने आणि सांस्कृतिक एकात्मतेने समृद्ध असलेल्या गिरणगावाची पडझड सुरु झाली. तिथल्या माणसांना आपला संघर्षपूर्ण तरीही उभारी देणारा भूतकाळ आणि हरवलेला भविष्यकाळ या दोन टोकांमध्ये अधांतरी वर्तमान जगावा लागतो आहे. गिरणगावाचे हे विद्यमान वास्तव आहे. मात्र या जाणिवेचे प्रतिबिंब मराठी साहित्यात उमटलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. एकदोन अपवाद वगळता, बदलता गिरणगाव, तिथल्या माणसांचे उध्वस्त आणि आधार हरवलेले अधांतरी जीवन,भावजीवन, आर्थिक विषमतेमुळे तेथे चंगळवादाने



केलेला प्रवेश, परिस्थितीपुढे अगतिक, असहाय्य झालेल्या काही जणांनी आर्थिक संपन्नतेसाठी स्वीकारलेले गुन्हेगारी मार्ग आणि या साऱ्यांमधून नैतिक मूल्यांची, एका जीवनपद्धतीची होणारी पडझड; असा समग्र जीवनानुभव आजपावेतो मराठी साहित्यात अस्पर्शितच राहिला होता. मात्र या गिरणगावाच्या मुशीतच वाढलेल्या जयंत पवार या तरुण नाटककाराने आपल्या 'अधांतर' या नाटकात हा समग्र अनुभव व्यक्त करण्याचे आव्हान स्वीकारले आणि हा अनुभव भेदकपणे आणि प्रत्ययकारकरित्या साकार करण्यात तो यशस्वीदेखील झाला आहे.

जयंत पवार यांनी या पूर्वी 'दरवेशी', 'मेला तो देशपांडे', 'उदाहरणार्थ', या एकांकिका आणि 'पाऊलखुणा (वंश)' व 'जळिताचा हंगाम' ही पूर्ण नाटके लिहिली आहेत. आपल्या एकांकिकांमधून काहीसे अमूर्त स्वरूपाचे अनुभव

डॉ. दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली झालेला गिरणी कामगारांचा संप अयशस्वी ठरला, ढेपाळला आणि त्याचा फायदा घेऊन गिरणी मालकांनी एक एक करून मुंबईतल्या अनेक कापड गिरण्या बंद केल्या. कापड उद्योगामधला कामगार देशोधडीला लागला आणि ही त्याची हालत आजहि कायम आहे. त्यांचं उपजीविकेचं साधन हिरावून घेतलं गेलं. अनेक जण गांवाला परत गेले. कांहींनी वडापाव, भाजी असे स्टॉल्स टाकले, छोटेमोठे धंदे करून पोट भरायचा प्रयत्न केला. या वस्तुस्थितीचे भयानक परिणाम आज तर अधिक तीव्रतेने आपल्यासमोर उभे राहात आहेत. गिरण्यांच्या जमिनी विकून तिथे कॉर्पोरेट ऑफिसेस, बोलिंग ॲलीज् आणि व्हिडियो पार्लर्स अशी उच्चभ्रूंच्या करमणुकीची साधने उभी राहतायत्. गिरणगांवातून केवळ कामगार उखडून टाकला जात आहे एवढेच नव्हे, तर गिरणगावाचा सांस्कृतिक चेहरामोहराच संपूर्णपणें बदलला जातोय. मराठी नाटकांचा मध्यमवर्गीय प्रेक्षक या बदलाविषयी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचतो, क्वचित एखादा लेख वाचतो, आंदोलनाविषयीची माहिती वाचतो. पण हे सारे त्रयस्थपणें. गिरणी कामगारांच्या कुटुंबावर आज काय पाळी आली आहे याचं वास्तव 'अधांतर'मधून जेव्हां जळजळीतपणें त्याच्या समोर उभं राहतं तेव्हां हा प्रेक्षक दचकतो, हादरून जातो.

– डॉ. हेमू अधिकारी



व्यक्त करणाऱ्या पवारांचे 'वंश' हे पहिले व्यावसायिक नाटकदेखील एका सामाजिक समस्येशी निगडीत होते.

प्रस्तुत 'अधांतर' या नाटकाच्या कथानकाचे प्रथमदर्शनी जाणवणारे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे थेट समकालीनत्व हे होय. नाटककाराने या नाटकात बदलत्या गिरणगावाचा अनेक मार्गी वेध घेतलेला आहे. हा वेध प्रथमदर्शनी एका कुटुंबाच्याद्वारे घेतलेला दिसतो. मात्र, या नाटकामधील 'धुरी' कुटुंबातील माणसांना घेरून राहिलेले प्रश्न हे आजच्या गिरणगावाचे समग्र प्रश्न बनून समोर येतात. त्यामुळेच या कुटुंबात बेकारीने आणि सततच्या नकाराने निष्क्रीय झालेला 'मोहन' नावाचा तरूण दिसतो. सन्मार्गाने पैसा मिळविण्यापेक्षा छोट्याछोट्या गुन्ह्यांपासून सुरूवात करून मोठ्या गुन्ह्यांपर्यंत पोहचून आर्थिक समृद्धी प्राप्त करू पाहणारा आणि अखेरीस त्या भयावह सापळ्यात अलगद जाऊन पडणारा 'नरू' नावाचा आणखी एक तरूण इथे भेटतो. बंद पडलेल्या गिरण्यांच्या प्रवेशद्वाराशी प्रारंभी उपोषणाला बसलेला आणि शेवटी मालकाने दिलेली नुकसानभरपाई इतर कामगारांच्या बरोबरच अगतिकपणे स्वीकारून आपल्या लढ्याचा पराभव मान्य करणारा कामगार कार्यकर्ता 'अरविंद राणे' इथे दिसतो. चंगळवादी जीवनाच्या लालसेने आपल्या गरीब परंतु कष्टाळू आई-वडिलांचे संस्कार झुगारून अनैतिक मार्ग स्वीकारणारी विवाहित 'मंजू' इथे भेटते. ज्याच्या जगण्याची मुळे इथल्या वास्तवात आहेत, परंतु प्रत्यक्षात मात्र जो या वास्तवापासून तुटलेला आहे, तकलादू वाङ्मयीन पर्यावरणात रमलेला आहे, असा 'बाबा' नावाचा, लेखक इथे आहे. या पात्रांच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या अशा अनेक आशयसूत्रांमुळे समकालीन गिरणगाव या कथानकामधून साक्षात् झालेला आहे. आणि हे या कथानकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

महानगरातल्या जीवनाचे तीन स्तर, भाग असू शकतात. एक फ्लॅटसंस्कृतीमध्ये राहणारा वर्ग, दुसरा चाळींमध्ये राहणारा वर्ग आणि तिसरा बकाल अशा झोपडपट्ट्यांमधून जगणारा वर्ग. सर्वसाधारणपणे, फ्लॅटसंस्कृतीमध्ये राहणाऱ्या वर्गाचे जीवन हे बंदिस्त जीवन असते. सभोवतालच्या घटनांचे पडसाद या वर्गाच्या दैनंदिन, व्यक्तिगत जीवनावर फारच अल्प प्रमाणात उमटत असतात. त्यामुळे स्वतंत्र फ्लॅटच्या बाहेरचे वास्तव हे बऱ्याच प्रमाणात बाहेरच राहाते. उर्वरित दोन वर्गाचे जीवन मात्र भिन्न असते. कुटुंबाच्या, चाळीच्या बाहेरचे सामाजिक वास्तव आपसुकच तिथल्या व्यक्तींच्या दैनंदिन जीवनात प्रवेश करीत असते. हे वास्तव या माणसांच्या जीवनात हर्षामर्षाच्या अवस्था निर्माण करीत असते. गिरणगावाच्या चाळ-

'अधांतर' केवळ गिरणी कामगारांचे वास्तव, त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न, त्यांतून त्यांची मुले गुन्हेगारी वळणावर जाण्याची अपरिहार्यता हे सामाजिक वास्तव मांडून थांबत नाही. त्या वास्तवांत अडकलेल्या माणसांची झालेली मानसिक गोची, त्यांचे कोसळणारे नातेसंबंध यांचा शोध घेण्याचा इथे प्रयत्न आहे. 'बाबा'सारख्या साहित्यिक प्रवृत्तीच्या तरुणाची या वास्तवामुळे झालेली कोंडी आणि त्यांतून आलेली विफलता हे कशाचे प्रातिनिधित आहे? कामगारांच्या घरांत जन्मलेल्या पण मध्यमवर्गीय, पांढरपेशा साहित्यविश्वाशी स्वत:ला आयडेंटिफाय करणारा हा तरुण आहे. त्याला या घरांतली माणसे आपली वाटत नाहीत, इथले विश्व, इथली संस्कृती तो झिडकारतो आहे. पण ती माणसे आणि ती संस्कृती त्याला येऊन चिकटतेच आहे. तो त्यातून बाहेर पडू शकत नाही. या त्याच्या जगण्याच्या स्वत:ची साहित्यउर्मी टिकविण्याच्या धडपडीतून त्याला आलेलं फ्रस्ट्रेशन हे त्याच्यासारख्याच इतर अनेक तरुणांना आलं असणार. बाबाची अस्वस्थता, त्यातून आलेला स्वार्थीपणा, वडिलांच्या विम्याच्या पैशांतून आपला वाटा मागण्यापर्यंत त्याची मजल जाते. हे सगळंच चित्रण विदारक, अस्वस्थ करणारं आहे. दुसऱ्या बाजूला गिरणीतला संप चालू ठेवून त्या मालकांच्या विकण्याचा मालकांचा डाव मोडून काढण्यासाठी उपोषण करणारा युनियन लीडर राणे - या कुटुंबाचा जावई आहे. अखेर चंगळवादी संस्कृतीच्या प्रभावाखाली येऊन कामगार संप सोडतात आणि मालकांनी 'ऑफर' केलेली रक्कम स्वीकारून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारतात तेव्हाची राणेची तडफड या साऱ्या सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीवर 'अधांतर' घडते. गिरणी कामगारांचे संसार उद्ध्वस्त होणारी परिस्थिती कां निर्माण होते? त्याच्यापाठीमागे राजकीय, सामाजिक कारणे कोणती? याचा सखोल शोध घेण्याचा प्रयत्न या नाटकात नाही आणि तसा तो असावा असा आग्रह धरणे हेदेखील बरोबर नाहीं. परंतु 'अधांतर' लिहितांना जयंत पवार या सामाजिक परिस्थितीचे - 'अधांतर'मधल्या कुटुंबाची वाताहत करणाऱ्या परिस्थितीचे — भान कधीही सोडत नाहीत. त्यामुळे केवळ गिरणी कामगारांच्या एका कुटुंबाच्या वाताहतीचे विदारक दर्शन इतके मर्यादित स्वरूप 'अधांतर'ला राहत नाही. ते नाटक अधिक व्यापक होते, बघतां बघतां लुप्त होत चाललेल्या गिरणगांवच्या आणि तिथल्या संस्कृतीच्या वाताहतीचे चित्रण आपल्यासमोर विलक्षण ताकदीने उभे करणारे नाटक होऊन जाते. आणि हेच 'अधांतर'चे मोठेपण आहे.

– डॉ. हेमू अधिकारी

संस्कृतीमधील हा वैशिष्ट्यपूर्ण घटक प्रस्तुत 'अधांतर' या नाटकात प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. नाटकांमधील पात्रांचे विकार, संघर्षात टिकून राहाण्याची त्यांची वृत्ती, भयावह वास्तवापुढे त्यांचे कोलमडून कोसळणे, यांच्याबरोबरीनेच त्यांच्या सभोवतालचे सामाजिक वास्तवदेखील इथे व्यक्त होते आणि हे या नाटकाचे आणखी एक वैशिष्ट्य ठरते.

हा नाट्यानुभव संपूर्णपणे एतद्देशीय, ठळकपणे जाणवावा असा देशी स्वरूपाचा आहे. या पात्रांची भाषा, त्यांच्या चालीरिती, त्यांच्या नीती-अनीतीच्या कल्पना, त्यांचे कौटुंबिक वास्तव, प्रसंगी त्यांना येणारी निष्क्रियता, हताशता, बदललेल्या आर्थिक प्रश्नांनी त्यांचे गुदमरलेले, घुसमटलेले दैनंदिन जीवन, हे या नाटकामधील घटक संपूर्णपणे एतद्देशीय वास्तवातले आहेत. आणि त्यांच्यामुळेच या नाटकाला देशीयतेचे प्रभावी परिमाण लाभलेले आहे. अलिकडे मराठीमधील काही लेखक/कवी/समीक्षक अनुभव हा एतद्देशीय, देशी असावा असा आग्रह वारंवार धरू लागलेले आहेत. आणि ते बरोबरही आहे. मात्र, त्यांच्यापैकीच काहीजण आपल्या लेखनामधून पाश्चात्य विचारधारा/प्रणालींचा आविष्कार करीत असतात. त्यांनी अनुभवाचे देशीपण म्हणजे काय, हे समजून घेण्यासाठी हे नाटक आवर्जून वाचावयास हवे.

नाटकामधील पात्रांच्या आदानप्रदानातून, क्रिया-प्रतिक्रियांमधून नाट्यानुभव साकार होत असतो. बहुतांशी मराठी व्यावसायिक नाटकांमधील पात्रे / व्यक्तिरेखा ह्या ठरीव साच्याच्या, एकरंगी असतात. प्रस्तुत 'अधांतर'या नाटकामधील व्यक्तिरेखा अशा ठरीव साच्याच्या झालेल्या नाहीत. त्यांना मानवी स्वभावाचे, त्यांच्या वासनाविकारांचे, राग-लोभ-द्वेष-मत्सराचे अनेक पदर लाभलेले आहेत. या नाटकामधील प्रत्येक पात्राचे त्याच्या वाट्याला आलेल्या अनुभवांविषयी स्वतःचे असे एक समर्थन आहे. नाटककाराने प्रत्येक पात्राच्या उभारणीसाठी विद्यमान वास्तवातील अनेक संदर्भ वापरून ही पात्रे सजग केली आहेत. यामधील 'आई' मुळात कोकणपट्टीतून आलेली, सगळे आयुष्य गिरणगावात गेलेली, कालचा आणि आजचा गिरणगाव पाहिलेली, नवऱ्याविषयी आत्यंतिक आदर बाळगणारी, खडतर प्रसंगातदेखील मुलांचा पहाडासारखा आधार बनलेली गिरणगावातील प्रातिनिधिक आई आहे. ही व्यक्तिरेखा मराठी नाट्यपरंपरेतील समर्थ अशी व्यक्तिरेखा आहे. मोठा मुलगा 'बाबा'याच वास्तवात राहणारा पण 'स्युडो' लेखक/कवींचा निदर्शक आहे. (नाटककाराने या व्यक्तिरेखेसाठी उपयोगात आणलेल्या वास्तवातील काही तपशिलांमुळे ही व्यक्तिरेखा वाचीत/ पाहत असताना आजच्या मुंबईतील वाङ्मयीन वातावरणातील एक-दोन तरूण लेखक/कवी/समीक्षकांची चाणाक्ष रसिकांना सहजगत्या आठवण व्हावी, इतकी ही व्यक्तिरेखा वास्तवदर्शी झालेली आहे.) वैफल्याने ग्रासलेला आणि अखेरीस अगतिक, असहाय्य झालेला 'मोहन' त्याच्या वासनाविकारांसह साकार झाला आहे. महानगरातल्या अधोविश्वाकडे खेचला जाणारा 'नरू', त्याचा राग, लोभ, मोकळेपणा, बेपर्वाई, पुंडगिरी आणि त्याची अगतिकता यांसह व्यक्त झाला आहे. स्वप्ने बघणारी, प्रसंगी तरल, भावुक होणारी परंतु चंगळवादाचा बळी ठरून अखेरीस उध्वस्त झालेली 'मंजू' ही एक वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा आहे. हीच बाब इतर पात्रांच्याबाबतीतदेखील सांगता येईल. या सगळ्याच व्यक्तिरेखा व्यामिश्र, गुंतागुंतीच्या झालेल्या आहेत आणि म्हणूनच त्या अधिक प्रत्ययकारी, सशक्त आणि मानवी झालेल्या आहेत.

जीवनाचा जो तुकडा नाटककाराने नाटकासाठी निवडलेला आहे त्यामधील माणसांचे सहज -स्वाभाविक वाटावेत अशा उचित संदर्भांनी आणि तपशीलांनी परिपूर्ण असे संवाद हे या नाटकाचे लक्षणीय असे वैशिष्ट्य आहे. अलंकरणाचा मोह टाळून बोलभाषेच्याद्वारे प्रसंगामधील ताण, विनोद, तरलता, फटकळपणा, भेदकता व्यक्त करणारे हे संवाद आहेत. गिरणगावातील तरुणांच्या विश्वात सहजगत्या वापरले जाणारे शब्दप्रयोग या संवादांमध्ये नाटककाराने चपखलपणे पेरल्यामुळे हे संवाद अधिकच वास्तवदर्शी झाले आहेत.

सारांश, नाट्यानुभव, पात्रे, त्यांची भाषा या घटकांच्या विलक्षण संयोगातून नाटककाराने एक भेदक वास्तव साकार केले आहे. 'अधांतर' हे नाटक या दशकातील मराठी नाटकांमधील लक्षणीय आणि वैशिष्ट्यपूर्ण असे वास्तववादी नाटक आहे.

मध्यमवर्गीय मानसिकतेला रुचणारी व्याज-वास्तवता आणि विनोद यांचे काही प्रमाणात प्राबल्य असलेल्या विद्यमान मराठी रंगभूमीवर असे समग्र जीवनानुभव कवेत घेणारे नाटक क्वचितच येत असते. प्रशांत दळवी यांच्या 'चारचौघी' या नाटकानंतर जयंत पवार यांचे हे 'अधांतर' नाटक हा असाच एक अस्वस्थ करणारा, अंतर्मुख करणारा प्रयोग आहे. ज्या वाचकांना या नाटकामधील अनुभवविश्व परिचित आहे त्यांनी पुनःप्रत्ययाकरिता आणि ज्यांना हे अनुभवविश्व परिचित नाही त्या वाचकांनी अनोख्या जीवनप्रत्ययासाठी हे नाटक आवर्जून वाचावयास हवे असे मनोमन वाटते.

. . . . . . . . . . . . . . **नीलकंठ कदम**






# मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार : दखनी भाषा

**• श्रीधर रंगनाथ कुलकर्णी**

अठराव्या शतकाच्या मध्यावर औरंगाबादचा एक दखनी कवी अरिफुद्दीन अज़ीज उत्तर भारताच्या भ्रमंतीसाठी गेला होता. (इ.स. १७६४ला त्याने नांदेडला समाधी घेतली.) कवीच तो. चोहोकडे निरीक्षण करीत असताना त्याला काही मजेदार अनुभव आले व तो सहजपणे म्हणाला,

*आके दकनसे जबान का खूब फेरा है पटा*
*या अली अज़ीज का हिंद में जस हो चुका*

(अर्थ : दक्षिण देशातून आली काय व सगळीकडे हिच्याच नावाचा डंका आहे हे पटले, हे परमेश्वरा, हिंदुस्थानात तुझ्या लाडक्या अज़ीजचा जयघोष झालाय की.)

प्रा. श्री. रं. कुलकर्णी यांचा 'दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार' हा ग्रंथ वाचल्यानंतर सहज हे कव्युद्गार आठवले. दखनी भाषेने आपल्या सौंदर्याने व सामर्थ्याने दक्षिण भारत तर व्यापलाच पण तिने उत्तरेतही आपली कीर्ती पसरवली हे पाहून कवीला परम संतोष झाला. कवी या पंक्तीत 'हिंद में' असे म्हणत असला तरी त्याला भाषिक व्यवहारात हिंदीही अभिप्रेत आहे. मुळात ती आहे हिंदवी, हैंदवी. ते तिचे नामकरण फार उशिरा, एकोणिसाव्या शतकात, झाले; पण त्यापूर्वी काय होते? ही काव्यपंक्ती काही कुलकर्णी यांच्या ग्रंथातून मी घेतली नाही; पण जनसामान्य व विद्वानांची अनेक शतके अशी धारणा होती की, भारताच्या भाषिक विकासप्रक्रियेत उत्तर भारतात ज्या विविध भाषा वा बोली वा प्रादेशिक भाषा होत्या, त्यात खडी बोली सर्वात जुनी. कबीराच्या काव्याने ती नटली होती. मीरेच्या कवितेने बहरली ती व्रजभाषा. मैथिली, अवधी या आणखी दोन प्रादेशिक भाषा. त्यांचा स्वत:चा साहित्यसंसार व शब्दभांडार विकसित होत होते. पण ज्या भाषेला आपण हिंदी वा फारसी लिपीतील उर्दू म्हणायचे तिचा आरंभ हा फार उत्तरकालीन आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी स्वत:च्या मतलबासाठी व सांस्कृतिक आक्रमणासाठी वापरलेली ती एक युक्ती आहे. या प्रादेशिक भाषांनाही व्यापून उरणारी, किंबहुना नामदेवांच्या अभंगरचनेने सर्व भारताला मान्यताप्राप्त व प्रेरणास्रोत ठरलेली भाषा ही आपण आज समजतो वा म्हणतो ती हिंदी नसून 'दखनी' आहे, हे डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांच्या या ग्रंथातील एक महत्त्वाचे प्रतिपाद्य आहे.

दखनी भाषेने महाराष्ट्राच्या भूमीत आपले अस्तित्व रुजवून उत्तर भारत व दक्षिण भारत यांनाही पाचसहा शतके आपल्या कवेत कवटाळावे, हे झाले कसे? घडले कसे? इतर कुणी कसे घडू दिले? प्रश्न दिसायला सोपे वाटले तरी भारताच्या सांस्कृतिक गुंतागुंतीची ज्यांना जाण आहे, त्यांना समजून घ्यायला व द्यायला हे प्रश्न अवघड आहेत. ही अवघड बाब, इतिहासाचा दहा शतकांचा इतिहास सर्व अंगांनी, तपशिलाने सोदाहरण तपासून डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी सोपी केली आहे. ती पटली व मान्य झाली तर एका बाजूने भारताच्या भाषिक ऐश्वर्याची उर्जस्वल बाजू झळाळून उठेल. दुर्लक्ष केले तर आपल्या इतिहासाकडे आपण करंटेपणाने पाहत असू असे सिद्ध होईल. एरवी विसावे शतक ओलांडताना या दुसऱ्या सहस्रकाची — अक्षरश: एक हजार वर्षांची — ही मीमांसा सयुक्तिक ठरली तर कालप्रवाहात विरत जाणाऱ्या त्या इतिहासाला एका अभ्यासकाने केलेले हे अभिवादन ठरेल.

साहजिकच प्रश्न उपस्थित होईल की, हे गूढ आहे तरी काय? सामान्यत्वे भाषिक व सांस्कृतिक व्यवहारात ऐतिहासिक दृष्टीचा एवढा अट्टाहास कुणी करत नाही. सगळा भर आजकाल तुलनेवर. तिचे महत्त्व लक्षात ठेवूनही इतिहासाचे प्रेम असणाऱ्या माझ्यातल्या जिज्ञासूने हे गूढ गेली ३० वर्षे सगळे समजून घेतले आहे.

या विवेचनातील ऐतिहासिकतेचा प्रारंभबिंदू हा अर्थातच अपभ्रंशोत्तरकालीन साहित्यरचना व सांस्कृतिक घडामोडी हा आहे. हा काळ कुणी आठवे शतक समजोत वा दहावे शतक. पण इस्लाम धर्म व राज्यकर्ते यांच्या तीव्र आक्रमणानंतर एतद्देशीय मंडळींनी धर्म व संस्कृती रक्षणासाठी बोलभाषेतून, लोकभाषेतून व्यवहार आरंभिला. त्यासाठी अपभ्रंशाचा आधार घेतला. मुख्य म्हणजे आरंभी साधू-बैराग्यांनी हिंडताना बैरागी भाषा निर्माण केली. त्यातून गीते रचली. तिला सर्वांनी सधुक्कडी हे नाव दिले. त्याचाच चांगला उपयोग केला नाथसंप्रदायी मंडळींनी. त्यांनी भावात्मकदृष्ट्या पुरा भारत घुसळून काढला. त्यांच्या आर्ततेने जनसामान्यांचे मन आकृष्ट झाले. नाथसंप्रदायाचे कार्यक्षेत्र पूर्ण भारत देश असला तरी भारताच्या कटिस्थानी असलेली महाराष्ट्रभूमी हे त्याचे खरे कार्यक्षेत्र ठरले. नाथसंप्रदायाने अद्वैत वेदान्ताबरोबर सदाचरणावर व नैतिकतेवर भर दिला. जनजागरणाचे आंदोलन उभे केले. गोरखनाथ हे त्या चळवळीचे एक अध्वर्यू. त्यांच्या रचनेतून व त्यांच्या मागेपुढे झालेल्या इतर कवींनी आरंभी सधुक्कडी व नंतर संधाभाषा म्हणून ज्या भाषेचा वापर केला ती भाषा नंतर येणाऱ्या मराठी भाषेचा एक महत्त्वाचा स्रोत ठरली. पुढे तीच भाषा सुफी साधुसंतांनी पश्चिम



भारतात, मध्यभारतात व दक्षिण भारतात धर्मकार्यार्थ उपयोजिली. उत्तर भारतात सत्तांतर झाले होते. पण दक्षिण भारतात ही राजकीय प्रक्रिया घडायला १३२७ हा इ.स. उजाडायला लागला. मधल्या तीनचार शतकांच्या काळात इस्लामी धर्मानुयायी सुफी संतांनी जनमानसात शिरण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञान, परंपरा, पुराणे, संकेत, काव्यप्रतिमा यांचा पूर्ण उपयोग केला. हे कार्य करण्यासाठी त्यांनी सधुक्कडी, संधाभाषा व नंतर जी भाषा वापरली तिलाच 'दखनी' हे नामाभिधान प्राप्त झाले. हा डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांचा सिद्धान्त आहे. केवळ धर्मावर व संस्कृतीवर होणारा हल्ला व त्याचा प्रतिकार इतके हे सोपे समीकरण नव्हते. महाराष्ट्रापुरते सांगायचे म्हणजे महानुभाव पंथाच्या रूपाने द्वैतमत प्रसाराची एक चळवळ येथे चालू होती. नाथपंथीयांना महानुभावांच्या प्रतिवादाला उत्तर द्यायला हवे होते व सुफी संतांच्या आक्रमकतेला आळा घालायचा होता. गोरखनाथ व नंतर १३व्या शतकात नाथसंप्रदायाची ध्वजा अभिमानाने मिरविणाऱ्या ज्ञानदेवांनी महाराष्ट्रात वारकरी पंथाच्या रूपाने व पश्चिम भारत, राजस्थान, पंजाब व थेट कबीराच्या कर्मभूमीपर्यंत नामेदवांनी हे कार्य केले. तत्त्वज्ञान, आचारधर्म, भाषिक सुलभता, सौंदर्य आणि प्रतिभासामर्थ्याने संतांनी लोकमानसाशी तादात्म्य साधले. एका हाती मराठी व त्याच्या जोडीला दुसऱ्या हाती दखनी अशी टाळांची विभागणी होती. तिला मृदंगाची जोड मिळाली हे अहोभाग्य! महानुभाव पंथाचा तोपर्यंत जो प्रश्न होता, तो अधिक अवघड होता. दामोदर पंडितांनी ६४ चौपद्या लिहिल्या. विद्वान त्यांतील काहींना हिंदी रचना म्हणतात. डॉ. कुलकर्णी यांच्या मते त्या दखनी आहेत. आपल्या ग्रंथात डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी दामोदर पंडित व त्यापूर्वीचे कवी आणि समकालीन कवी नामदेव यांच्या हिंदी, दखनी काव्याचे भाषाशास्त्रीय विश्लेषण तपशिलाने सादर केले आहे. या निमित्ताने वारंवार उपस्थित होणारा प्रश्न—ज्याला आपण हिंदी साहित्य परंपरा म्हणतो. तिचे स्वरूप काय? ते संभवनीयच नव्हते. कारण मुळात हिंदी साहित्याचा आरंभ हा कबीरापासून म्हणजे पंधराव्या शतकापासून होतो व त्यासाठी त्यांनी उचलली, ती खडी बोली, ही प्रादेशिक भाषा. मग त्यापूर्वीचे दखनी साहित्य हेच हिंदी साहित्य आहे असे हे विद्वान कितीही अट्टाहासाने सांगोत, ते दखनीच होते. दखनी भाषेच्या एकूण प्रकृतिधर्माशी तिचे रक्तामांसाचे नाते होते. खरोखरच तसे होते का? हे पाहायचे तर मध्ययुगीन काळातील मराठी संतांची हिंदी नव्हे, दखनीची रचना तपासली, तर ते स्पष्ट होते. दखनी भाषेचे म्हणून चार शतकांचे जे साहित्य आज उपलब्ध आहे ते खडी बोलीशी नाते सुचविणारे नाही. ते नाते सुचविते मराठीशी. म्हणजे ११ वे शतक (अंदाजे) ते १५ वे शतक जी काही रचना मराठी व मराठीतर मंडळींनी केली, ती नामदेवांच्या पावलावर पाऊल टाकून. दक्षिणेत नामदेव दक्षिणेतील म्हणून ती दखनी. दक्षिणेत मुस्लिम राजवटी होत्या म्हणून त्यांच्या अट्टाहासाने ती पुष्ट झाली, असा समज भ्रामक व भ्रांतमूलक ठरतो.

**मराठी साहित्यातील प्रवाहांचा अनुबंध देशातल्या अन्य भाषांशी कुठेतरी जोडला गेलेला आहे. हे अनुबंध ध्यानात न घेता महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन आणि मराठी साहित्यातील प्रवाह यांच्यासंबंधी काढलेले निष्कर्ष एकांगी ठरण्याचा दाट संभव असतो. उलट, व्यापक, राष्ट्रीय भूमिकेतून महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन आणि मराठी साहित्य यांचे परीक्षण झाल्यास एक वेगळे चित्र दिसू लागते. अनुत्तरित राहिलेले कितीतरी प्रश्न या भूमिकेतून सुटतात. इतकेच नव्हे तर आपल्या सांस्कृतिक जीवनाचे व साहित्याचे निराळेच स्वरूप या भूमिकेतून प्रत्ययास येते. प्राचीन इतिहास लक्षात घेता असे आढळते की महाराष्ट्रातील वैचारिक व सामाजिक आंदोलने आणि साहित्य-निर्मिती यांना निरंतर राष्ट्रीय संदर्भ लाभलेला आहे. महाराष्ट्रात झालेला दखनी भाषेचा उद्‌भव देखील या व्यापक संदर्भाचाच एक आविष्कार आहे. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचे जे प्रकृतिधर्म या निमित्ताने अभिव्यक्त झाले ते लक्षात घेण्यासाठी महाराष्ट्राच्या चतुःसीमेच्या पलीकडे व मराठी साहित्याच्या क्षेत्रमर्यादा ओलांडून विचार करावा लागेल. समग्र देशातील सांस्कृतिक प्रवाह व अनेक भाषांतील साहित्य यांचा तुलनात्मक अभ्यास केला नसता तर दखनी भाषेच्या उद्‌भवाचा नेमका शोध लागला नसता आणि महाराष्ट्र व मराठी भाषा यांनी या संदर्भात बजावलेल्या थोर राष्ट्रीय कामगिरीचे आकलनही झाले नसते.**

**— श्री. रं. कुळकर्णी**

हे प्रकरण एवढ्यावर संपत नाही, उलट तिथपासून आरंभ होतो. दखनीचा स्वीकार जसा सामान्यांनी केला तसा बहामनी व नंतरच्या आदिलशाही व कुतुबशाही राज्यकर्त्यांनी केला. हे राज्यकर्ते एतद्देशीय नव्हते. त्यांची दरबारी भाषा फारसी. परंपरा व संकेत मध्य आशियातील आणि शब्दसंपत्ती फारसी, तुर्क व अरबी भाषेतील. गोवळकोंड्याला तर ही आयात थेट मछलीपट्टण बंदरातून हैदराबादला होत असे. काळ उलटत चालला तसा या भाषेचा वरचष्मा वाढत चालला. पण मूळचे बेणे चिवट व चिकट असल्यामुळे या लाल व काळ्या मातीतील गंध तिला काही दडपता आला नाही. १४व्या शतकापासून शिवराज्याभिषेकापर्यंत मराठीला जीवनमरणाचा संघर्ष करावा लागला, तसा तो दखनीलाही करावा लागला. या संघर्षात अंतिमत: मराठीबरोबर दखनी विजयी झाली. दखनी भाषेतील ध्वनिव्यवस्था, व्याकरण, शब्दसंपदा, वाक्प्रचार, म्हणी, वाक्यरचना या अंगांनी दखनीने आपले मराठीशी अतूट असणारे नाते टिकविले. दक्षिणेतील दोन शाह्यांनी स्वत:चे वैभव वाढविताना दखनीचे अपार कौतुक केले पण ते करताना त्यांना दखनीचे अंगडेटोपडे स्वीकारावेच लागले. या लेखाच्या आरंभी जे अवतरण दिले आहे त्यात कवी हेच म्हणतो की, जिकडे तिकडे याच भाषेचा जयजयकार. कबीर, मीरेच्या पदांनी सर्व हिंदुस्थानभर सांस्कृतिक सौंदर्य, ऐक्य वाढले पण क्रांती झाली, असे कुणी म्हणणार नाही. ती होण्याचा प्रश्नच नव्हता. आवश्यक ते परिवर्तन मराठीच्या साहचर्याने दखनीने घडविले होते. निरंजनाचा ध्यास तिने पण घेतला होता. प्रश्न ते ओळखण्याचा होता. पंधरावे शतक, सोळावे शतक हा काळ दखनीच्या वैभवाचा काळ होता. दरबारातील प्रतिष्ठित साहित्य व लोकमानसातील बोलीचा जिवंतपणा या भाषेत नांदत होता. मराठी बखरीतही त्याचा प्रत्यय येतो.

पण हे कुठवर? डॉ. कुलकर्णी यांच्या मते औरंगजेबाच्या दक्षिण दिग्विजयापर्यंत (१६८७ पर्यंत). मुळात मोगल हे ह्या मातीशी नाते सांगणारे राज्यकर्ते नव्हते. तसेच त्यांच्यानंतर आलेले आसिफजाही राज्यही त्याच भाषिक व वांशिक कुळातले. त्यामुळेच दखनीची दरबारी प्रतिष्ठा गेली. १५व्या शतकानंतर उत्तर भारतात हिंदी साहित्याच्या रूपाने नवा अवतार झाला. मराठीचे पंडित एकनाथ, दासोपंत, रामदास यांच्या साहित्याच्या रूपाने दखनी कळसाला पोहोचली. शिवाजीच्या राज्यात संदर्भ बदलले, दखनी साहित्याची रचना मंदावली. त्यातून पुढे पुढे आपल्या अपत्यांच्या भरभराटीला आलेल्या संसारात धन्यता मानीत दखनीने स्वत:चे घरकूल आवरले. दखनी भाषेने सहासात शतके युगाच्या एकीकरणाची, ध्रुवीकरणाची गरज भागवली व युगाचे चक्र उलटताच ती मुख्य व्यासपीठावरून बाजूला सरकली. तिच्या या कर्तृत्वाची ऐतिहासिक नोंद घेणारा ग्रंथ म्हणून श्री. रं. कुलकर्णी यांच्या या ग्रंथाकडे पाहायचे.

या बाबी दखनीच्या संदर्भात विचार करताना महत्त्वाच्या असल्या तरी सगळ्यात मूलगामी व मध्यवर्ती प्रश्न म्हणून जो उपस्थित केला जातो तो लिपीचा. दखनी भाषा उर्दू किंवा फारसी लिपीत लिहिली जाते ती ऐतिहासिक उत्क्रांतीच्या अवस्थेत, अठराव्या शतकाच्या अखेरीपासून. जिच्यातील निर्मिती मंदावली ती दखनी पहिली सात शतके देवनागरी आणि फारसी लिपी या दोन्ही लिपींतून लिहिली जात होती. बहामनी राज्य स्थापन होण्यापूर्वी म्हणजे चौदाव्या शतकापूर्वी उत्तर भारतात मुसलमानी राजवट असून फारसी लिपीत स्वतंत्र साहित्यनिर्मिती नाही. अमीर खुसरोची निर्मिती ही संशयास्पद आहे, असे सर्वजण मानतात. बहामनी, आदिलशाही-कुतुबशाहीच्या काळात दखनी भाषा फारसी लिपीत लिहिण्याचे प्रमाण वाढले. याचे एक कारण दखनी भाषेला मिळालेला राजाश्रय. कारणे वा हेतू कोणतेही असोत, राजाश्रय ही बाब फार महत्त्वाची असते. अठराव्या शतकात राजाश्रय संपला व हे वैभव उतरणीला लागले. मग फारसी लिपीतील दखनी ही उर्दूची पूर्वावस्था मानली गेली व देवनागरी लिपीतील साहित्य हे हिंदीच्या खात्यावर जमा झाले. या द्विधा परिस्थितीचे मोठे मूलगामी विश्लेषण डॉ. कुलकर्णी यांच्या ग्रंथात पाहावयास मिळते. मुळात हा प्रश्न दोन अंगांनी तपासायला लागतो. भाषावैज्ञानिक व सांस्कृतिकदृष्ट्या. तो या ग्रंथात पुरेशा समर्थपणाने तपासला गेला आहे. किंबहुना या ग्रंथाचा मूळ गाभा कोणता असेल, तर तो हाच भाग. त्यातून निघणारे निष्कर्ष यापूर्वी कुणी विचारातच घेतले नाहीत तर मांडण्याचा प्रश्न दूरच. साहजिकच खंडणाचाही प्रश्न

नाही. पण खंडण नसले तरी भ्रमनिरसन महत्त्वाचे ठरते. फारसी लिपीतले म्हणजे उर्दू लिपी व उर्दू भाषेचे आद्यरूप म्हणजे दखनी हे तर्कशास्त्र हा त्यातील प्रथम भ्रम. भाषाव्यवहारात व्याकरणाचे त्यातही क्रियावाचक शब्दांचे स्वरूप, वापर कसा आहे? डॉ. कुलकर्णी यांच्या मते ती चौकट मराठीची आहे. कारण फारसी लिपीतील साहित्य निर्माण होण्यापूर्वीच ती समाजात अस्तित्वात होती. मग तुम्ही लिपी कोणतीही वापरली तरी व्याकरणव्यवस्थेला लोकाधार असल्यामुळे ती टाळणे अशक्य होऊन बसते. दुसरी तितकीच महत्त्वाची बाब म्हणजे फारसी लिपीच्या साहित्यात आलेल्या तुर्की, अरबी, फारसी शब्दसंख्येचे काय, ते किती आहेत, या गणितापेक्षा ते अपभ्रष्टच होऊन आले आहेत व त्या त्या ठिकाणी त्यांनी मराठीचे अनुकरण केले, याचे स्पष्टीकरण डॉ. कुलकर्णी यांनी सोदाहरण केले आहे. दखनी उर्दूचे आद्यरूप आहे असे म्हणणाऱ्या विद्वानांना सांगता येते ते एवढेच की, दखनीत आलेल्या शब्दांचा तोंडावळा उर्दूचाच भासतो. भावात्मक साहित्य कल्पनांचे उगम फारसी अरबी असले म्हणून प्रश्न संपत नाही. उलटपक्षी सर्व सुफी संतांनी दरबारी काव्यात भारतीय तत्त्वज्ञान व साहित्य संकेत फार मोठ्या प्रमाणात वापरले त्यांचे काय? तेव्हा उसनवारी किती, कोणाची, हा प्रश्न नसून भाषाविज्ञानाच्या दृष्टीने त्या त्या भाषेची चौकट कशी? ती चौकट भारतीय व मराठी आहे हा सिद्धान्त त्यातून निष्पन्न होतो. ही अवस्था दहाव्या शतकापासून क्रम पद्धतीने निश्चित दाखविता येते व ती देवनागरीत आहे. आजच्या हिंदी भाषेचे मूळ स्थान म्हणून ती मानण्यापेक्षा त्या भाषेतून आजची हिंदी पंधराव्या शतकात निर्माण झाली, हा दुसरा सिद्धान्त येतो. भाषा परिवर्तनाची, विकसनाची, उत्क्रांतीची स्थिती-गती ही अत्यंत गुंतागुंतीची असते. साधने काही अंशी अपुरी आहेत आणि बरीच साधने परस्परविरोधी वाटण्याचा संभव. अशा अवघड परिस्थितीतून तर्कसंगत एकच काय पण अनेक सिद्धान्त निघतात व त्यातून दखनीसंबंधीचे प्रमुख प्रतिपाद्य हे बरेच गहिरे व आव्हानात्मक बनते.

*सगळ्याच सिद्धान्तांची चर्चा या छोट्या लेखात करणे शक्य नाही व ते आवश्यकही नाही.* पण शेवटी दखनीच्या संदर्भात आजच्या विद्यमान भारताला व महाराष्ट्राला विचार करायला भाग पाडील असा एक सिद्धान्त या ग्रंथात आहे. तो ग्रंथारंभी प्रयोजनात आहे व समारोपात आहे. तो म्हणजे महाराष्ट्राने राष्ट्रभाषा हिंदीला दिलेला आधार. ती सेवा मराठीने तेराव्या शतकात तशीच अठराव्या शतकातही केली. संतांनी व ग्रंथकारांनी ज्या रचना केल्या, त्या केवळ हौस म्हणून नाही तर उदात्त सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य म्हणून. त्यांनी मराठीत व दखनीत लेखन केले. ते नामदेवांनी केले तसेच सगनभाऊ, प्रभाकरने केले. ते केले नसते तर एक प्रगल्भ भाषा म्हणून हिंदीचा विकास होऊच शकला नसता. नामदेवाचे माहात्म्य कबीर, दादू दयाळ, गुरुनानक यांनी मानले तर खाली दक्षिणेत शाहनुराब याने अठराव्या शतकात मानले. त्यामागे भाषिक व सांस्कृतिक ऐक्याची, समन्वयाची व समाजसंवर्धनाची दृष्टी होती व लोकोद्धाराची प्रेरणा होती. हे ऐतिहासिक सत्य अठराव्या शतकात पूर्ण होते व दखनी भाषा ही भाषिक जगतातून, निर्मिती व्यवहारातून अंतर्धान पावते. पण ती बोलीच्या रूपाने पुढे दोनशे वर्ष टिकते. आजही ती आहे. कालमानाप्रमाणे आघात-प्रत्याघात हे भोग कोणाच्या नशिबाचे चुकले आहेत? पण या भाषेच्या आरंभकालीन निर्मितीने, वैभवाने, किंबहुना असण्यानेही भारताचे भावनात्मक ऐक्यच नव्हे तर जीवन घडविले. तिचा धांडोळा निदान सहृदय व जिज्ञासूवृत्तीने, निर्मळ अंत:करणाने आपण घेणे उचित नव्हे काय? डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांच्या ग्रंथाचे प्रयोजन हेच आहे.

. . . . . . . . . . . **प्रा. द. पं. जोशी**






वामन मल्हार जोशी हे मराठीतील थोर लेखक, प्राध्यापक व तत्त्वचिंतक होत. वामन मल्हारांची परंपरा ही सत्य, शिव व सौंदर्य या संकल्पनांच्या स्वच्छ, काटेकोर जाणिवांची व प्रसंगाप्रसंगांनी त्यांचा सविकल्प व निर्विकल्प समन्वय साधू पाहणाऱ्या विचारशीलाची परंपरा आहे. ती विवेकशील जीवनवादाचा कलावाङ्मयात पुरस्कार करणारी आहे. वाङ्मयाची निर्मिती, आस्वाद, आकलन, मूल्यमापन, अध्ययन व अध्यापन, संशोधन-संपादन या सर्व बाबतीत व्रतस्थ व्यासंगीपणा राखण्याचा आग्रह धरणारी ही वामन मल्हारी परंपरा आहे. समकालीन वाङ्मयीन, सांस्कृतिक पर्यावरणात सजगतेने गुंतवून घेणारी ती एक जबाबदार परंपरा आहे. या परंपरेचे आधुनिक मराठी साहित्यातील व मराठीच्या उच्चस्तरीय अध्ययन-अध्यापनातील योगदान किती मोठे आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. गरज आहे, ती हे सांगण्याची की विद्यमान कालखंडात विशेषत: अध्ययन-अध्यापनाच्या उच्च स्तरावर ही परंपरा क्षीण होत चालली आहे व म्हणून तिच्याकडे लक्ष देणे अगत्याचे आहे. या

# ताराबाई शिंदे लिखित

# स्त्री पुरुष तुलना

● संपादक : विलास खोले



परंपरेचे वारसदार असलेल्या डॉ. विलास खोले यांचे संपादनकार्य हे साहित्याभ्यास व साहित्यसंशोधन यांची उच्च मूल्ये जपणारे व पुढे नेणारे कार्य आहे. श्रेष्ठ दर्जाची ही अकादमिक गुणवत्ता आहे. 'गुणि गुणं वेत्ति' या वचनाप्रमाणे या क्षेत्रातील गुणवानांना व गुणवान होऊ पाहणाऱ्या अभ्यासकांना खोले यांच्या कार्याचे मोल खूप मोठे वाटेल, यात शंका नाही.

'शोकांतिकेची संकल्पना आणि काही मराठी शोकांतिका' या विषयावर प्रबंध लिहून डॉ. खोले यांनी पीएच.डी. ही पदवी संपादन केली. पुढे बारा वर्षांनी 'शोकांतिकेचा उदय' (१९९२) हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. 'बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ' (१९९६) व 'संत नामदेव आणि सांस्कृतिक प्रबोधन'(१९८८) ही त्यांची आणखी दोन स्वतंत्र पुस्तके. या तीन स्वतंत्र ग्रंथांखेरीज त्यांनी तेरा संशोधित-संपादित पुस्तके सिद्ध केली. त्यांपैकी 'आज्ञापत्र' (१९८८),'भक्तिगंगेच्या वाटेवर'' (१९८८), 'वा. म. जोशी : जीवनदृष्टी आणि साहित्यविचार'(१९८३), 'अध्यात्म आणि विज्ञान' (१९८४), 'सूर्यबिंबाचा शोध' (१९८४), 'चौकट' (१९९१) आणि पुरस्कारप्राप्त 'स्त्री-पुरुष तुलना' (१९९७) ही विशेष उल्लेखनीय आहेत. यांखेरीज दिवाकर कृष्ण, शांताराम व राजेंद्र बनहट्टी (दीर्घ कथा) यांच्या निवडक कथांचे साक्षेपी संपादन व समीक्षणही त्यांनी स्वतंत्र पुस्तकरूपांनी प्रसिद्ध केले आहे. प्राचीन-अर्वाचीन साहित्यकृती, साहित्यिक, साहित्यबाह्य सांस्कृतिक संदर्भ असे विविध विषय त्यांनी संशोधन-संपादनांतून हाताळलेले आहेत. खोले यांच्या संशोधन-संपादनाचा परिघ विस्तृत व विविधतापूर्ण आहे. शास्त्रशुद्ध काटेकोर संशोधन, सर्वांगांना स्पर्श करणारे पद्धतशीर संपादन व या दोहोंना दिलेली चिकित्सक विश्लेषणाची जोड हे प्रा. विलास खोले यांच्या सर्व संपादित पुस्तकांचे वैशिष्ट्य आहे.

ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना'चे प्रा. खोले यांचे संपादन या पूर्वपरंपरेला शोभेल असेच आहे. या पुस्तकाचे ऐतिहासिक महत्त्व व सद्यःकालीन प्रस्तुतता अभ्यासकांच्या लक्षात येण्यास खूपच उशीर झाला. १९७५ साली डॉ. स. गं. मालशे यांनी सर्वप्रथम या पुस्तकाची संशोधित-संपादित आवृत्ती प्रसिद्ध केली. आणि या पुस्तकाकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले. डॉ. मालशे यांनी प्रसिद्ध केलेल्या संहितेच्या आधारे या पुस्तकाची आणखी दोन संपादने झाली. एक नागनाथ कोतापल्ले यांचे (१९९०) व दुसरे रघुवंशी यांचे. डॉ. मालशे यांनी आपल्या संपादनाची दुसरी आवृत्ती १९९० मध्ये प्रसिद्ध केली आणि त्यानंतर डॉ. विलास खोले यांनी १९९७ मध्ये प्रस्तुत आवृत्ती प्रसिद्ध केली.

**पुरुषांच्या दुर्गुणांची ताराबाई शिंदेकृत मीमांसा कितपत यथार्थ आहे असा एक प्रश्न उपस्थित होतो. येथे हे लक्षात घ्यावयास हवे की, ताराबाईंनी सर्वेक्षण करून, आकडेवारी काढून शास्त्रीय पद्धतीने संशोधनपूर्वक दुर्गुणांची चर्चा केलेली नाही. एक स्त्री म्हणून जगत असताना आणि आपल्यासारख्याच अनेक स्त्रियांचे जगणे पाहात असताना त्यांना जे जे काही जाणवले आणि जे त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला आले, त्या सर्वांची गोळाबेरीज त्यांनी येथे मांडली आहे. आपली एकंदर जीवनव्यवस्था पुरुषवर्चस्व स्वीकारणारी, कुटुंबसंस्था पुरुषप्रधान, सामाजिक आचारविचारांचे नियमन करणारी शास्त्रे व धर्म पुरुषरचित, सारा अर्थव्यवहार पुरुषाच्या हातात, न्यायसंस्था पुरुषप्रधान आणि राज्यसंस्था स्त्रीप्रश्नांबाबत उदासीन, तत्कालीन संपर्कमाध्यमे व शिक्षणव्यवस्था पुरुषांच्या स्वाधीन! अशा परिस्थितीत एका खानदान मराठा घराण्यातील विलक्षण संवेदनशील स्वभावाची, तीक्ष्ण बुद्धीची 'बंदिवाना'चे आयुष्य जगणारी स्त्री जेव्हा स्त्रीपुरुषसंबंधांचा विचार करू लागते तेव्हा तिच्या अंतःकरणात माजलेली सारी खळबळ परखड शब्दांत बाहेर पडू लागते. विजयालक्ष्मी या विधवेवर ओढवलेल्या दारुण प्रसंगातून जे काहूर माजले त्यामुळे ताराबाई शिंदे यांना सात्त्विक संताप आला व तो भावोद्रेक प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने अभिव्यक्त झाला. लेखिका भावोद्रेकातून लिहिते आहे, हे एकदा लक्षात घेतले की उद्रेकप्रसंगी संयत शब्दांची अपेक्षाच मुळी चूक आहे, हे समजू शकेल. 'अरेला कारेने उत्तर' अशा स्वरूपाचे हे लेखन आहे. 'कारेने उत्तर' देणेही महत्त्वाचे आहे. कारण ती काळाची गरज आहे. त्या काळात असे धाडस दुर्मिळ होते म्हणूनच ताराबाईंचे कौतुक. कोणत्याही उद्रेकात आवेग, आवेश व आघातशीलता असते आणि प्रतिपक्षाला ठेचून नेस्तनाबूत करण्याची भूमिका व क्षमता आघातात असावी लागते. त्यासाठी जोरदार घाव घालावा लागतो. तसा तो ताराबाईंनी घातलेला आहे.**

**— विलास खोले**

'स्त्री-पुरुष तुलना'चे डॉ. खोले यांचे संशोधन-संपादन डॉ. मालशे यांनी प्रसिद्ध केलेल्या संहितेच्या आधारे झालेले नाही. त्यांनी त्यासाठी 'स्त्री-पुरुष तुलना'ची मूळ संहिता उपयोगात आणली आहे व हीच संहिता प्रस्तुत पुस्तकात समाविष्ट केली आहे. 'स्त्री-पुरुष तुलना'ची मूळ संहिता आणि डॉ. मालशे यांनी प्रसिद्ध केलेली संहिता यांच्यातील वेगळेपण त्यांनी परिशिष्टात स्पष्ट केले आहे. अशातऱ्हेने मूळ संहिता प्रसिद्ध करीत असतानाच त्याचे पाठसंशोधनही डॉ. खोले यांनी केलेले दिसते.

'स्त्री-पुरुष तुलना'मधील ताराबाई शिंदे यांची मांडणी फार क्रांतिकारक आहे. वास्तवता व द्रष्टेपणा यांचा विलक्षण प्रभावी मेळ घालणारे असे ते अपूर्व विश्लेषण आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या वाढत्या जाणिवांना व मूल्यांना विद्यमान कालखंडात व्यापक प्रतिसाद मिळत आहे हे खरे, पण या मन्वन्तराची रोखठोक मागणी करणारी तुतारी ताराबाई शिंदे या प्रज्ञावंत स्त्रीने शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच प्राणपणाने फुंकली होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. या दृष्टीने पाहता 'स्त्री-पुरुष तुलना' संशोधित स्वरूपात उपलब्ध होणे मोठ्या गरजेचे होते. तसेच या लेखनाची तत्कालीन सामाजिक पार्श्वभूमीही स्पष्ट होणे आवश्यक होते. डॉ. खोले यांची विवेचक प्रस्तावना तळटीपा आणि परिशिष्टे यांनी हे कार्य यशस्वीपणे केलेले दिसते.

डॉ. खोले यांची अभ्यासपूर्ण, प्रदीर्घ व मार्मिक प्रस्तावना हे या पुस्तकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. एखाद्या मौलिक प्रबंधाचे चिकित्सक आकलन कसे करावे, याचा एक वस्तुपाठच या प्रस्तावनेच्या रूपाने साकारला आहे. ज्या स्त्री-पुरुष संबंधांच्या वास्तविक पार्श्वभूमीवर ताराबाईंनी आपले उत्कट चिंतन व्यक्त केले आहे ती गेल्या शतकातील वास्तव परिस्थिती खोले यांनी साधार स्पष्ट केली आहे. व तिचा ताराबाईंच्या प्रतिपादनाशी असलेला संबंधही उलगडून दाखवला आहे. तसेच मराठीतील स्त्रियांच्या लेखनाची प्राचीन परंपरा थोडक्यात सांगून ताराबाईंच्यापूर्वी लेखन करणाऱ्या मिसेस फरार, जोतीराव फुले यांची मांग विद्यार्थिनी मुक्ताबाई आणि पंडिता रमाबाई यांच्या लेखनाचा परिचय करून दिला आहे. ताराबाईंच्या लेखनाचे स्वरूप, त्याचे महत्त्व आणि त्यातील उणीवाही खोले यांनी प्रस्तावनेत सुस्पष्टपणे मांडल्या आहेत. क्रांतिकारक विचारांची मुळे एका बाजूने त्या त्या काळातील समाजाच्या अंतःस्तरात रुजलेली असतात, त्यांची स्पंदने बाह्य वास्तवात जाणवत असतात पण हे सर्व यथार्थतेने व

**ताराबाई शिंदे-लिखित 'स्त्रीपुरुषतुलना' हे पुस्तक हा स्त्रीपुरुषसत्तासंबंधातील असमतोलाचे विवरण करणारा एकोणिसाव्या शतकातील महत्त्वाचा सामाजिक दस्तऐवज आहे. स्त्रियांच्या परवशतेची इतकी प्रभावी, आवाहक व चित्रदर्शी मांडणी मराठी वाङ्मयात अन्यत्र क्वचितच आढळेल. समस्त स्त्रीजातीचे दुःख दूर व्हावे आणि स्त्रियांना समाजात सन्मानाचे, प्रतिष्ठेचे व पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त व्हावे या आकांक्षने ताराबाईंनी आपले लेखन केले आहे. तर्कशुद्ध प्रतिपादन, प्रक्षोभक मतप्रदर्शन, विवेकनिष्ठ युक्तिवादकौशल्य आणि उपहास-उपरोधप्रचुर भाषाशैली या वैशिष्ट्यांनी संपन्न अशी स्त्रियांच्या दुःस्थितीची मीमांसा म्हणजे ताराबाई शिंदे यांचे 'स्त्रीपुरुषतुलना'.**

**या पुस्तकाची यथामूल आवृत्ती प्रो. विलास खोले यांनी सखोल संशोधन करून साक्षेपाने संपादन केली आहे. त्यामुळे ताराबाई शिंदे यांचे पुस्तक इ.स. १८८२ नंतर मुळाबरहुकूम पहिल्यांदाच उपलब्ध होत आहे. त्यांच्या अभ्यासपूर्ण, दीर्घ प्रस्तावनेमुळे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील स्त्रियांच्या परिस्थितीवर चांगला प्रकाश पडतो आणि नेमकेपणाने दिलेल्या टिपांमुळे संहितेचे आकलन वाढते. ताराबाईंच्या लेखनास निमित्त झालेल्या विजयालक्ष्मी खटल्यासंबंधीचे सन १८८१ मधील सर्व महत्त्वाचे कागदपत्र जसे प्रो. खोले यांच्यामुळे अभ्यासकांना येथे पाहावयास मिळतात, तसेच महात्मा जोतीराव फुले यांच्या मुक्ताबाई या चौदा वर्षांच्या विद्यार्थीनीने लिहिलेला मराठीतील पहिला दलित निबंधही यथामूल स्वरूपात या पुस्तकात प्रथमच वाचावयास मिळतो. प्रो. विलास खोले यांच्या प्रयत्नांमुळे एकंदर मराठी वाचकांना आणि विशेषतः स्त्रीसाहित्याच्या अभ्यासकांना एक बहुमोल पुस्तक हाती आल्याचा आनंद होईल.**

**— प्रो. जे. व्ही. नाईक**

संवेदनशीलतेने टिपणारी साक्षात्कारी माणसेही हवी असतात. खोले यांनी आपल्या विस्तृत प्रस्तावनेतून या अंगानेही उद्‌बोधक परामर्श घेतल्याचे दिसून येईल.

फक्त ताराबाई शिंदे ही द्रष्टी व्यक्ती मात्र नीटशी दिसत नाही. तिने पाहिलेले स्त्री-पुरुष नात्याचे वास्तव दृश्य दिसते. अगदी आत बाहेरून दिसते. तिची दार्शनिक कळाही जाणवते. पण ती कोण होती, कशी होती, कशी वाढली, कशी घडली हे निर्णायकपणे सांगता येत नाही. या संदर्भात प्रस्तावनेतील 'जोतीराव फुले व ताराबाई शिंदे', 'ताराबाईंचे व्यक्तिमत्त्व', 'प्रतिसादाचा अभाव', 'पंडिता रमाबाई व ताराबाई शिंदे' हे मुद्दे महत्त्वाचे आहेत. पण तरीही खोले यांच्या वारसदारांना पुढे जाण्यासाठी एवढी एक वाट खुली राहिलेली आहे, असे म्हणता येईल.

टीपा आणि परिशिष्टे ही खोल्यांच्या सर्जनशील संशोधन-संपादनाची स्पष्ट अशी स्पृहणीय गमके आहेत. सत्यता व सुस्पष्टता साधण्यास अभ्यासपूर्ण टीपांची गरज असते. ते काम खोले यांनी चांगल्या प्रकारे केले आहे. परिशिष्टे म्हणजे संहितेच्या अर्थाचा व अर्थपूर्णतेचा परिघ व्यापक करण्याची साधने. आठ परिशिष्टे देऊन खोले यांनी ताराबाईंच्या प्रतिपादनाचा एक व्यापक संदर्भव्यूह उभा केला आहे. विशेषत: ताराबाईंच्या लेखनास प्रेरक ठरलेला 'विजयालक्ष्मी खटल्याचा निकाल', 'टाइम्स ऑफ इंडियामधील बातमी व अग्रलेख', सार्वजनिक सभेचे पत्र' ही परिशिष्टे मोठी उद्‌बोधक व सूचक आहेत. 'मांगमहारांच्या दु:खाविषयी निबंध' हाही मूळ स्वरूपात प्रथमच इथे उपलब्ध करून दिलेला आहे. खोले यांची परिशिष्टे नुसती माहितीपर नाहीत तर मार्मिक आहेत, हे सुजाण वाचकाच्या ध्यानात येईल.

एकंदरीत एक बहुसंदर्भसंपन्न, नेटके, वस्तुनिष्ठ असे संशोधन-संपादन-शिल्प असेच या पुस्तकाचे वर्णन करावे लागेल. विलास खोले यांची शैलीदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. काटेकोर विधाने हे या शैलीचे वेधक लक्षण होय. शब्दांचा मितव्यय तसेच भावना, कल्पना, उत्स्फूर्त आविष्कार, अत्युक्ती व अलंकारिकता इत्यादींपासून अबाधित राखलेले प्रतिपादन येथे आढळते. संशोधक-संपादकाला कटाक्षाने शैलीकरणाचा संमोह टाळावा लागतो. क्वचित रुक्ष वाटली तरी खोले यांची शैली ओघवतेपणाने वाचकाला गुंतवून मात्र ठेवते.

खोले यांच्या प्रस्तावनेतील पृष्ठे २५ ते ५८ हा भाग पुन:पुन्हा वाचावा, इतका सरस आणि सार्थ उतरलेला आहे. त्यात विचार स्पष्टपणे आणि रेखीवपणे मांडण्याची त्यांची हातोटी प्रकर्षाने दिसते. खुद्द ताराबाईंचे विचार तर्कनिष्ठ असले तरी त्यांची मांडणी रेखीव नाही. ताराबाईंची शैली ही प्रभावी वक्तृत्वासारखी आहे. ताराबाईंच्या निबंधातील अनेक परिच्छेद 'अरे' या संबोधनानेच सुरू होतात. त्यांच्या भाषेचे सामर्थ्य आणि सौंदर्यही वक्तृत्वाचेच होते. ताराबाईंच्या निबंधात येणाऱ्या विषयांची उकल करणे म्हणूनच एक कौशल्याचे काम होते. 'स्त्री : विवाहित आणि विधवा', 'विवाहाच्या चार तऱ्हा', 'पुरुषांच्या दुर्गुणांची मीमांसा' आणि 'साहित्यकृतीतील स्त्री चित्रणावरील भाष्य' अशी अर्थवाही शीर्षके देऊन खोले यांनी ताराबाईंच्या विचारांची जी फोड करून दाखवली आहे, तिला अभ्यासक आणि सर्वसाधारण वाचक या दोघांचीही दाद निश्चितच मिळाली पाहिजे. या पुस्तकाचा हा गाभा असलेला भाग संशोधन-संपादनापलीकडे जाऊन मार्मिक विश्लेषणाची पातळी कशी गाठतो, हे पुस्तक वाचूनच अनुभवले पाहिजे.

विलास खोले यांच्या या पुस्तकाचे महत्त्व मुंबई विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक प्रा. आर. श्रीनिवासन, यांनी आपल्या पुरस्कारात स्पष्ट केले आहे. त्यांचे इंग्रजी विवेचन या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेच. शिवाय मुंबई विद्यापीठाचे इतिहासाचे निवृत्त प्राध्यापक व थोर अभ्यासक जे. व्ही. नाईक यांनी या पुस्तकाची पाठराखण फार मोजक्या पण मार्मिक शब्दांत केलेली आहे.

''प्रा. विलास खोले यांच्या प्रयत्नांमुळे एकंदर मराठी वाचकांना आणि विशेषत: स्त्रीसाहित्याच्या अभ्यासकांना एक बहुमोल पुस्तक हाती आल्याचा आनंद होईल'' असे प्रा. नाईक यांनी म्हटले आहे. प्रा. विलास खोले यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून मी थांबतो.

**. . . . . . . . . . प्रा. रा. ग. जाधव**




स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय राजकारणामध्ये काश्मीर प्रश्न सातत्याने धगधगता राहिला आहे. स्वातंत्र्य नुकतंच मिळालेलं होतं. शेकडो संस्थानं भारतीय संघराज्यामध्ये विलीन झालेली होती. मात्र काश्मीरचे राजे हरीसिंह यांना स्वतंत्र राजकीय अस्तित्व पाहिजे होतं म्हणून त्यांची टाळाटाळ चालली होती. काश्मीरमध्ये मुस्लिम बहुसंख्य असल्यामुळे पाकिस्तानला काश्मीरचा

● ना. य. डोळे

ताबा हवा होता. २२ ऑक्टोबर १९४७ ला पाकिस्तानने काश्मीरवर प्रत्यक्ष आक्रमण केलं. तेव्हापासून भारतीय





उपखंडामध्ये काश्मीर प्रश्न हा ज्वलंत राजकीय मुद्दा झाला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजवादी विचारवंत डॉ.ना.य. डोळे यांनी 'काश्मीर प्रश्न' या ग्रंथात काश्मीरच्या ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय पैलूंचा चिकित्सक आढावा घेतला आहे. काश्मीरच्या समकालीन प्रखर राजकीय वास्तवाची नोंद आतंरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भामध्ये डॉ डोळे यांनी जाणीवपूर्वक घेतली आहे.

काश्मीरच्या स्वायत्ततेचा प्रश्न हा काश्मीरच्या इतिहास आणि भूगोलाशी निगडीत आहे असे डॉ. डोळे यांचे मत आहे. काश्मीरमध्ये हिंदु, बौद्ध, मुस्लिम, शीख,ख्रिश्चन लोक अनेक वर्ष गुण्यागोविंदाने राहत होते. काश्मीरवर परकीयांच्या अनेक स्वाऱ्या, आक्रमणे झाली आहेत. मुसलमान पूर्वीचे हिंदूच होते. एकदा मुसलमान बनलेल्या लोकांना त्यांनी मागणी करूनही त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्यात आले नाही हे सांगताना डॉ. डोळे आजही अनेक काश्मिरी मुसलमान आणि हिदुंमध्ये ऋषी, गुरु ही आडनावे प्रचलित असल्याचा दाखला देतात. कित्येक मुसलमान पंडित, भट, धर ही आडनावे लावतात. काश्मीरवर हिंदु, मुस्लिम, आणि शीख राजांनी भलेबुरे राज्य केले असले तरी तेथे सर्वसामान्य हिंदु-मुस्लिम जनमानसात परस्परांविषयी सहिष्णुता आहे. काश्मीरमधील सहिष्णू आध्यात्मिक परंपरा घडवली ती शेख नुरुद्दीन किंवा नंदऋषी आणि लाल देबसारख्या, संतसाध्वीसारख्या सुफी संतांनी. काश्मीरी जनतेची सांस्कृतिक अस्मिता काश्मीरीयत म्हणजे शैवमत आणि इस्लामी सुफी तत्त्वज्ञान याचा सुरेख संगम होय. जम्मू-काश्मीरचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. तेथे हिंदु-मुस्लिम, शीख, ख्रिश्चन आणि बौद्ध यांची पवित्रस्थाने एकमेकांच्या अगदी जवळ असूनही कोणताच धार्मिक तणाव-संघर्ष निर्माण होत नाही. अमरनाथच्या यात्रेवरच्या अतिरेक्यांच्या धमक्यांना काश्मीरी सामान्य मुस्लिम दुजोरा देत नाहीत हे डॉ. डोळे यांचे निरीक्षण आहे. इतकेच नव्हे तर काश्मीरमध्ये एका धर्माचे जे पवित्र स्थान तेच दुसऱ्या नावाने दुसऱ्या धर्माचे पवित्र स्थान बनले आहे. श्रीनगरमधील शंकराचार्य टेकडीवरील शिवालय हिंदुंना पवित्र वाटते. मुसलमानांसाठी हेच स्थान 'तख्ते सुलेमान' आहे तर बौद्ध त्यालाच 'पास पहाट' म्हणून पूज्य मानतात. डॉ. डोळे यांचा आग्रह आहे की, लोककथा, लोककाव्ये, दंतकथा यातून निर्माण होणारा सहिष्णुतेचा इतिहास समजून घेतला तर काश्मीर प्रश्नाचे नीट आकलन होऊ शकेल.

काश्मीरमधील पर्वतराजींनी परकीय आक्रमकांना आकर्षित केले तसेच हे आक्रमण थोपवण्यासही त्यांची मदत झाली. काश्मीरचे निसर्गसौंदर्य अनोखे पण हे राज्य आर्थिकदृष्ट्या खूप मागासलेले आहे. विकास नाही, रोजगार नाही, शेतीयोग्य जमीन कमी, सार्वजनिक क्षेत्रातला मोठा व्यवसाय नाही, वाहतुक व्यवस्था अकार्यक्षम, विद्युतपुरवठा अपुरा या साऱ्या गोष्टींमुळे काश्मीरमध्ये अस्वस्थता आहे. केंद्रसरकारचे आर्थिक अनुदान सर्वसामान्य माणसाच्या विकासासाठी वापरले जात नाही. काश्मीरमधील नोकऱ्यांमध्ये बाहेरील लोकांचा भरणा अधिक मग काश्मीरी युवकांमध्ये असंतोष खदखदला तर ते नवल कुठले? काश्मीरमध्ये पर्यटकाच्या भूमिकेतून न जाता देशबांधवाच्या भूमिकेतून गेले की हे जाणवते असे डॉ. डोळे सुचवतात. लोकांच्या मनातला असंतोष, सरकारच्या दमनशक्तीचा पाशवी वापर आणि पाकिस्तानची फूस अशा तिहेरी कारणांमधून काश्मीर प्रश्न तीव्र होतो.

काश्मीर प्रश्नाचे मूळ काश्मीरची स्वतंत्र घटना, स्वतंत्र ध्वज आणि काश्मीरला स्वायत्तता प्रदान करणारे भारतीय राज्यघटनेतील ३७०वे कलम हे मानले जाते. डॉ. ना. य. डोळे यांनी स्वतंत्र संस्थान ते घटक राज्य हा काश्मीरचा राजकीय प्रवास सांगताना ब्रिटीश साम्राज्यवाद्यांची विशेषत: माऊंटबॅटनची भूमिका, शेख अब्दुल्ला यांचे काश्मीरमधील नेतृत्व, पं. जवाहरलाल नेहरू यांचे मत तसेच आताच्या संघपरिवाराची प्रारंभापासूनची राजनीती यांचा तपशीलाने परामर्श घेतला आहे. 'काश्मीर भारतात असणे हे भारताच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे प्रतीक आहे' हे विचारसूत्र त्यांनी ठामपणाने प्रतिपादले आहे. काश्मीरमध्ये डॉ. ना.य. डोळे तीनदा गेले. केवळ सैनिक मुलकी अधिकारीच नव्हे तर सर्वसामान्य हिंदु, मुस्लिम, काश्मिरी युवक, अतिरेकी यांच्याशी प्रत्यक्ष संवाद केला. काश्मीर प्रश्नाला आता आंतरराष्ट्रीय दहशतवादाने घेरले असल्यामुळे तो मुद्दा धर्मयुद्धाचा (जिहादचा) झाला आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यापैकी कोणत्याच राष्ट्रात सामील न होता काश्मीर संस्थान स्वतंत्र रहावे हा पर्याय काश्मीरचा राजा हरीसिंह यांच्या मनात होता. शेख अब्दुल्ला आणि त्यांचा पक्ष नॅशनल कॉन्फरन्स यांच्या राजकीय भूमिकेमुळे काश्मीरचे संस्थान भारतात सामील झाले याचे आश्चर्य वाटेल. भारत-पाकिस्तानच्या फाळणीचा आधार धर्म होता आणि काश्मीर मुस्लिम बहुसंख्यांक संस्थान असल्यामुळे ते पाकिस्तानमध्ये जाणे स्वाभाविक होते. काश्मीरने पाकिस्तानमध्ये जावे ही भारतातील शेवटचा ब्रिटिश व्हाईसरॉय . लॉर्ड माऊंटबॅटन यांचीही इच्छा होती. मुस्लिम बहुसंख्या आणि भौगोलिक सलगता या दोन आधारावर माऊंटबॅटन यांनी राजाला पाकिस्तानात सामील होण्याचा सल्ला दिला होता. राजा हरीसिंगानी तो अव्हेरला. स्वतंत्र भारत राष्ट्र हे सोवियत युनियनचे मित्र राहील त्यामुळे काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये आपला लष्करी तळ असणे आवश्यक आहे ही ब्रिटिश साम्राज्यवादी राजनीती होती. म्हणून काश्मीर पाकिस्तानमध्ये असणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना आवश्यक वाटत होते. २२ ऑक्टोबर १९४८ ला पाकिस्तानी टोळीवाले काश्मीरमध्ये आक्रमकपणे घुसल्यानंतर राजा हरीसिंहाने काश्मीर संस्थान भारतात सामील करण्याच्या सामिलीकरण करारावर सही केली. डॉ. डोळे यांच्या मते काश्मीर समस्या निर्माण करण्यात सिंहाचा वाटा हरीसिंहाचा आहे. पाकिस्तान आणि भारत यांच्याकडून आपल्याला काय फायदा मिळतो याची चाचपणी करण्यात त्यांनी वेळ दवडला. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी राजाने कोणताही निर्णय घेतला असता तर काश्मीरची परिस्थिती बिकट झाली नसती. सर्व संस्थानिकांनी भारत किंवा पाकिस्तान या दोन देशात विलीन व्हावयाचे अशी तरतूद होती. संस्थान स्वतंत्र राहील अशी तरतूदच नव्हती. भारतातील इतर संस्थात्तिकांनी आपली संस्थाने भारतात विलीन केली. पण काश्मीरच्या विशिष्ट परिस्थितीमुळे स्वतंत्र राहण्याचा पर्याय निर्माण झाला. त्यामुळे काश्मीर भारतात 'विलीन' झाला नाही तर तो 'सामील' झाला असा महत्त्वाचा मुद्दा डॉ. डोळे उपस्थित करतात. काश्मीर प्रश्नाचे वेगळेपण या अर्थपूर्ण घटनेमध्ये आहे. काश्मीर संस्थान मुस्लिम बहुल आणि भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानशी सलगता तेव्हा ते राज्य राजा हिंदू असला तरी पाकिस्तानात जाणार असे कॉंग्रेसचे नेते मानीत होते. 'प्रजा बहुसंख्य हिंदू म्हणून जुनागढ आमचे, हैदराबाद आमचेच असेही धोरण ठेवायचे आणि काश्मीरने भारतात यावे अशी अपेक्षा कशी ठेवता येईल' असा सवाल डॉ. डोळे करतात तेव्हा काश्मीरमध्ये ऐंशी टक्क्याहून जास्त मुसलमान होते हे सामाजिक वास्तव स्पष्ट होते.

शेख अब्दुल्ला आणि नॅशनल कॉन्फरन्स हे भारताच्या बाजूने का राहिले? काश्मीर संस्थान ब्रिटिश भारताचा भाग असताना शेख अब्दुल्ला राजेशाही, संरजामशाही आणि ब्रिटिश साम्राज्यवादाविरोधी स्वातंत्र्यलढा चालवत होते. काश्मीरपुरता किंवा फक्त मुसलमानांचाच मर्यादित विचार करून चालणार नाही हे शेख अब्दुल्लांना गांधी आणि नेहरूंच्या सहवासात आल्यानंतर जाणवले. १९३६ मध्ये मुस्लिम कॉन्फरन्सचे नामांतर नॅशनल कॉन्फरन्स असे झाले. भारतीय स्वातंत्र्याच्या व्यापक ध्येयामध्ये काश्मीरचे स्वातंत्र्य अंतर्भूत आहे हे मान्य करून शेख अब्दुल्लांनी मुस्लिम लीगच्या जातीयवादी आणि विभाजनवादी प्रचाराचा कडवा प्रतिकार केला. त्यामुळेच १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानी घुसखोर आणि सैन्याने काश्मीरवर हल्ला केला तेव्हा नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला हे डॉ. डोळे ठळकपणे लक्षात आणून देतात.

शेख अब्दुल्लांनी भारत आणि पाकिस्तान यांना समान मानले नाही. भारत लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता मानते. भारताने राज्यघटना स्वीकारली आहे.भारतातील सामिलीकरणामुळे काश्मीर पुन्हा सरंजामशाहीच्या जोखडात अडकणार नाही. पाकिस्तानमध्ये संविधानच नाही. ते मुस्लिम राष्ट्र आहे म्हणून आपण पाकिस्तानात गेलो तर इस्लाम धर्माच्या नावाखाली लोकांना फसवून सरंजामशाही राजवट तेथे स्थापन होत आहे त्यामुळे आपल्याला आर्थिक सुधारणा करता येणार नाहीत ही शेख अब्दुल्लांची भूमिका होती. काश्मीरला स्वतंत्र राहण्याचा पर्यायही खुला नाही हे विशद करताना शेख अब्दुल्लांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २२

ऑक्टोबर दरम्यान आपण अलिप्त असूनही आपल्या दुर्बलतेचा फायदा घेवून पाकिस्तानने स्वारी केली हे उदाहरण दिले. आपण स्वतंत्र राहिलो तर पाकिस्तान पुन्हा आक्रमण करील ही भीतीही त्यांनी व्यक्त केली. डॉ. डोळे यांनी काश्मीरच्या भारतातील सामिलीकरणाचे शेख अब्दुल्लांनी जोरदार समर्थन केले होते हे साक्षेपाने निर्दशनास आणून दिले आहे.

डॉ. डोळे यांनी काश्मीरच्या प्रश्नाचे राजकीय गुंतागुंतीचे कंगोरे चिकित्सकपणे तपासले आहेत. हिंदुत्ववाद्यांच्या काश्मीर प्रश्नाच्या सगळ्या आक्षेपांना त्यांनी समर्पक आणि साधार उत्तरे दिली आहेत हे त्यांच्या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. काश्मीरमधील हिंदु हितसंबंधियांनी शेख अब्दुल्ला जातीयवादी आहेत असा आरोप केला त्याचे कारण कसणाऱ्यांची जमीन असा मूलगामी आर्थिक कार्यक्रम शेख अब्दुल्लांनी सत्तेत आल्यावर सुरू केला. काश्मीरमधील बहुतेक सारी उपजाऊ जमीन - २२ लक्ष एकर राजाच्या मालकीची, काही जमीन छोट्या जहागिरदारांकडे होती. थोडक्यात जमीनमालक हिंदू आणि प्रत्यक्ष कसणारे मुस्लिम होते. नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यक्रमपत्रिकेत जमीनसुधारणा हा महत्त्वाचा विषय होता. नेहरू किंवा कॉंग्रेसची घोषणा कसणाऱ्यांची जमीन हीच होती. हिंदुत्ववादी जमीनदारांची बाजू घेत होते हे स्पष्ट आहे. काश्मीर हे मुस्लिमबहुल राज्य असल्यामुळे काश्मीरला ३७० कलमान्वये खास दर्जा येऊ नये ही खरी हिंदुत्ववाद्यांची धर्मनीती आहे असे डॉ. डोळे सांगतात. काश्मीरच्या स्वतंत्र घटनेला, स्वतंत्र ध्वजाला, काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांना पंतप्रधान असे संबोधण्याविरुद्ध जनसंघाने डॉ. शामा प्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली १९५२ मध्ये आंदोलन छेडले. हे सारे मुद्दे भावनिक आवाहन करणारे होते. डॉ. डोळे नेमकी वस्तुस्थिती सांगतात. काश्मीरचे पूर्ण विलीनीकरण झालेले नसल्यामुळे काश्मीरचा ध्वज होता. पण तो राष्ट्रध्वजाबरोबरीने फडकविला जात असे. काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांना पंतप्रधान म्हणणे आता रद्द झाले आहे. भारताच्या घटनासमितीने काश्मीरला राज्याचा खास दर्जा दिला. तसेच वेगळी घटना करण्याचा अधिकार मान्य केला. काश्मीरच्या राजाने सामिलीकरणाचा निर्णय घेतला ही तत्कालीन वस्तुस्थिती होती. त्यामुळे काश्मीरी जनतेच्या नैतिक आधारावर विलीनीकरणाची प्रक्रिया पूर्ण होणे शक्य असल्यामुळे ही तरतूद मान्य करण्यात आली.

पाकव्याप्त काश्मीरचा प्रदेश भारताने पुन्हा का संपादन केला नाही, भारताने काश्मीरचा प्रश्न युनोत का नेला, काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याचे भारताने का कबूल केले या प्रश्नांचीही तर्कशुद्ध स्पष्टीकरणे डॉ. डोळे यांनी दिली आहेत. काश्मीरवर टोळीवाल्यांनी हल्ला केला होता. त्यामध्ये पाकिस्तानचे छुपे सैनिक होते हे खरे. पण लष्कराच्या बळावर भारत काश्मीर ताब्यात घेत आहे हे धोरण भारताचे नव्हते. काश्मीर राजाने लष्करी मदत मागितली हा भारताचा राजनय होता. बहुसंख्य 'मुस्लिम असलेले एक मोठे राज्य भारतात येते हा भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही संघराज्य संकल्पनेचा विजय होता' असे डॉ. डोळे विश्लेषण करतात. पाकिस्तानने आक्रमण केले आहे अशी 'तक्रार' आपण युनोमध्ये केली. युनोकडे जाण्याचा माऊंटबॅटनचा आग्रह होता हे त्यांनी स्पष्ट मांडले. युनो कोणाच्याही बाजूने अंतिम निर्णय देऊ शकणारी नव्हती याचे भान भारतीय राज्यकर्त्यांना होते. केवळ राजाच्या सहीमुळे काश्मीरचे सामिलीकरण अंतिम होत नाही तर जनतेचेही मत विचारात घेतले पाहिजे ही सार्वमत घेण्यामागची भारतीय राज्यकर्त्यांची लोकशाही मूल्यनिष्ठा होती असे डॉ. डोळे यांचे मत आहे. काश्मीरमधील नंतरच्या सार्वत्रिक निवडणुका म्हणजे सार्वमतच असे नेहरूंनी जाहीर करून खरं तर हा मुद्दा संपला असाच त्याचा अर्थ घ्यायचा. भारत आणि पाकिस्तानच्या लष्करात वरिष्ठ अधिकारी ब्रिटिश असताना आणि भारताची लष्करी क्षमता अपुरी असताना निर्णायक युद्ध होणे अशक्य होते. युनोमध्ये भारताला न्याय न मिळता युद्धबंदी स्वीकारावी लागली ती आपल्याला हवीच होती पण युनोतील पाश्चिमात्य राष्ट्रांना नवस्वतंत्र भारत सामर्थ्यशाली होऊ द्यायचा नव्हता असे डॉ. डोळे यांचे मूल्यमापन आहे.

काश्मीरची घटना स्वतंत्र असली तरी ती भारतीय राज्यघटनेशी विसंगत नाही हे डॉ. डोळें यांनी घटनात्मक तरतुदींच्या उल्लेखात विशद केले आहे. ही घटना प्रत्यक्षात नाममात्र आहे. सर्व कारभार भारतीय राज्यघटनेनुसार चालतो. काश्मीरची अस्मिता टिकवण्यासाठी काश्मीरच्या स्वायत्ततेच्या दृष्टिकोनातून ही घटना निर्माण

करण्यात आली. १९७० पासून भारतातील दक्षिणेकडील आणि इशान्येकडील राज्ये अधिक स्वायत्ततेचा जोरदार आग्रह धरीत आहेत. काश्मीरला जादा अधिकार मिळाले ते मुसलमानांसाठी. असा गैरअर्थ काढून काश्मीरी जनतेवर अविश्वास दाखवायचा, हे न्यायपूर्ण नाही हे डॉ. डोळे यांचे विवेचन भारतीय राजकारणाचा ताजा संदर्भ देणारे आहे. सिमला करारामुळे (१९७२) वादग्रस्त प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भारत आणि पाकिस्तान अशी द्विपक्षीय बोलणी झाली पाहिजेत हे मान्य करण्यात आले तरी डॉ. डोळे यांनी सिमला कराराच्या चौकटीत काश्मीरच्या प्रश्नाची चर्चा करण्याचा आग्रह भारताने सोडून दिला पाहिजे असे म्हटले आहे. सोवियत युनियनचा अस्त आणि अमेरिका ही एकमेव महासत्ता, निष्प्रभ युनो (उदा. इराक, बोस्निया, चेचेन्या), शीतयुद्धाची समाप्ती, इस्लामिक मूलतत्त्ववाद्यांची आंतरराष्ट्रीय दहशत यामुळे नवीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर काश्मीर प्रश्न का चिघळतो आहे याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे असे डॉ. डोळे यांना वाटते.

काश्मीर प्रश्न अधिक बिकट झाला तो १९८० नंतर. शेख अब्दुल्ला यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र फारुख अब्दुल्ला यांच्याकडे काश्मीरचे नेतृत्त्व आले. इंदिरा गांधींनी काश्मीरबाबत वेगळाच राजकीय पवित्रा घेतल्यामुळे - काश्मीर राज्यात काँग्रेसला स्थान असले पाहिजे - भारतीय राज्यकर्त्यांबद्दल काश्मीरमध्ये प्रतिकूल वातावरण तयार झाले. १९८३ च्या निवडणुकीत इंदिरा गांधीनी जम्मुमध्ये हिंदु कार्ड वापरले. जम्मुमध्ये हिंदुत्त्ववाद्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी हे केले तरी नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने राजकीय सत्तेसाठी मतदारांचे जातीय ध्रुवीकरण केले असे डॉ. डोळे यांनी म्हटले आहे. जगमोहन राज्यपाल असताना त्यांनी दमनयंत्रणेचा पाशवी वापर करून काश्मीरमधील राजकीय अस्थिरता स्फोटक केली. १९९०-९७ दरम्यान तर काश्मीरमध्ये लोकनियुक्त सरकारच नव्हते. काश्मीरमध्ये परदेशी अतिरेकी दहशतवादी चळवळीचा म्हणजे अल् फरानच्या उदयामुळे काश्मीरमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. काश्मीरी तरुणांनी मतपेटीतून राजकीय सुधारणा होत नाही हे लक्षात आल्यावर सशस्त्र उठावाची कास धरली हे डॉ. डोळे यांना प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाणवले. काश्मीरमध्ये शासकीय यंत्रणा खिळखिळी झाली आहे. वृत्तपत्रांची विश्वासार्हता संपली आहे. सामान्य जनजीवन कर्फ्युमुळे कोलमडून गेले आहे. काश्मीरी पंडित निर्वासित हलाखीचे जीवन कंठत आहे. सामान्य मुस्लिम अतिरेक्यांच्या सातत्याच्या उपद्रवाला कंटाळला आहे हे काश्मीरचे दु:सह अंतरंग डॉ. डोळे यांनी पाहिले आहे.

**आपल्या देशाला प्रदीर्घ सांस्कृतिक समृद्धी आहे. सामर्थ्य वापरून सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित करण्याची आपली परंपरा नाही, उलट येथे जगातील सर्व धर्मांबद्दल समभावाची भावना आहे.**

**मतभिन्नतेबद्दल आदर हा लोकशाहीचा आत्मा आहे. ज्ञानविज्ञानाचा प्रसार जसजसा होत जाईल तसतशी प्रस्थापित मतांविरुद्ध मते मांडली जाणार. ज्ञान विज्ञानाच्या क्षेत्रात सध्या अभूतपूर्व क्रांती होते आहे. त्या क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञान तर आलेच आहे, शिवाय त्याची व्यापकताही वाढली आहे.**

**प्रगतीचे मूळ तडजोडीत असते. माझेच खरे म्हणणारी व्यक्ती प्रगती करू शकत नाही. हे जसे व्यक्तीचे तसेच लोकसमूहाचेही असते. सांस्कृतिक वेगळेपणा राखण्याच्या हट्टापायी आपण प्रगतीपासून वंचित होत नाही ना, हे पाहिले पाहिजे. वेगळेपणा अगदी पूर्णपणे नष्ट होणार नाही, होऊही नये, कारण विविधता हेही सामर्थ्यच असते. एकजिनसी समाज म्हणजे सर्वांची संस्कृती, भाषा, केशभूषा, वेशभूषा, खाद्यपेयं, परंपरा, सण, उत्सव सगळे समान असले पाहिजे, हा आग्रह सुसंस्कृत तर नाहीच, पण तो लोकशाहीविरोधी, व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधी, सामाजिक सामंजस्याला घातक आहे. आपण वेगळे असून एकच आहोत हे शिकण्याची आणि शिकविण्याची गरज आहे. विविधतेला सामावून घेणारी एकता आपल्याला पाहिजे. विविधतेला नष्ट करणारी एकता, खऱ्या अर्थाने एकता राहू शकणार नाही. आणि एकता संपवू पाहणारी विविधता देशाचे विघटन करील.**

**— ना. य. डोळे**

डॉ. डोळे यांनी काश्मीर प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी काही मौलिक पर्यायही दिले आहेत. १९९० नंतर काश्मीरमध्ये दहशतवाद्यांच्या हिंसक कारवायांचा उद्रेक झाला. केवळ काश्मिरी अतिरेकीच नव्हे तर पाकिस्तानी, अफगाणी आणि सुदानी भाडोत्री दहशतवादी आल्यामुळे काश्मीरियतचा मुद्दा गौण होऊन बृहत इस्लामचा मुद्दा कळीचा झाला आहे हे डॉ. डोळे यांचे मत काश्मीर प्रश्नांचा बदललेला संदर्भ लक्षात आणून देते. इंदिरा गांधी / राजीव गांधीं यांच्या दुटप्पी धोरणांमुळे भारतीय राजकारणात धर्मनिरपेक्षता पातळ झाली. आक्रमक हिंदुत्त्ववाद्यांच्या उदयामुळे काश्मीरी जनता भारत आणि भारत सरकारपासून दुरावत चालली आहे. संघपरिवारांचे राजकारण मुस्लिम द्वेषावर आधारलेले आणि सत्तेचे राजकारण असल्याने त्याचे दीर्घकालीन परिणाम देशविघटनात तर होतीलच पण त्यांच्या आक्रमक असहिष्णू हिंसक धोरणामुळे शीख, ख्रिश्चन आणि बौद्धांनाही असुरक्षितता वाटू लागेल. गेल्या दशकातील काश्मीरमधील हिंसाचारात सुमारे चाळीस हजार काश्मीरी लोक मारले गेले. ते बहुसंख्य मुस्लिमच होते याची जाणीव डॉ. डोळे करून देतात. भारतामध्ये धर्मनिरपेक्ष शक्ती वाढल्या आणि कट्टर हिंदुत्त्ववाद कमी झाला तरच काश्मीरी जनतेतील परात्मभाव कमी होईल असे डॉ. डाळे यांना वाटते ते खरेच आहे. युद्धबंदी रेषा हीच आंतरराष्ट्रीय सरहद्द मानणे, पाकव्याप्त काश्मीरचा नाद सोडणे, लोकशाही राजकीय प्रक्रिया गतिमान करणे, लोकपातळीवर काश्मीरशी सुसंवाद साधणे, भारतीय लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे असे काही मौलिक उपाय डॉ. डोळे यांनी सुचविले आहेत. संघराज्यातील सर्व राज्यांना समान स्वायत्तता मोठ्या प्रमाणावर दिली तर काश्मीरी जनता ही एकसंघपणे इस्लामी मुलतत्त्ववाद्यांच्या विरोधात नक्कीच खंबीरपणे उभी राहू शकेल असा डॉ. डोळे यांचा आशावाद आहे.

काश्मीरला खास दर्जा देणारे ३७० कलम हे राजा हरिसिंह या हिंदू राजामुळे निर्माण करावे लागले, मुस्लिम बहुलतेमुळे नाही हे समजून घेऊन या कलमात आता पुष्कळ दुरुस्त्या झाल्यामुळे प्रारंभीचा काश्मीरचा खास दर्जा आता राहिला नाही ही घटनात्मक वस्तुस्थिती सगळ्यांना सांगायला हवी असे ही डॉ. डोळे यांना वाटते.

डॉ. ना. य. डोळे यांचा 'काश्मीर प्रश्न' हा ग्रंथ भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हानाची मूलग्राही चिकित्सा करणारा ग्रंथ आहे. भारताची संस्कृती सहिष्णुतेची आहे. समाज एकजिनसी करण्यासाठी केवळ सहिष्णू असणे आधुनिक काळात पुरेसे नाही तर मतभिन्नतेचेही अस्तित्व मान्य करायला हवे हे नवे चिंतन ते आत्मीयतेने मांडतात. सध्या समाजाचा पोत विस्कळीत झाल्यामुळे 'वर्चस्ववादी' संस्कृतीचा अतिरेक होतो आहे. हा एका समाजाचा प्रश्न नाही तर त्याला जागतिक परिमाणही आहे. जग लहान झाले आहे. मानवी हक्काची जगभर पायमल्ली होते आहे. लोकसमुहांच्या विविध संस्कृतीमध्ये संघर्ष जगभर होत आहे. मग विविधतेला समजावून घेणारी एकता हीच चिरंतन ठरू शकेल अशी डॉ. डोळे यांची श्रद्धा आहे. काश्मीरचा प्रश्न हा भारतीयांनी लोकपातळीवर प्रेमाने सोडवला पाहिजे ही त्यांची मैत्रीपूर्ण हाक आहे. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना म्हणूनच 'पूर्णात सामाविलेली विविधता' हे नवे मानवतावादी मूल्य घेऊन भारतीय समाजाने समता प्रस्थापनाचे आव्हान स्वीकारले पाहिजे हा त्यांचा तळमळीचा आग्रह प्रत्येक भारतीयाने समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उद्‌बोधक आहे.

. . . . . . . . . . . . . . . **सुरेंद्र जोंधळे**



# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यांतील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकरी यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी, 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील अभ्यासू कार्यकर्ते व संशोधनकार्य करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून अलीकडे 'ट्रस्ट'ने एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' सुरू केले आहे. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मादिनाच्या अनुषंगाने तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे एक अभ्यासिका चालविण्यात येते. २०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या उन्नत नगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी (गोरेगाव) झोपडपट्टी विभागात कल्याण केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे निःशुल्क वाचनालय असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात. स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तूतूनच केले जाते. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने सुरू केलेल्या 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' व 'समाजकार्य गौरव पुरस्कार योजना' यांची कार्यवाही 'ट्रस्ट'कडून केली जाते. तसेच लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कुटुंबीयांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'अनुवाद-अनुदान योजने'ची कार्यवाही 'ट्रस्ट'कडूनच केली जाते.

# महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना १९९९
# निवड सल्लागार समिती (भारत)



**मृणाल गोरे**
अध्यक्ष
केशव गोरे स्मारक ट्रस्ट



**दिगंबर पाध्ये**
निमंत्रक, साहित्य पुरस्कार समिती
मराठीचे प्राध्यापक व समीक्षक



**डॉ. विजया राजाध्यक्ष**
प्राध्यापिका, मराठी विभाग प्रमुख
एस्.एन्.डी.टी. विद्यापीठ (निवृत्त)
प्रख्यात कथालेखिका व समीक्षिका



**नागनाथ कोतापल्ले**
मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ
कथाकार आणि समीक्षक



**नारायण सुर्वे**
प्रख्यात कवी



**वसंत आबाजी डहाके**
मराठीचे प्राध्यापक
कवी आणि समीक्षक



**सतीश काळसेकर**
अनियतकालिकांच्या चळवळीतील
कवी व कार्यकर्ते



**डॉ. सुधीर पानसे**
प्राचार्य, साठ्ये महाविद्यालय
पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक
संशोधक व लेखक

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली दोन दशके करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने आजवर पाचशेहून अधिक गरजू मुलांना साहाय्य केले आहे. पुण्याच्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेच्या सहकार्याने पुण्याजवळ एक गाव दत्तक घेतले आहे. जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. अशा रीतीने गेल्या दोन दशकात भारतातील तीनशेहून अधिक संस्थांना दहा कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या देणग्या या संस्थेने दिल्या आहेत.

*Invest in future*
*of those*
*with no future...*
*So they can reinvest*

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू केली आहे.

# महाराष्ट्र फाउण्डेशन

# निवड / सल्लागार समिती (अमेरिका) १९९९



सुनील देशमुख



**पद्मजा फाटक (मजेत)**
'गर्भश्रीमंतीचे झाड',
'राही' इत्यादी
पुस्तकांच्या लेखिका.
'बाराला दहा कमी'
या प्रसिद्ध ग्रंथाच्या अनुवादक



**अशोक सबनीस**
न्यूयॉर्क सिटी ट्रांसिट
ऑथॅरिटीमध्ये
डेप्युटी डिव्हिजनल आर्किटेक्ट,
कॅनडामधील
'एकता' मासिकात लेखन.



**दिलीप वि. चित्रे**
वास्तुविशारद, 'हिमगंध' हा
कवितासंग्रह, 'ऐल तीरावर' व
'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या
दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची
गुहा' हे दोन अंकी नाटक.
'कुंपणापलीकडले शेत' या
प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक.



**संध्या कर्णिक**
'दिवा कुणाचा तेवत राही' हा
ललित लेखसंग्रह, 'साधना', 'स्त्री',
'एकता', 'नवयुग' इ.
नियतकालिकांतून कथा,
कविता प्रसिद्ध. फिलाडेल्फियात
सामाजिक व सांस्कृतिक
कार्यात सहभाग.



**राजन गडकरी**
'मेरिन् लिंच' या वित्तसंस्थेत
अर्थविश्लेषक,
ललित व वैचारिक
साहित्यात मनापासून रस.



**विद्युल्लेखा अकलूजकर**
प्राध्यापिका, 'मेरा जूता है जापानी',
आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च' ही
दोन पुस्तके. मराठी कविता व
ललितानिबंध लेखन, इंग्रजी व
हिंदी कथा-कवितांचे मराठी अनुवाद.



**ललिता गंडभीर**
भारतात चार मराठी कथा व
लेखसंग्रह आणि अमेरिकेत
जर्नल्स् व अँन्थॉलॉजिसमधून
साहित्य प्रकाशित.

## मराठी साहित्य पुरस्कार योजना

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही १९७८ साली अमेरिकेत स्थापन झालेली संस्था आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या हलक्या करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याच्या निर्धाराने निवडक ध्येयवादी संस्थांतर्फे गरजवंतांना आर्थिक व श्रमदानाची मदत 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गेली दोन दशके करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेटिकट् यु.एस.ए. ह्यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ मध्ये कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली. ही सामाजिक प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू रहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

या योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

### महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपयांचा एक गौरव पुरस्कार.

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातील.

ललित साहित्यिकाच्या संदर्भात —

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त होते.
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले जाते.
- ज्यांच्या साहित्यातून सर्वकालीन व सार्वत्रिक मानवी मूल्यांचा आविष्कार होतो.
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाईल.

वैचारिक साहित्यिकाच्या संदर्भात —

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी निःस्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे.

  अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाईल.

### प्रकाशनगृहासाठी अनुदान

पुस्तक प्रकाशन हा धंदा नसून व्यवसाय आहे. सांस्कृतिक अंगाच्या दृष्टीने त्याला महत्त्व आहे. म्हणून मराठी भाषा, समाज, साहित्य व संस्कृती यासंबंधीच्या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी एका मराठी प्रकाशन संस्थेला एक लक्ष रुपये 'महाराष्ट्र फाउण्डेशन अनुदान' 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'मार्फत दिले जाईल.

अनुदानाची ही रक्कम पुस्तक-छपाईसाठी खर्च करता

येणार नाही. या अनुदानासाठी प्रकाशकांकडून अर्ज मागविण्यात येतील. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेल्या समितीकडून अर्जाची छाननी करून प्रकाशकाची निवड करण्यात येईल.

## विशेष पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रातील एखाद्या विभागातील विशेष कामगिरीबद्दल एका व्यक्तीस रु. ५०,०००/- व मानचिन्ह असा एक विशेष पुरस्कार दिला जाईल. या वर्षी मराठी भाषा, संशोधन व समीक्षा या क्षेत्रातील कामगिरीसाठी हा पुरस्कार असेल.

## वैचारिक नियतकालिकांसाठी पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व वैचारिक जागृती या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एका नियतकालिकाला रुपये ५०,०००/- व मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात येईल.

यासाठी —

- जी नियतकालिके पूर्णपणे वैचारिक असतील. (ललित साहित्य प्रकाशित करीत नसतील.)
- जी तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या विशेष क्षेत्रांना वाहिलेली असतील.
- जी शास्त्रीय दृष्टीने निःस्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.
- ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल वा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.
- ज्या नियतकालिकांच्याद्वारे महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित विचारवंतांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील.

अशा नियतकालिकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जाईल. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील 'अंतिम निवड समिती' १९९९ या वर्षासाठी एका नियतकालिकाची निवड करील.

## ग्रंथांसाठी पुरस्कार

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून सहा मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,०००/- व मानचिन्ह असे सहा 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' या वर्षी दिले जातील. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागणार नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या तीन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जाईल. या वर्षी १९९७, १९९८, १९९९ या तीन वर्षांतील पुस्तके विचारात घेतली जातील. यामध्ये संपादित/भाषांतरित ग्रंथांचाही विचार केला जाईल.

गौरव पुरस्कार विशेष पुरस्कार आणि ग्रंथपुरस्कार यासाठी महाराष्ट्रातील २०० विचारवंत व सुजाण वाचक यांच्याकडून शिफारशी मागविण्यात येतील.

या शिफारशी विचारात घेऊन 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील अंतिम निवड समिती पुरस्कारांसाठी व्यक्ती व ग्रंथ यांची निवड करतील.

## अनुदाने

- मराठी भाषा, साहित्य व समाज या संदर्भातील संशोधन / प्रबोधन व शिक्षण या उपक्रमांसाठी साहाय्य वा प्रोत्साहन म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन अनुदान' 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'मार्फत दिले जाईल.

  यासाठी संस्थांकडून व व्यक्तींकडून अर्ज मागविले जातील.

  तज्ज्ञांच्या समितीकडून छाननी करून संस्थांची वा व्यक्तींची निवड केली जाईल.

  प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचा अहवाल 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ला देणे संस्थेला बंधनकारक राहील.

  हा अहवाल मराठीत देणे आवश्यक राहील.
- ग्रामीण भागात चांगल्या वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून त्या भागातील निवडक ग्रंथालयांना रु. ७५,०००/- ची पुस्तके 'महाराष्ट्र फाउण्डेशन भेट' म्हणून 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'तर्फे दिली जातील. या ग्रंथालयांची निवड 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'कडून केली जाईल.

  यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही




मला पुरस्कार देऊन माझा गौरव केल्याबद्दल 'महाराष्ट्र फाउण्डेशन' आणि 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' या दोन संस्थांचा मी आभारी आहे. आपण सर्व येथे आलात म्हणून आपलेही मी आभार मानतो. या भाषणात मी माझा अल्प परिचय करून देणार आहे. सुरुवातीला माझ्याकडून काय लेखन झाले याविषयी मी बोलेन, दुसऱ्या भागात सध्या मी काय करतो आहे याची माहिती देईन. १९६२ पासून १९६९ पर्यंत मी फक्त इंग्रजीत लेखन करीत असे. श्री. पु. भागवतांसारख्या काही मराठीप्रेमी स्नेह्यांच्या आग्रहामुळे मी मराठीत लिहू लागलो. यापुढे फक्त मराठीतच पुस्तके लिहिण्याचा निर्णयही मी घेतला. माझे निबंध मात्र दोन्ही भाषेत लिहीत राहिलो. येथे मी माझ्या आत्मपरिचयात फक्त माझ्या पुस्तकांविषयी माहिती देणार आहे, निबंधांना स्पर्शही करणार नाही. मराठी वाचकाला सौंदर्यशास्त्रीय लिखाणाबद्दल फार आस्था आहे, त्यातील नव्याजुन्या भूमिका जाणून घेण्यासाठी तो फार उत्सुक आहे, या भावनेने २५ वर्षांपूर्वी माझ्या लेखनाने एक महत्त्वाचे

## १९९८ चा 'महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार' स्वीकारताना केलेले भाषण

# रा. भा. पाटणकर

वळण घेतले. 'सौंदर्यमीमांसा' या माझ्या पहिल्याच पुस्तकाला 'साहित्य अकादमी'चा १९७४ चा पुरस्कार मिळाला. आजसुद्धा मी एका वेगळ्या वळणावर उभा आहे, विषयाच्या दृष्टीने व माध्यमाच्याही दृष्टीने. मी एका वेगळ्या विषयावर मराठीत एक पुस्तक लिहिले आहे. त्याला पूरक ठरेल असे एक इंग्रजी पुस्तक लिहितो आहे. अशा वेळी मला वरील दोन संस्थांनी पारितोषिक देऊन प्रोत्साहन दिले आहे.

सौंदर्यशास्त्र व साहित्यसमीक्षा यांच्याबद्दलची माझी भूमिका पुन्हा स्पष्ट करणे आवश्यक आहे. सौंदर्यशास्त्र निर्वात पोकळीत निर्माण होत नाही, त्याला कोठल्या तरी कलासमीक्षेच्या अस्तित्वाची गरज असते. मला सर्वात जवळची कला-समीक्षा म्हणजे साहित्य-समीक्षा. मी १९५२ पासून इंग्रजी साहित्याचे अध्यापन करीत होतो. ते करीत असताना मला १४ व्या शतकापासून २० व्या शतकापर्यंतच्या विविध प्रकारच्या साहित्यकृती शिकविण्याचा योग आला. हे काम करीत असताना माझ्यापुढे काही बिकट तात्त्विक प्रश्न उभे राहिले. ते सोडविण्याची निकड वाटू लागली. हे प्रश्न कोणाही साहित्यशिक्षकाला तसेच साहित्यसमीक्षकाला पडू शकतील असे आहेत. याचे एक उदाहरण घेऊ. समजा आपण 'किंग लिअर ही एक महान शोकात्मिका आहे' असे समीक्षाविधान केले. या विधानात दोन संकल्पना वापरलेल्या आहेत. शोकात्मिका व महान. यापैकी दुसरी सरळ सरळ मूल्यात्मक आहे, आणि पहिली काही प्रमाणात वर्णनपर असली तरी तिला मूल्यात्मकतेचे अंगही आहे. म्हणून आपण जसे लॉरिल हार्डीच्या चित्रपटाला ती लावीत नाही तसे वाटेल त्या दुःखान्त साहित्यकृतीलाही ती लावीत नाही, उदा. मेलोड्रामा. वर उल्लेखिलेल्या संकल्पना भिन्न स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यातील तार्किक संबंध तपासणे अगत्याचे आहे. तसेच शोकात्मिका ही वर्ग-संकल्पना व आपल्या समोरची साहित्यकृती यांच्यातील संबंध तपासणे हेही आवश्यक आहे. शोकात्मिका व व्याघ्रत्व या वेगळ्या जातींच्या संकल्पना आहेत. व्याघ्रत्वाची सर्वमान्य व्याख्या असू शकते, तिच्यात निर्देशिलेले गुणधर्म ज्या जनावरात आढळतात त्याला आपण वाघ म्हणतो. शोकात्मिका या संकल्पनेत कोणते गुण घ्यायचे हाच मुळी वादाचा विषय आहे. हडेलहप्पी केली तर गोष्ट वेगळी; पण एरवी हा वाद संपण्यासारखाही दिसत नाही. या व अशा संकल्पनांच्या तार्किक वैशिष्ट्यांचा नीट विचार केला नाही तर समीक्षाव्यवहार नीटपणे चालणार नाही.

या जागेवर तत्त्वज्ञानाच्या मदतीचा पुष्कळ उपयोग होऊ शकतो. त्यासाठी तत्त्वज्ञानाचे औपचारिक विद्यार्थी होणे जरुरीचे नाही. एकलव्यीवृत्तीने काम केल्यास औपचारिक मदतीची फारशी जरुरी पडत नाही, आणि आवश्यक तेथे तज्ज्ञांकडून मदत मिळतेही. निदान माझा तसा अनुभव आहे. या एकलव्यीवृत्तीचा फायदा होऊन मला तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात बऱ्यापैकी गती मिळाली असणे शक्य आहे. त्यामुळे माझे बरेच इंग्रजी लेख तत्त्वज्ञानाच्या खास मासिकांमध्ये (Philosophical Journals) प्रसिद्ध झाले. मी प्रस्तुत विषयावर काम करीत होतो त्यावेळी इंग्रजी जगात विश्लेषक तत्त्वज्ञानाचा (Analytical philosophy) विशेष जोर होता. १९०३ मधील जी. ई. मूरपासून सुरू झालेल्या व व्हिट्गिन्सटाईन, राईल, स्ट्रॉसन, ऑस्टिन यांच्यानंतरही टिकलेल्या या परंपरेकडून आपल्याला बरेच काही मिळण्यासारखे आहे. एकदोन उदाहरणे घेऊ. आपल्या 'प्रिन्सिपिया एथिका'च्या सुरुवातीला मूरने बिशप बटलरचे पुढील वाक्य उद्धृत केले आहे : A Thing is what it is, and not any thing else. हा मुद्दा कोणालाही सहज सुचणारा आहे व तो आमच्या मनात नेहमीच असतो असे कोणी म्हणेल. पण तो आपल्या मनात नेहमीच असता तर काही ढोबळ चुका हातून झाल्या नसत्या. पिवळा रंग पाहण्याचे उदाहरण घेऊ. आपण पिवळा रंग पाहत असताना अवकाशात विशिष्ट प्रकाशलहरी व आपल्या शरीरात विशिष्ट मज्जाऊर्मी कार्यरत असतात, हे शास्त्रीय सत्य आहे. पण पिवळेपण दिसणे म्हणजे वरील प्रकाशलहरी किंवा मज्जाऊर्मी कार्यरत होणे नाही. त्यांच्यात एकता असती तर वरील लहरी किंवा ऊर्मी यांची काहीही माहिती नसणाऱ्या माणसाला पिवळा रंग दिसला नसता व वरील माहिती असणारा माणूस जरी रातांध असता तरी त्याला तो रात्रीसुद्धा दिसता असता. पण असे होत नाही. हे जर मान्य असेल तर सौंदर्यानुभव म्हणजे विशिष्ट मज्जाऊर्मींच्या विवक्षित हालचाली नव्हेत हेही मान्य करावे लागेल. आपल्याला स्व-रस-रंजनात्मकतेचा अनुभव म्हणजे काय हे शोधण्यासाठी अनुभवाची पातळी सोडून चालणार नाही, पदार्थविज्ञान किंवा शरीरविज्ञान तो अनुभव म्हणजे काय हे सांगू

शकणार नाही, त्या अनुभवाच्या सहचर घटना-घटकांबद्दल ही विज्ञाने माहिती सांगू शकतील इतकेच. दुसरे उदाहरण मराठीत लोकप्रिय असलेल्या आस्वादक समीक्षेत मिळते. ही समीक्षा लिहिणाऱ्यांचा रोख बहुधा असा असतो की सौंदर्य, कलात्मकता केवळ आपल्याला कळते, बाकीचे लोक केवळ यांत्रिक खटाटोप करीत असतात. प्रथम आस्वाद व नंतर तो इतरांना कळविण्यासाठी संकल्पनात्मक चर्चा अशी ही भूमिका आहे. स्वायत्त सौंदर्याची भूमिका मांडताना कांटने संकल्पनाविरहित अनुभवाचा मुद्दा मांडला आहे. या अनुभवाबद्दल बोलताना कांटच्या मनात निसर्गाचे सौंदर्य आहे; निसर्गाचा एखादा समोरचा देखावा बघण्यासाठी त्याची इतर देखाव्यांशी तुलना करणे आवश्यक नसते; तो कोणत्याही संकल्पनेच्या व्याप्तीत बसणारा सभासद असण्याचीही गरज नसते. पण साहित्यकृती—किंवा इतर कलाकृती—यांना हे विश्लेषण लागू पडत नाही. येथे अनुभवात प्रथमपासून संकल्पना असतातच. म्हणूनच या सर्वांबाबत समीक्षाविधान करणे शक्य होते. ए. सी. ब्रॅडली, टी. एस. एलियट, एफ. आर. लेविस यांना आस्वाद मिळतो, पण ते त्यातील भावात्मकतेने वाहावत जात नाहीत. साहित्यकृतीबद्दलच्या समीक्षा-विधानाबद्दल असे बरेच प्रश्न निर्माण होतात. 'सौंदर्य क्षयज्ञ' या विधानाविषयी तर ते जास्त प्रमाणात उभे राहतात.

'सौंदर्यमीमांसा' या पुस्तकाची मांडणी वरील विवेचनावर आधारलेली आहे. त्यातील एका पातळीवर समीक्षा-व्यवहारात वापरण्यात येणाऱ्या संकल्पनांची चिकित्सा करून त्यांचे नीट व्यवस्थापन कसे करता येईल याचा तत्त्वज्ञानात्मक विचार आहे. तेथेच मी द्विध्रुवात्मकतेचा सिद्धान्त मांडला आहे. तो तपासून पाहण्यासाठी उपलब्ध सौंदर्य/साहित्य सिद्धान्तांची चिकित्सा करणे आवश्यक होते. त्यातील बहुतेक सिद्धान्त मराठी वाचकाला अपरिचित असल्याने त्यांचा परिचय करून देणे जरूर होते. 'सौंदर्यमीमांसे'त त्यांचा नुसता परिचय नाही. वाचकाची चिकित्सावृत्ती जागी ठेवण्यासाठी या सिद्धान्तांचे सामर्थ्य व उणिवा यांचेही दिग्दर्शन पुस्तकात केलेले आहे. या पुस्तकाच्या पहिल्या काही वर्षांतील वाचकांनी या दोन्ही पातळ्यांची नीट जाणीव ठेवली. कारण त्यांच्या बोलण्यालिहिण्यात या पातळीवरील संकल्पनांचा वापर होतो. आजही काही वाचकांबद्दल हे खरे असावे, पण बरेच वाचक या पुस्तकाकडे अनेक सिद्धान्तांचा सुलभ परिचय करून देणारे मराठीतील एक संकलनात्मक पुस्तक मानीत असणे शक्य आहे.

मी लिहीत होतो त्या काळात केवलकलावादाचा बराच प्रभाव होता, पण त्या वादाच्या तात्त्विक मुळापर्यंत जाण्याचा कोणी प्रयत्न करीत नव्हते. त्यामुळे वैचारिक गोंधळ होत होता. पण इंग्रजीत मुळापर्यंत नेणारी पुस्तके उपलब्ध होती. ती मराठी वाचकापर्यंत पोहोचविणे आवश्यक होते. त्याचा एक मार्ग म्हणजे या पुस्तकांचा सुलभीकृत परिचय करून देणे किंवा त्यांचा अनुवाद करणे. या मार्गाने जाऊन काहीच साधणार नव्हते. कारण मराठी वाचकाची अडचण भाषेची नव्हती; मुळातल्या सिद्धान्तांतील संकल्पना माहीत नसणे, ही ती अडचण होती. त्यामुळे मी भाष्य-लेखनाकडे वळलो. त्यासाठी मी इमॅन्युअल कांटचे 'क्रिटीक ऑफ इस्थेटिक जजमेन्ट', बेनेदेत्तो क्रोचेचे 'इस्थेटिक' व आर. जी. कॉलिंगवुडचे 'द प्रिन्सिपल्स ऑफ आर्ट' ही पुस्तके निवडली. कांट हा समजायला कठीण असल्याचे सर्व मान्य करतात. हे पुस्तक लिहिताना कांटने आपल्या आधीच्या दोन 'क्रिटीक्स'मधील विवेचन गृहीत धरले असल्याने ही बिकटता वाढली आहे. ही अडचण दूर व्हावी व प्रस्तुत भाष्य स्वयंपूर्ण व्हावे म्हणून मे. पुं. रेगे यांनी कांटच्या विचारव्यूहावर या पुस्तकासाठी खास एक विस्तृत परिशिष्ट लिहिले आहे. प्रस्तुत पुस्तकात त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. क्रोचे व कॉलिंगवुड यांची पुस्तके सोपी वाटतात, पण हा सोपेपणा फसवा आहे. त्यामुळे वाचकाची फसगत होते. कॉलिंगवुडच्या बाबतीत असे व्हावे हे आश्चर्य आहे, कारण त्या काळातील २०-२५ वर्षे त्याचा मराठी समीक्षकांवर बराच प्रभाव होता. पण त्याच्या तत्त्वज्ञानात्मक बैठकीपर्यंत मराठीतील समीक्षक गेले नव्हते. क्रोचेच्या बाबतीत बरोबर हेच घडले होते. या पुस्तकांवर भाष्ये लिहिणे मराठी वाचकाच्या दृष्टीने फार आवश्यक होते. माझ्या भाष्यांमध्ये नुसती ओळख नाही, चिकित्साही आहे. वाचकाची चिकित्साबुद्धी जागृत व्हावी हा यामागील हेतू होता.

सौंदर्यशास्त्राला कलासमीक्षेचा पाया असावाच लागतो

हे याआधी आलेले आहे. त्या काळातील व कदाचित आजच्याही मराठीतील समीक्षेत काही त्रुटी आहेत. त्यातील सर्वांत महत्त्वाची त्रुटी ही की हे समीक्षक तार्किकदृष्ट्या अप्रस्तुत अशा गोष्टीवर भर देतात, उदा. 'ही कादंबरी फार चांगली आहे कारण तिच्यात व्यापक समाजदर्शन घडते' हे प्रस्तुत अशा गोष्टीवर भर देणारे वैध समीक्षाविधान आहे. कारण त्यात कादंबरी कशामुळे फार चांगली ठरते, याचा निकष अनुस्यूत आहे. हे जीवनदर्शन व्यापक आहे की नाही हे ठरविण्यासाठी वेगळे निकष उपलब्ध आहेत. परंतु व्यापकतेचा शोध घेताना लेखकाच्या लौकिक जीवनाकडे जाणे हे प्रस्तुत नाही; खरे तर तसे करणे घातक आहे, कारण बहुतेक वेळा लेखकाचे लौकिक जीवन इतके मनोरंजक असते की समीक्षक व वाचक त्यातच गुंतून जातात. दुसरी त्रुटी म्हणजे समीक्षकाने स्वत:च्या भावनिक प्रतिक्रियांचा आविष्कार करणे. हेही वैध समीक्षाविधान नव्हे. वाचकाचा आणि समीक्षकाच्या खाजगी जीवनातील भावनात्मकतेचा संबंध येण्याचे कारण नाही. त्यामुळे प्रस्तुत कादंबरी चांगली आहे की नाही यावर प्रकाश पडत नाही. आणखी एक त्रुटी म्हणजे लेखनांतर्गत पुरावा न देता केवळ चमकदार शेरेबाजी करणे. मनोरंजनात्मक समीक्षापद्धतीचे वरील तिन्ही प्रकार बाजूला सारून मी तीन साहित्यिकांवर पुस्तके लिहिली आहेत. 'कमल देसाई यांचे कथाविश्व' या पुस्तकात लेखिकेच्या कथा व लघुकादंबऱ्या यांचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या जीवनदर्शनातील सूक्ष्मता व तीव्रता यावर भर दिला आहे. तसेच त्यांच्या लेखनातील अस्मिता-शोधांवरून त्या स्त्रीवादी असल्या तरी त्यांच्या साहित्याचे अस्तित्ववादाशी जास्त जवळचे नाते कसे आहे हे दाखविणे आवश्यक होते. एका प्रकारच्या साहित्यकृतींत सार्वत्रिक ठरतील अशी संघटनतत्त्वे आपण शोधतो. (उदा. ए. सी. ब्रॅडलीचे Shakespearean Tragedy) असे करणे वैधही आहे. पण त्या प्रकारातील विशिष्ट साहित्यकृतीतच सापडू शकेल असे संघटन तत्त्व असू शकते का? याचाही शोध मी घेतला आहे. 'मुक्तिबोधांचे साहित्य' या पुस्तकात लेखकाच्या कवितांपेक्षा त्याच्या कादंबऱ्या जास्त महत्त्वाच्या आहेत हे दाखवून कादंबऱ्यांचे विस्तृत विश्लेषण केले आहे. मुक्तिबोध मार्क्सवादी होते हे खरे, पण त्यांनी रेखाटलेल्या जीवन चित्रणाचा शोध घेण्यासाठी केवळ मार्क्सवादी संकल्पनाव्यूह पुरत नाही हेही दाखविले आहे. त्यांची भूमिका स्थिर व एकसंध नाही, तर मार्क्सवाद, नवमानवतावाद व धार्मिकता या तिन्हींचे घटक तिच्यात आहेत. या दृष्टीने त्यांच्या कवितांचे व सौंदर्यशास्त्रीय लेखनाचे विश्लेषण पुस्तकात आहे. 'कथाकार शांताराम'मध्ये दाखविल्याप्रमाणे शांतारामांचे सर्व लेखन कथा या एकमेव साहित्यप्रकारात झालेले आहे. तरीसुद्धा त्यात कथा-शृंखला या साहित्यप्रकाराची बीजे सापडतात. त्यांचे दुसरे वैशिष्ट्य असे की मराठीतील जीवनदर्शन सामान्यपणे एकाच जातीय-सांस्कृतिक कक्षेपुरते मर्यादित केलेले सापडते. हे जसे सदाशिवपेठी साहित्याविषयी खरे आहे तसे ते बहुतेक दलित साहित्याविषयीही खरे आहे. शांतारामांच्या कथांमध्ये अशा मर्यादा दिसत नाहीत. त्यात गोंड तरुणी बैजा, पुरुषांचा साधन म्हणून उपयोग करून घेणारी रती खन्ना, विचित्र योगायोगाने निर्माण झालेल्या नैतिक प्रश्नाचे उत्तर शोधू पाहणारी व शेवटी आत्महत्या करणारी अंजनी, 'चंद्र माझा सखा'मधील निवेदक-नायिका या वेगवेगळ्या सांस्कृतिक गटातील व्यक्तिरेखा वरील विधानाला पुष्टी देतात. शांतारामांची भूमिका उदार मानवतावादी आहे. आणखी एका साहित्यिकाविषयीचे माझे नवे पुस्तक आज प्रकाशकाकडे आहे.

मी सध्या माझ्या लेखनाच्या एका वेगळ्या वळणावर उभा असल्याचा व त्यावरील माझ्या नव्या पुस्तकाचा उल्लेख वर आला आहे, त्याचा थोडा खुलासा करायला हवा. तत्त्वचर्चा करणारे मराठी साहित्य वाचले जाते हे खरे, पण ते कोठपर्यंत पोहोचते हे पाहायला हवे. कांटच्या 'क्रिटीक ऑफ इस्थेटिक जजमेंट'वरील भाष्यातील The beautiful is that which, apart from a concept, pleases universally या विधानावरील माझ्या विवेचनावर तत्त्वज्ञानाच्या एका भूतपूर्व प्राध्यापकाने आक्रस्ताळी टीका केली. कांटच्या पहिल्या दोन 'क्रिटीक्स'च्या पलीकडे न जाणाऱ्या वाचकांना कांटचे वरील विधान अनाकलनीय वाटले असण्याची शक्यता आहे. त्यामुळे तिसऱ्या 'क्रिटीक'मध्ये कांटने आधीच्या दोन 'क्रिटीक्स'मधल्या भूमिकांसारखीच भूमिका घेतली असणार असे गृहीत धरून माझ्यावर वरील टीका केलेली होती हे उघड आहे. त्यावर मी असे उत्तर दिले की मी म्हणतो तशी भूमिका कांटने घेतली

आहे की नाही ते मूळ पुस्तकाच्या अमुकअमुक पृष्ठांवर पाहावे व स्वत: निर्णय घ्यावा. पण काहींच्या मते मराठीतील वाद शेवटपर्यंत नेले जात नाहीत हे वाईट आहे. कुस्तीप्रमाणे हे वाद निकाली व्हायलाच पाहिजेत, हा आग्रह धरणाऱ्या लोकांत शिक्षणक्षेत्रातील काही उच्चपदस्थही होते. परिणामी कांटच्या सिद्धान्ताची मांडणी मे. पुं. रेगे यांनी 'नवभारत' मासिकात लेख लिहून पुन्हा केली. त्याला मूळ आक्षेपकाचे उत्तर असे की त्याने त्यांचे प्रस्तुत लेखन वाचले नाही, दखल घेण्यासारखे त्यात काही नाही. तो कागद घरातील लहान मुलांच्या प्रातर्विधींसाठी वापरावा इतकीच त्याची किंमत. 'झालीच पाहिजे' असा आग्रह धरणाऱ्या उच्चपदस्थाने 'हा आक्षेपकाचा दिवस मानला तर त्याची रात्र काय असेल!'असा मूळ विषयाशी काहीही संबंध नसलेला शेरा दिला. तत्त्वज्ञानाच्या पातळीवरील वादाची कशी विल्हेवाट लागते हे आपण पाहिले. हा वाद एका अर्थाने निकाली झाला असे म्हणता येईल. कारण आक्षेपक, उच्चपदस्थ मार्गदर्शक किंवा इतर कोणीही कांटच्या सिद्धान्ताकडे गेल्या २० वर्षांत वळले नाहीत. दुसरे उदाहरण वेगळ्या माध्यमातील घेऊ. डॉ. अरुण टिकेकर हे एका प्रचंड खप असलेल्या वृत्तपत्राचे एक यशस्वी संपादक आहेत. वृत्तपत्राच्या आठवडी आवृत्तीत काय असायला हवे याची त्यांना चांगली कल्पना आहे. त्यांच्याच वृत्तपत्रात त्यांनी स्वत: चालविलेल्या 'तारतम्य' या स्तंभाबद्दल सुशिक्षित म्हणविणाऱ्या काही वाचकांची अशी तक्रार आहे की हे लेखन डोक्यावरून जाते. ही घसरगुंडी शिक्षणाचे माध्यम इंग्रजी केल्यामुळे झाली, असे म्हणायलादेखील जागा नाही. प्रथमपासून इंग्रजीत शिकलेल्या; परदेशाची वारी करून आलेल्या लोकांची पातळी याहून वरची नाही. फरक इतकाच की त्यांचे अज्ञान दुहेरी असते, त्यांना भारतीय संस्कृतीची माहिती नसते व पाश्चात्त्य संस्कृतीचीही नसते. पण ते अधिकारवाणीने सांगतात. 'गांधर्व-विवाह म्हणजे बळजबरीने केलेला विवाह', 'बंगालमधील मुक्त व्यापार इंग्रजांनी आपल्या नियंत्रणाखाली ठेवला', 'प्रायोगिक मनोवैज्ञानिक फ्रॉईड याचे असे मत आहे' 'बॉय' या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'नर-बालक' असा आहे. हे सर्व सहन केले जाते इतकेच नाही, तर त्याचे कौतुकही होते.

यावरून असे लक्षात येईल की परिस्थिती गंभीर आहे. पण प्रश्न मराठीचे काय होणार इतका मर्यादित नसून आम्हा सर्वांचे ज्ञानाच्या व विचाराच्या क्षेत्रात काय होणार असा सार्वत्रिक आहे. 'मराठी ज्ञानप्रसारक'च्या १८५२ मधील एका अंकात शिक्षणाच्या माध्यमावरील लेखात म्हटल्याप्रमाणे परकीय भाषा बोलणारे ५-७ हजार लोक येथे आले तरी ते काही कोटी बोलणाऱ्यांच्या भाषेला नष्ट करू शकत नाहीत. विल्यम द कॉंकररला इंग्लंडमध्ये जो अनुभव आला, तो सार्वत्रिक आहे. फ्रेंचच्या वर्चस्वाखालून इंग्रजी भाषा निघाली इतकेच नाही, तर हूकरच्या (१५५४ - १६६०) काळात ती विचारोत्पादक झाली व रॉयल सोसायटीच्या स्थापनेनंतर (१६००) ज्ञानोत्पादकही झाली. मराठीबद्दल हे सर्व घडू शकते.

आपली खरी अडचण आपली ज्ञानेच्छा व विचारेच्छा कमी झाली ही आहे. आपण १५० वर्षे इंग्रजांच्या वर्चस्वाखाली होतो म्हणून असे झाले असेल का? याचा शोध नि:पक्षपातीपणे घ्यायला हवा. त्यासाठी पहिले पथ्य हे की एकसत्त्वीकरण (essentialization) कटाक्षाने टाळायला हवे. सर्व इंग्रज सारखे, सर्व भारतीय सारखे मानणे ही तत्त्वज्ञानात्मक घोडचूक आहे. केवळ अनुभवाधिष्ठित ज्ञानावर विसंबायचे ठरविले तर असे लक्षात येते की आपल्याला इंग्रज-भारतीय संबंधाच्या आर्थिक बाजूकडे विशेष लक्ष द्यायला हवे; म्हणून फुको किंवा सैद यांच्यापेक्षा मार्क्स हा जास्त चांगला मार्गदर्शक ठरण्याची शक्यता आहे. इंग्रज साम्राज्यशहा येथे आले ते आर्थिक शोषणासाठी. त्यासाठी त्यांनी खंडणी (Tribute), राष्ट्रीय कर्ज (National Debt) या कोणालाही दिसू शकतील अशा मार्गांचा उपयोग केला. इंग्रजपूर्व भारत हा सरंजामशाहीच्या (Feudalism) जोखडात अडकलेला उपखंड होता. तेथे भरपूर आर्थिक शोषण होत होते. त्यामुळे एका बाजूला अतिश्रीमंत सरंजामदारांचा लहान वर्ग व दुसऱ्या बाजूला खूप मोठा असा प्राथमिक उत्पादकांचा — शेतकरी व कारागीर यांचा — वर्ग असे विभाजन झाले होते. एकूण उत्पादनाचा इतका भाग सारा म्हणून सरकारला देणाऱ्या या उत्पादकांजवळ भांडवल-संचय होऊ शकत नव्हता; सरंजामदारांकडे भरपूर पैसा होता, पण तो व्यापार व उद्योगधंद्याकडे वळविण्यात आला नाही; या वर्गाची

दृष्टी सारा-वसुलीच्या आणि खंडणी-वसुलीच्या पलीकडे जात नसते. येथील तंत्रज्ञान चीनसारख्या आशियाई देशापेक्षाही मागासलेले होते. येथील निसर्गदत्त संपत्तीची वाढ करून साऱ्याच्या वाढत्या ओघाकडे इंग्रजांचे लक्ष होतेच. येथे राज्य प्रस्थापित करण्याच्या काळात इंग्लंड हे एक प्रगत औद्योगिक (Industrial) व वित्तीय (Finance) भांडवलशाही राष्ट्र झाले होते. या स्थितीतील आर्थिक शक्तीच्या स्वत:च्या खास अशा गरजा असतात. कच्चा माल देणाऱ्या व पक्का माल विकत घेणाऱ्या बाजारपेठा या त्या गरजा होत. भारत या वर्गात मोडत होता. अशा देशाचा प्रगत भांडवलदारी देशाशी संबंध आला तर त्यांत 'वसाहती अर्थव्यवस्था' (Colonial economy) निर्माण होते. मूल्यवाढ (Value addition) ही कच्च्यातून पक्का माल होण्याच्या प्रक्रियेत होते; परिणामी साम्राज्यशाही देश क्रमश: जास्त श्रीमंत होतो व मांडलीक देश होता तेथेच राहतो आणि कृषिव्यवसायावर लोकसंख्येचा वाढता भार पडला तर क्रमश: दरिद्री होतो. यातून बाहेर पडायचा एकमेव मार्ग म्हणजे मांडलीक राज्यातच कच्च्या मालाबरोबर पक्का माल निर्माण होईल याची व्यवस्था करायची. याची जाणीव भारतीयांना १८४३ पासून होऊ लागली, हे रामकृष्ण विश्वनाथांच्या लेखनावरून दिसते. त्याचे परिपक्व फल महादेव गोविंद रानडे व गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अर्थशास्त्रीय लेखनात मिळते. पैसाअडका दरोडेखोरांनी नेला तर ते आर्थिक नुकसान कोणालाही कळते. 'वसाहती अर्थव्यवस्थे'मुळेही असे नुकसान होते हे कळण्यासाठी सरंजामशाहीतील उत्तम पुस्तक 'आज्ञापत्र' पुरेसे ठरत नाही. त्यासाठी ॲडॅम स्मिथ व फ्रेड्रिक लिस्ट या नव्या भांडवलदारी जगातील अर्थशास्त्रज्ञांच्या लेखनाचीच गरज असते. हे लेखन इंग्रजी शिक्षणक्रमाचा एक भाग होते. इंग्रज साम्राज्यशहांनी भारतात उद्योगधंदे उभे राहतील यासाठी स्वत: होऊन काही केले नाही; यात पंक्तीभेद नव्हता; कारण खुद्द इंग्लंडमधील उद्योजकांनाही त्यांनी कसलीही मदत केली नव्हती. ज्यांच्याजवळ भांडवल होते व आर्थिकक्षेत्रात लागणारे धाडस होते अशा कावसजी नानाभाई दावर यांच्यासारख्या येथील उद्योजकांच्या साम्राज्यशहा आड आले नाहीत, आणि त्यांना निश्चित मदत केली ती प्लॅट ब्रदर्ससारख्या ओल्डहॅमच्या यंत्रोत्पादक खाजगी उद्योजकांनी. त्यांच्याकडून भारतीयांना उपयुक्त असे खूपसे अनौपचारिक शिक्षण मिळाले. याचे वेगळ्या क्षेत्रातले एक उदाहरण म्हणजे समाईक भांडवलाच्या कंपन्या. ज्या औपचारिक व अनौपचारिक शिक्षणामुळे भारताला वसाहती अर्थव्यवस्थेतून बाहेर पडण्याचा मार्ग मिळाला, त्याला केवळ कारकून निर्माण करणारे शिक्षण असे म्हणणे पूर्णपणे चूक आहे. या शिक्षणाचे आम्ही काय केले व करतो आहोत यावर सर्व अवलंबून आहे. या शिक्षणाच्या मार्फत येथे आलेल्या पाश्चात्त्य साहित्याबद्दलही हे खरे आहे. साम्राज्यशहांना हवे असलेले आर्थिक शोषण सुलभ व्हावे यासाठी राजकीय व वैधनिक अधिरचनेचा (Superstructure) उपयोग त्यांना झाला. (त्याचे एक चांगले उदाहरण सरकारने आपल्या हातात ठेवलेल्या आयात कराच्या नियंत्रणात मिळते.) शिक्षण व साहित्य हे त्या शोषणव्यवस्थेशी संबंधित होते असे मानायला कसलाही पुरावा नाही.

अशा परिस्थितीत संरक्षक देशीवादापेक्षा वि. का. राजवाड्यांच्या युयुत्सू देशीवादाची आम्हाला गरज आहे. राजवाड्यांनी तत्कालीन साहित्यिकांना सांगितले होते की आम्ही अशी निर्मिती केली पाहिजे की जिच्यामुळे येथील सर्वांना अभिमान वाटेल व बाहेरचे जगही आदराने मान तुकवील. हे करणे शक्य आहे हे केवळ सचिन तेंडुलकर व विश्वनाथ आनंद यांच्या व्यक्तिगत कामगिरीवरून दिसते असे नाही; तर संगणकाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक भारतीयांच्या परदेशातील कामगिरीवरूनही दिसते.

कोणतेही काम करण्यासाठी शारीरिक व मानसिक सौख्य यांची गरज असते. त्याची काळजी माझे कुटुंबीय व जवळचे स्नेही यांनी घेतली आहे. माझे सुदैव असे की माझी बरीच पुस्तके श्री. पु. भागवतांनी प्रकाशित केली. हाती घेतलेल्या पुस्तकाची ते किती काळजी घेतात याविषयी इतरांनी लिहिले आहे; त्यात एका मुद्द्याची भर टाकायला हवी. काही पुस्तके प्रकाशित करण्यात थोडाफार धोका असतो. माझ्या दोन पुस्तकांबाबत त्यांनी तो स्वीकारला आहे. माझ्या भाषणाच्या उत्तरार्धात ज्या प्रश्नांची आपण चर्चा केली त्यावरील माझे पुस्तक भागवत प्रकाशित करीत आहेत. तेही काही प्रमाणात धोका पत्करून. वरील सर्वांचा व सुरुवातीला उल्लेखिलेल्या 'संस्थां'चा व आपल्या सर्वांचा मी आभारी आहे.




**मा**ननीय अध्यक्ष श्री. पळशीकर, प्रमुख पाहुणे श्री. हंगल आणि उपस्थित मान्यवरांना माझा नमस्कार.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या सामाजिक प्रगतिशील साहित्य योजनेचं हे पाचवं वर्ष आहे. सहज मनात विचार आला की पहिल्या वर्षी जेव्हा पुरोगामी कवी नारायण सुर्वे आणि थोर विचारवंत रेगे यांचा गौरव केला तेव्हा विजय तेंडुलकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होते आणि आज त्यांचाच सन्मान करण्याची सुवर्णसंधी आपल्याला मिळाली, तेही राष्ट्रीय पातळीवरचे साहित्यिक म्हणून. म्हणजे हे दुधात साखर पडल्यासारखंच आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ची ही प्रगत साहित्य योजना जरी आता रुजली असली तरी तिचे निकष पुन्हा एकदा मांडून त्यामागची आमची भावना आणि वैचारिक बैठक स्पष्ट

## १९९८ च्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार' प्रदान सोहळ्यात केलेले भाषण

## सुनिल देशमुख

करण्याची संधी मी घेणार आहे. म्हणजे आम्ही सातासमुद्रापलीकडून ही धडपड का करतो याची तुम्हाला थोडी कल्पना येईल.

१) ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त होते,

२) ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले जाते आणि

३) ज्यांच्या साहित्यातून सर्वकालीन व सार्वत्रिक मानवी मूल्यांचा आविष्कार होतो; अशा प्रतिभावंत साहित्यिकांचा गौरव करणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य म्हणजे संत साहित्य. अशा समाजसुधारक साहित्याची ज्ञानेश्वरांपासून महाराष्ट्रात जी परंपरा आहे, ती प्रबळ व्हावी आणि प्रगत साहित्यिकांचा उत्साह द्विगुणित व्हावा; यातून समाजाला योग्य दिशा आणि वैचारिक मार्गदर्शन मिळावं यासाठी ही योजना आखलेली आहे.

आता हे निकष कसे सुचले, कोठून आले आणि साहित्यातूनच का प्रकट व्हावेत असे काही प्रश्न तुमच्या मनात आले असतीलच.

मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय या मूल्यांचा मराठी मातीशी अगदी जिवाशिवाचा संबंध आहे यात शंकाच नाही. म्हणजे ही आपलीच मूल्ये आहेत. परंतु 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या माझ्यासारख्या २५ वर्षे परदेशी राहिलेल्या लोकांनी त्यात आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीचा विचार केला आहे. तो म्हणजे अमेरिकन राज्यघटनेतही याच मूल्यांचा मूलभूत मानवी हक्कांचा जाहीरनामा म्हणून पुरस्कार केलेला आहे.

पूर्वीचे एक क्रांतिकारक श्री. पॅट्रीक हेन्री यांनी 'Liberty or death' अशी घोषणा केली होती. त्यामुळे व्यक्तींना विचार आणि कृतींचे पूर्ण स्वातंत्र्य असावे आणि त्याचा विधायक कार्याला उपयोग व्हावा, ही भावना प्रगत देशांच्या राज्यघटनेत तर आहेच पण प्रत्यक्ष अनुभवावरून सांगतो की ते आम्हाला दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष मिळतं. नुसतं बासनात बांधून ठेवलेलं नाही.

समता आणि न्याय म्हणजे समान संधी, वागणूक आणि रंग, जात, धर्म असा भेदभाव न करता गुणवत्तेला वाव मिळणं आणि त्याचं चीज होणं हेही समाजाच्या विकासाला फार पोषक आहे. सामान्य माणसाला कुणाची हांजीहांजी न करता त्याच्या व्यक्तिविकासाची संधी मिळणं, हा प्रगत समाजरचनेचा एक गाभाच आहे. म्हणूनच आमच्यासारखी मराठी माणसं सातासमुद्रापलीकडे जाऊन अटकेपार आपला झेंडा लावू शकतात. म्हणजे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या साहित्य योजनेचे पुरोगामी निकष हे प्रगत समाजांना आणि राष्ट्रांना केवळ मान्य आहेत, त्यांच्या घटनेत आहेत असंच नाही, तर ते त्यांच्या दैनंदिन जीवनात राबवले जातात, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

यातूनच एका महत्त्वाच्या तत्त्वावर मला काही विचार मांडावेसे वाटतात. ते म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य किंवा freedom of expression आणि साहित्य यांचं अतुट नातं आहे, यात शंकाच नाही आणि ते तत्त्वही जगातल्या सर्व प्रगत आणि संपन्न राष्ट्रांत मूलभूत मानवी हक्क म्हणून आदरणीय आहे. आणि ते सामान्य नागरिकांना दैनंदिन जीवनात निर्भयपणे उपभोगता येते. अमेरिकेच्या राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा एक जाहीरनामा आहे—त्याला Bill of Rights असं म्हणतात—त्यात जे दहा मूलभूत मानवी हक्क दिले आहेत त्यात पहिला हक्क आहे freedom of expression म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य! त्याचं माध्यम काहीही असू शकेल. ते साहित्य असेल, कला असेल किंवा चित्रपट असेल. हा मूलभूत मानवी हक्क आहे आणि अशा हक्कांचा आदर करणारे समाज आज भौतिकरित्या, सामाजिक आणि सांस्कृतिकरित्या वरच्या दर्जाचे ठरतात. मानवी अभिव्यक्ती स्वातंत्र्यात त्यांच्या सृजनशक्तीला म्हणजे Creative Energy ला वाव मिळतो आणि सारा समाज अधिक सुसंस्कृत होतो, प्रगत होतो, पुरोगामी होतो. याच अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी झाली, झुंडशाहीत ते पायदळी तुडवले गेले की त्या समाजाचं 'कळपात' रूपांतर व्हायला वेळ लागत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्य नष्ट झालं की त्या समाजाचा अध:पात होऊन त्याचा 'समूह' होतो, त्याचा 'परिवार' होतो, त्याची 'सेना' होते, पण त्यांच्यात माणुसकी शिल्लक असते का?

हे स्वातंत्र्य नष्ट झालं की समाजात 'समरसता' येते, असं फॅसिस्ट लोक म्हणतात, पण त्यामुळे विविधता नष्ट होते. फक्त अन्याय आणि विषमता शिल्लक राहतात. समाजात सामूहिकीकरण म्हणजे regimentation येते, पण मग या समूहात तेंडुलकरांसारखे original artists, प्रतिभावंत निर्माण होतील का? पाटणकरांसारखे 'सौंदर्यशास्त्रा'चे चाहते होतील का? शक्य नाही!

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आल्यास समाजाची कशी अधोगती होते याची दोन ज्वलंत उदाहरणं अलीकडच्या इतिहासात आहेत. पहिलं उदाहरण म्हणजे युरोपमध्ये मध्ययुगात, 'Dark Ages' असा शेकडो वर्षांचा कालखंड गेला. तेव्हा धर्मांध मूलतत्त्ववादी लोकांची राजवट होती. धर्म आणि संस्कृती संवर्धनाच्या नावाखाली त्या दांभिक आणि स्वार्थी राजकारण्यांनी युरोपमधली कला, विज्ञान, साहित्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचा नाश केला. परिणामी युरोप हा केवळ भ्याड लोकांचा कळप म्हणून लांच्छनास्पद अवस्थेत जगला. त्यातून पुढे renaissance period आला आणि काही निर्भय लोकांनी जिवावर उदार होऊन या पाशवी, जुलमी राजवटीचा पाडाव केला, तेव्हा कुठे युरोपला प्रगतीचे दिवस आले.

दुसरं आणखी भयानक उदाहरण म्हणजे हिटलरची फॅसिस्ट राजवट. जर्मन माणसांचं हिंस्त्र जनावरात रूपांतर करण्यासाठी त्याचं पहिलं पाऊल काय होतं? अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंदी! प्रथम त्यानं कलावंत, साहित्यिक आणि विचारवंत यांच्यावर दडपशाही आणली. प्रसंगी खूनही केले. साहित्यिक आणि विचारवंत हे समाजाच्या स्वातंत्र्याचे, Consciousचे राखणदार असतात, पोषक असतात. म्हणूनच कुठलाही हुकुमशहा जेव्हा समाजाचा कळप आणि माणसांचा zombi(e) किंवा केवळ आदेश पाळणारा यांत्रिक robot बनवू बघतो, तेव्हा त्याची पहिली चाल म्हणजे कलाकार, साहित्यिक, विचारवंत यांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्य नष्ट करणं ही असते.

आपण आज एकविसाव्या शतकाकडे चाललो आहोत. मागे फिरून पुन्हा अकराव्या शतकात जायचं की प्रगतीच्या नव्या दिशेनं आशावादानं आणि निर्भयपणे साऱ्या जगाचे नागरिक म्हणून जगायचं यातला फरक हे तरुण साहित्यिक, कलावंत आणि विचारवंतच करतील अशी माझी खात्री आहे. तेंडुलकरांसारख्या ज्येष्ठ, निर्भय व्यक्तीचं मार्गदर्शन जरूर मिळेल, पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याची धुरा वाहायची आहे ती तरुण साहित्यिक विचारवंतांनीच. लोकांमध्ये मतभेद जरूर असतात, पण ते कसे व्यक्त करावेत याविषयी एक सुप्रसिद्ध वाक्य आठवतं, ते असं :

I may not agree with what you say but, I will defend to death, your right to say it. म्हणजे मी तुझ्या म्हणण्याशी सहमत नसेन, पण ते म्हणण्याचं तुझं स्वातंत्र्य जपण्यासाठी जीवही द्यायची माझी तयारी आहे. हे खऱ्या सुसंस्कृत समाजाचं लक्षण आहे. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या या सामाजिक प्रगतिशील साहित्य योजनेमुळे या मूलभूत मानवी स्वातंत्र्याचा पाया बळकट झाला, तर आमच्या सर्व श्रमांचं चीज झालं असं मी समजेन.

शेवटी एक गोष्ट नमूद करतो की, या वर्षापासून 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'चं मार्गदर्शन या योजनेला लाभलं आहे. यापूर्वी 'अभिनव भाषाभ्यास केंद्रा'नं उत्कृष्ट कामगिरी करून या योजनेची प्रतिष्ठा वाढवली याबद्दल त्यांचं ऋण मी मान्य करतो. संस्था बदलली तरी ही योजना राबवणारी माणसं प्राध्यापक पाध्ये, पानसे, केळकर इ. सर्व मंडळी तीच आहेत. त्यामुळे जवळच्या नात्यातल्याच या घरातून त्या घरी आल्यासारखं आहे. उलट आता तर मृणालताईंचही मार्गदर्शन लाभलं आहे, त्यामुळे ही योजना अधिक प्रभावी, गतिशील होईल यात शंकाच नाही.

आम्ही आवर्जून तुमच्या गावी आलो आणि औरंगाबादकरांनी घरचं कार्य असावं असा प्रतिसाद दिला यातच सर्व काही आहे. परिचय झाला आहेच, त्याचं मैत्रीत रूपांतर होऊन आपलं नातं असंच दृढ व्हावं, ही इच्छा प्रकट करून मी आपली रजा घेतो.

धन्यवाद!

श्री. सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या 'केमिकल टेक्नॉलॉजी' या विभागातून बी.केम्. ही पदवी त्यांनी प्राप्त केली व पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमोडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीची प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे.

व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

# सुनिल देशमुख

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजसेवा पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
1300, Rocrimmon Road
Stamford, C T 06903
**U.S.A.**
Tel. : 203-322-0548
Fax : 203-322-1936
e-mail : sunild@aol.com

# महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कारांचे मानकरी

800
Sam/1999

**गौरव पुरस्कार**

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीबाई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९

**विशेष पुरस्कार**

भा. रा. भागवत / बाल साहित्य १९९६
उमा कुलकर्णी / भाषांतर १९९७
बाबुराव बागूल / दलित साहित्य १९९८
वसंत दावतर / मराठी भाषा, संशोधन व समीक्षा १९९९

**प्रकाशन संस्था**

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

**वैचारिक नियतकालिके**

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैद्राबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy Journal) १९९९

**ग्रंथ / ललित**

ताम्रपट / रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस / अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा / भाऊ पाध्ये १९९५
उद्काचिया आर्ती / मिलिंद बोकील १९९५
वनवास / प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता :
दोन / दिलिप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त / महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत / अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र १९९८
अधांतर / जयंत पवार १९९९
कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९

**ग्रंथ / वैचारिक**

आस्तिक शिरोमणी चार्वाक / आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी / गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद / रावसाहेब कसबे १९९५
जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड १९९६
समाजपरिवर्तनाच्या दिशा / जनार्दन वाघमारे १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत / गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन / सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे / मनोहर कदम १९९७
आंबेडकर / नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक / म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा: मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना / संपादक : विलास खोले १९९९

**ग्रंथ / अ-पारंपरिक**

जिहाद / हुसेन जमादार १९९४
आक्रोश / भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया / बाबा भांड १९९६
लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन / लक्ष्मण माने १९९८

5153